# तृतीय वर्ष कला

## सत्र - V(CBCS)

## अर्थशास्त्र अभ्यासपत्रिका क्र. VIII

# वृद्धी आणि विकासाचे अर्थशास्त्र

## विषय कोड : ECOEEA502

© UNIVERSITY OF MUMBAI


**प्राध्यापक सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी**
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई



**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. राजश्री पंडित**
सहाय्यक प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक,
प्रभारी वाणिज्य विभाग प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. प्रतिक्षा नारायण टिकार**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक** : **डॉ. गोपाल एकनाथ घुमटकर**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा.व्ही.एस.सोनटक्के**
किर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई.

: **प्रा.बी.बी.सुर्यवंशी**
एस.एस.पाटकर महाविद्यालय, गोरेगाव (प) मुंबई.

: **श्रीमती.मनिषा सामंत**
ओम विद्यालंकार शिक्षण संस्थेचे अस्मिता महाविद्यालय,
विक्रोळी, मुंबई.

: **डॉ. प्रतिक्षा नारायण टिकार**
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र)
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.



**ऑगस्ट २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक :** संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

**अक्षर जुळणी व मुद्रण** : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

# अनुक्रमणिका


| क्रमांक | अध्याय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | वृद्धी आणि विकास संकल्पना व यांमधील भेद | ०१ |
| २) | मानव विकास आणि सहस्त्र विकास लक्ष्ये | ०६ |
| ३) | आर्थिक विकासाचे सिद्धांत - १ | २६ |
| ४) | आर्थिक विकासाचे सिद्धांत - २ | ५६ |
| ५) | विकास प्रक्रियेतील संरचनात्मक समस्या - १ | ७१ |
| ६) | विकास प्रक्रियेतील संरचनात्मक समस्या - २ | ८७ |
| ७) | नियोजन, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास - १ | ११० |
| ८) | नियोजन, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकास - २ | ११९ |


❖❖❖❖

**TYBA ECONOMICS (SEMESTER-V)**

| COURSE CODE | GROUP-I : CORE PAPER<br>PAPER NO - VIII | CREDIT | MARKS |
| --- | --- | --- | --- |
| ECOGAD502 | ECONOMICS OF GROWTH AND DEVELOPMENT | 4 | 100 |

**Course Objectives**

This paper introduces the concepts, theories, process and policies regarding growth and development. The meaning of the development as it has evolved over the years is clarified. The contemporary as well as classical theories of growth, development, and underdevelopment are considered in detail. Theories and issues related to population, poverty, inequality and human capital are considered. Urban and rural aspects of the development process studied. Importance of technology, infrastructure and planning in development process are considered. The approach has been to cover all important areas of development economics.

**Course Outcomes**

- Enable students to apply and analyse issues in the development process.
- Students will be able to identify the issues related to Growth and Development
- Students will be able to understand the policy options and analyzed the Measures taken for the Development of an economy.

**Module 1: Meaning of Economic Growth and Development (12 Lectures)**

Concepts of Economic Growth and Development-Distinction between Economic Growth and Development- Concept of Human Development- H.D.I, G.D.I, Green GDP- Sen's Capability approach- Millennium Development Goals (MDGs)- Initiative by Indian government towards MDGs.

**Module 2: Theories of Economic Development** **(12 Lectures)**

Rostow's stages of growth; Big Push Theory- Leibenstein's Critical Minimum Effort Thesis - Harrod - Domar Growth Model- Lewis Model of unlimited supply of labour - Ragner Nurkse's Theory of Disguised Unemployment- Schumpeter's Theory of Development

**Module 3: Structural Issues in Development Process** **(12 Lectures)**

Concept of Human Capital- Role of Education, Health and nutrition in Human Capital - Meaning and Measurement of Poverty and Inequality- Measures to eradicate poverty and Inequality - Meaning of Inclusive growth - SHG and Microfinance- Migration – Urbanization- Formal and Informal Sector- Urban Informal Sector

**Module 4: Planning, Technology and Economic Development** **(12 Lectures)**

Concept and Role of infrastructure in Economic Development- Role of technology in Economic Development- Labour intensive versus Capital intensive technology- Schumacher's concepts of intermediate and appropriate technology- Green Technology- Meaning and Types of Economic Planning- Role of Planning in Economic Development

**References:**


1. Boldwin, Economic Development: Theory, History and Policy, Willy Publishers, 1957.
2. Mamoria, Joshi, Principles and practice of marketing in India, Kitab Mahal, 1979.
3. Meier, Gerald M. and James E. Rauch. Leading Issues in Economic Development, New Delhi: Oxford Univ. Press, 2006.
4. Thirlwall, A.P. Growth and Development 8e. New York: Palgrave MacMillan, 2005. 7
5. Todaro, Michael P. and Stephen C. Smith. Economic Development, 8e. Delhi: Pearson Education, 2003.
6. V.K. Puri and S.K. Mishra, Indian Economy, Himalaya Publishing House, 2019

# १

# वृद्धी आणि विकास संकल्पना व यांमधील भेद

**घटक रचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ आर्थिक वृद्धीची संकल्पना

१.३ आर्थिक विकासाची संकल्पना

१.४ आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास यांमधील फरक

१.५ सारांश

१.६ प्रश्न

## १.० उद्दिष्ट्ये

- आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास या संकल्पना समजून घेणे.
- आर्थिक वाढ आणि आर्थिक विकास या संकल्पनांमधील फरक अभ्यासणे.

## १.१ प्रस्तावना

आर्थिक वाढ ही आर्थिक विकासापेक्षा संकुचित संकल्पना आहे. ही देशाच्या राष्ट्रीय उत्पादनाच्या वास्तविक पातळीत झालेली वाढ आहे जी संसाधनांच्या गुणवत्तेत वाढ (शिक्षण इ.), संसाधनांच्या प्रमाणात वाढ आणि तंत्रज्ञानातील सुधारणा किंवा अन्य मार्गाने अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्राद्वारे उत्पादित वस्तू आणि सेवा यांच्या मूल्य वाढीमुळे होऊ शकते. आर्थिक वाढ किंवा वृद्धी ही देशाच्या जीडीपीमधील (एकूण देशांतर्गत उत्पादन) वाढीने मोजली जाऊ शकते.

आर्थिक विकास ही एक आदर्श संकल्पना आहे, जी लोकांच्या नैतिकतेच्या अर्थाने (योग्य आणि चुकीचे, चांगले आणि वाईट) लागू होते. मायकेल टोडारोच्या मते, आर्थिक विकास ही राहणीमानातील वाढ, तसेच दडपशाही पासून आत्मविश्वासित गरजा आणि स्वातंत्र्य सुधारणा होय. विकासाचे मोजमाप करण्याची सर्वात अचूक पद्धत म्हणजे मानवी विकास निर्देशांक जो साक्षरतेचे दर आणि आयुर्मान विचारात घेते ज्यामुळे उत्पादकता प्रभावित होते आणि आर्थिक वाढ होऊ शकते. यामुळे शिक्षण, आरोग्य सेवा, रोजगार आणि

पर्यावरणाच्या संवर्धनाच्या क्षेत्रांमध्ये अधिक संधी निर्माण होतात. हे प्रत्येक नागरिकाच्या दरडोई उत्पन्नात वाढ दर्शविते.

## १.२ आर्थिक वृद्धीची संकल्पना

आर्थिक वाढ किंवा वृद्धी दरडोई सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) किंवा एकूण उत्पन्नाच्या इतर मापकांमधील वृद्धी आहे. आर्थिक वृद्धी ही बऱ्याचदा वास्तविक जीडीपीमधील बदलातील दर म्हणून मोजली जाते. आर्थिक वाढ किंवा वृद्धी ही केवळ उत्पादित वस्तू आणि सेवांचा संदर्भ देते. आर्थिक वाढ किंवा वृद्धी ही एकतर सकारात्मक किंवा एकतर नकारात्मक असू शकते. नकारात्मक वाढ ही संकल्पना आर्थिक मंदी आणि आर्थिक नैराश्याशी संबंधित आहे.

## १.३ आर्थिक विकासाची संकल्पना

ॲडम स्मिथच्या काळापासून अर्थशास्त्रज्ञ आर्थिक विकासाच्या समस्येची चर्चा करत आलेले आहेत. मात्र गेल्या काही दशकात विशेषत: अल्प विकसित देशात या समस्येची अधिक चर्चा होत आहे. दुसर्या महायुद्धानंतर अल्प विकसित देशांनी आर्थिक विकासाकडे विशेष लक्ष पुरविलेले दिसते. साहजिकच अर्थशास्त्रज्ञ आणि विचारवंतांनी आर्थिक विकास या संकल्पनेकडे अधिक लक्ष पुरवून त्याबाबत विस्तृत लिखाण केलेले आढळते.

### १.१.१ आर्थिक विकासाचा अर्थ :

आर्थिक विकासाची सर्वमान्य व्याख्या करणे अवघड आहे. प्रत्यक्षात आर्थिक विकास आणि आर्थिक वाढ या दोन्ही संज्ञा एकमेकांच्या ऐवजी वापरल्या जाताना दिसतात. मात्र अनेक अर्थशास्त्रज्ञांनी या दोन्ही संकल्पनामध्ये फरक केलेला आहे.

### १.१.२ आर्थिक विकासाची व्याख्या :

आर्थिक विकास ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया असून या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न भरीव प्रमाणात वाढते.

या व्याख्येतील महत्त्वाचे शब्द म्हणजे प्रक्रिया, वास्तव राष्ट्रीय उत्पन्न आणि दीर्घकाळ हे होत. त्यामुळे या शब्दांचा विस्ताराने विचार करणे आवश्यक आहे.

**प्रक्रिया :**

वरील व्याख्येत विकासाची प्रक्रिया हा शब्द वापरलेला आहे, येथे प्रक्रिया म्हणजे दीर्घकाळ चालू राहणारी आणि अर्थप्रणालीत काही बदल घडवून आणणारी प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रक्रियेत अर्थव्यवस्थेतील अनेक घटकांमध्ये बदल अभिप्रेत आहेत.

**वास्तव राष्ट्रीय उत्पन्न :**

एका वर्षात राष्ट्रात उत्पादित केल्या जाणार्या वस्तू आणि सेवांचे मोजमाप म्हणजे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न होय. येथे पैशाचा संदर्भ लक्षात न घेता प्रत्यक्ष वस्तू आणि सेवांचा विचार केला जातो.

**दीर्घकाळ :**

दीर्घकाळात आर्थिक विकास होत असताना वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात होत असणारी वाढ दीर्घकाळपर्यंत चालू राहणे अभिप्रेत आहे. अल्पकालीन वाढ विकास प्रक्रियेत अभिप्रेत नाही. उदाहरणार्थ, अल्पकालीन तेजीमुळे उत्पादनात वाढ झाली तर त्याचा विकास म्हणता येणार नाही. त्यामुळे दीर्घकालीन वास्तव राष्ट्रीय उत्पन्न वाढ आर्थिक विकासात अभिप्रेत आहे.

साधारणपणे ज्या देशात सातत्याने वास्तव राष्ट्रीय उत्पन्न दीर्घकाळापर्यंत वाढत आहे. तिथे आर्थिक विकास होत आहे असे म्हटले जाते. याखेरीज आर्थिक विकासात बहुसंख्य लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावणे हेही अभिप्रेत असते. या दृष्टिकोनानुसार आर्थिक विकासाची होणारी व्याख्या पुढीलप्रमाणे :

आर्थिक विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की, जिथे दीर्घकाळापर्यंत वास्तव दरडोई उत्पन्न वाढत राहते.

$$\text{दरडोई उत्पन्न} = \frac{\text{राष्ट्रीय उत्पन्न}}{\text{एकूण लोकसंख्या}}$$

ज्यावेळी व्यक्तीचे वास्तव्य उत्पन्न वाढते त्यावेळी तिच्या राहणीमानाचा दर्जा सुधारु लागतो आणि यालाच काही अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकास म्हटले आहे. काही अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकास ही संकल्पना औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यास जोडलेली आहे.

## १.४ आर्थिक वृद्धी आणि आर्थिक विकास यांमधील फरक

वरील दोन्ही संकल्पना एकत्रितपणे वापरण्यात येत असल्या तरी त्यात फरक आहे स्थूलमानाने विचार करता आर्थिक वाढ म्हणजे उपलब्ध असणार्या उत्पादनामध्ये साधनसामग्री आणि त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होऊन परिणामत: सरासरी उत्पादनात वाढ होणे होय. आर्थिक वाढीत मुख्यत: उत्पादन वाढीचाच विचार केला जातो. याउलट आर्थिक विकासात केवळ उत्पादन वाढच नव्हे तर पुढील बाबींचाही विचार केला जातो.

अ) उत्पादन घटक आणि उत्पादन यांच्या रचनेत होणारे बदल

ब) उत्पादनासाठी वापरल्या जाणार्या तंत्रज्ञानात होणारे बदल

क) सामाजिक दृष्टिकोन, सांस्कृतिक वातावरण आणि सामाजातील विविध संस्थामधील संस्थामध्ये होणारे फेरबदल.

थोडक्यात, आर्थिक विकासात केवळ वस्तू व सेवांच्या उत्पादनावरील वाढ अपेक्षित नसून व्यक्तीच्या राहणीमानाच्या दर्जातील वाढ, अर्थव्यवस्थेतील उत्पादन प्रक्रियेत होणार्या सुधारणा, सामाजिक व सांस्कृतिक बदल अपेक्षित आहेत. त्यामुळे आर्थिक विकास ही संकल्पना आर्थिक वाढ या संकल्पनेपेक्षा अधिक विस्तृत आहे. आर्थिक वाढीत केवळ संख्यात्मक वाढीचा विचार केला जातो तर आर्थिक विकासात त्या पलीकडे जाऊन गुणात्मक वाढीचाही विचार केला जातो. या गुणात्मक बदलात तांत्रिक प्रगती, सामाजिक, आर्थिक सुधारणा, संस्थात्मक फेरबदल हे सर्व अपेक्षित आहेत. त्यावरुन असे म्हणता येईल की, आर्थिक विकास ही संकल्पना आर्थिक वाढ या संकल्पनेपेक्षा अधिक विस्तृत व सर्वसमावेश अशी आहे. विकासात वाढ आणि बदल या दोन्ही बाबींचा एकत्रितपणे विचार केला जातो. आर्थिक वाढीत केवळ 'वाढीची प्रक्रिया' किंवा 'वस्तू-सेवांच्या उत्पादनातील वाढ' यावरच लक्ष केंद्रित करण्यात येते तर आर्थिक विकास या संकल्पनेत गुणात्मक आणि रचनात्मक सुधारणा अपेक्षित असतात.

### **१.२.१ आर्थिक विकास आणि कल्याण :**

सर्वसाधारणपणे आर्थिक विकासालाच आर्थिक प्रगती असेही संबोधले जाते आणि या प्रगतीत आर्थिक कल्याण अभिप्रेत असते. आर्थिक विकासात दरडोई वास्तव उत्पन्न वाढ अपेक्षित असते आणि जसे दरडोई उत्पन्न वाढले की दारिद्र्य निर्मूलन होऊन आर्थिक कल्याण साधले जाईल असा सर्वसाधारण विचार मांडला जातो. मात्र प्रत्येक वेळी आर्थिक विकास झाला म्हणजे आर्थिक कल्याणात वाढ होतेच असे म्हणणे धाडसाचे ठरेल. याचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक विकास मोजण्याचे निर्देशक आणि आर्थिक कल्याण मोजण्याचे निर्देशक वेगवेगळे आहेत. उदाहरणार्थ, आा|थक कल्याणाच्या दृष्टिकोनातून विचार करता कोणत्या वस्तूंचे उत्पादन झाले? ते किती प्रमाणात झाले? इतकाच विचार करुन न थांबता ते उत्पादन कसे झाले आणि कोणासाठी झाले हा विचार करणेही महत्त्वाचे ठरते. आर्थिक विकास होत असताना जर श्रीमंत अधिक श्रीमंत झाले तर आर्थिक कल्याण नव्हे. आर्थिक कल्याणात बहुसंख्य आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाचा विचार केला जातो. दीर्घकाळात उत्पन्नाच्या वाटपात होणारे बदल, कामाच्या परिस्थितीतील बदल, ग्राहकांच्या आवडी-निवडीत होणारे बदल, राष्ट्रीय उत्पादनाच्या रचनेत होणारे बदल, अशा अनेक घटकांमुळे आर्थिक विकास आणि आर्थिक कल्याण यात भेदभाव करणे अवघड जाते.

अशा प्रकारे आर्थिक वाढ ही संकुचित संकल्पना असून इथे केवळ संख्यात्मक वाढीचा विचार केला जातो तर आर्थिक विकास ही अधिक विस्तृत संकल्पना असून येथे संख्यात्मक तसेच गुणात्मक वाढीचा विचार केला जातो. एखाद्या देशात आर्थिक वाढ झाली म्हणजे विकास होतोच असे नाही. कारण ज्यावेळी आपण एखाद्या देशाचा आर्थिक विकास झाला असे मानतो तेव्हा त्या देशात सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक सुधारणा अपेक्षित असतात. तसेच आर्थिक विकासात अर्थव्यवस्थेतील निरनिराळ्या क्षेत्रांचा एकमेकांशी येणारा अधिक चांगला समन्वय, संकटांना तोंड देण्याची अर्थव्यवस्थेची क्षमता, स्वयंपूर्णता, बदलांना किंवा सुधारणांना तोंड देण्याची आणि नवनव्या प्रक्रिया स्वीकारण्याची तयारी अशी अनेक बाबींचा विचार केला जातो.

## १.५ सारांश

अर्थशास्त्रज्ञ आर्थिक विकासास कसे चालना द्यायचे यावर सहमत नसले तरी, सर्वसाधारण करार आहे की विकासासाठी आर्थिक वाढ, दरडोई उत्पन्नातील वास्तविक वाढ आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विस्तारास पाठिंबा देण्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिक आणि राजकीय संस्था आवश्यक आहेत. यासाठी उद्योजकांमध्ये प्रभावीपणे कार्य करू शकणाऱ्या नागरिकांची देखील आवश्यकता आहे. लोकसंख्येच्या वाढीपेक्षा जास्त दराने वस्तू आणि सेवांचे उत्पादन वाढत असल्याने आर्थिक वाढ आहे. आर्थिक विकासामध्ये दरडोई उत्पन्न वाढण्याव्यतिरिक्त अर्थव्यवस्थेच्या संरचनेत मूलभूत बदलांचा समावेश आहे. हे बदल वाढत्या औद्योगिक क्षेत्राद्वारे आणि सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) च्या घटत्या शेतीच्या वाटा तसेच लोकसंख्येच्या वाढीतील महत्त्वपूर्ण बदल, शहरी स्थलांतर आणि रोजगाराच्या संधींसह वैशिष्ट्यीकृत आहेत.

## १.६ प्रश्न

प्रश्न 1. आर्थिक वाढीवर टीप लिहा.

प्रश्न 2. आर्थिक विकासावर टीप लिहा.

प्रश्न 3. आर्थिक वाढ आणि विकासामधील फरक स्पष्ट करा.

❖❖❖❖

# २

# मानव विकास आणि सहस्त्र विकास लक्ष्ये

**घटक रचना :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ मानव विकासाची संकल्पना

२.२ मानव विकास निर्देशांक

२.३ लिंग विकास निर्देशांक

२.४ हरीत जीडीपी

२.५ डॉ. अमर्त्य सेन यांचा क्षमता विकास दृष्टीकोन

२.६ सहस्त्र विकास लक्ष्ये

२.७ सारांश

२.८ प्रश्न

## २.० उद्दिष्टये

- मानवी विकास आणि मानवी विकास निर्देशांक या संकल्पनांचा अभ्यास करणे.
- लिंग विकास निर्देशांक संकल्पनेचा अभ्यास करणे.
- हरित जीडीपीची संकल्पना समजून घेणे.
- सेनच्या क्षमता दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.
- सहस्त्र विकास लक्ष्यांचा अभ्यास करणे.

## २.१ मानव विकासाची संकल्पना

१९९० मध्ये प्रथमच मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करण्यात आला त्यात मानवी विकास ही संकल्पना खूपच व्यापक असल्याने त्याचे मोजमाप करणे किंवा सर्वसमावेश निर्देशांक शोधून काढणे हे अत्यंत आहेत की, ज्यांचे मोजमाप करता येणे अवघड आहे. परंतु एक सोपा आणि सर्वसमावेश निर्देशक शोधून परिणामकारकपणे मानवी विकास मोजणे काही प्रमाणात शक्य आहे.

एखाद्या देशातील मानवी विकास मोजण्यासाठी वापरल्या जाणार्या मानवी विकास निर्देशकात सर्वसमावेशक यशाचा विचार केला जातो. कारण, कोणत्याही देशाच्या सर्वसमावेशक विकासावरच त्या देशातील मानवी विकास अवलंबून असतो.

## २.२ मानव विकास निर्देशांक

**मानवी विकास निर्देशांकात मुख्यत:** आयुर्मान, शिक्षण (प्रौढ साक्षरता) आणि प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण इत्यादी आणि दरडोई उत्पन्न या निर्देशांकाचा प्रामुख्याने विचार केला जातो. या निर्देशांकानुसार जागतिक क्रमवारीत भारताचा नंबर १३५ वा लागतो तर चीनचा नंबर १०८ वा लागतो. हे निर्देशांक आपण अधिक विस्ताराने अभ्यासू.

**मानवी विकासाचे निर्देशक :**

**१) आयुर्मान :**

एखादी व्यक्ती किती वर्षे जगते यावरुन तिचे आयुर्मान ठरते. आयुर्मान हे मृत्यूदरावर अवलंबून असते व मृत्यूदर हा रोगराईचे प्रमाण, आरोग्यविषयक सोयी-सुविधा, सात्विक अन्नाची उपलब्धता इत्यादी अनेक घटकांवर अवलंबन असतो. अविकसित देशात जेव्हा विकासाची प्रक्रिया सुरु होते तेव्हा या सोयीसुविधा उपलब्ध होत असल्याने मानवाचे आयुर्मान वाढू लागते. उदाहरणार्थ, भारतात विकासाबरोबरच आयुर्मान हळूहळू वाढत असले तरी विकसित देशातील आयुर्मानाच्या तुलनेने (७० ते ७५ वर्षे) ते अद्याप खूपच कमी आहे. १९५१ ते ६१ या दशकात भारतातील पुरुषांचे आयुर्मान ४१ वर्षे होते ते १९९१ मध्ये ५७ वर्षे इतके झाले. आणि स्त्रियांच्या बाबतीत हेच आयुर्मान ४० वरुन ५८ इतके वाढले. भारतात वाढत असलेले दरडोई उत्पन्न, त्यामुळे राहणीमानाचा वाढलेला दर्जा, रोगप्रतिबंधक उपाययोजना, सार्वजनिक आरोग्यविषयक सोयीसुविधा इत्यादींमुळे मानवी विकास घडून येत आहे. आयुर्मान वाढणे हे केवळ व्यक्तीच्याच हिताचे नाही तर देशाच्याही हिताचे असते. कारण त्या व्यक्तीच्या शिक्षणात, व्यक्तिमत्त्व विकासात सरकारचा सहभाग फार मोठा असतो आणि वाढत्या आयुर्मानामुळे ती व्यक्ती राष्ट्रीय उत्पन्नात पुरेपुर भर घालू शकते.

**२) शिक्षण :**

एखाद्या देशात मानवी विकास झालेला आहे किंवा नाही आणि झाला असेल तर त्यांचे प्रमाण काय हे समजण्यासाठी शिक्षण हा एक महत्त्वाचा निर्देशक आहे. मानवी भांडवलाच्या विकासाला शिक्षण हा घटक अत्यावश्यक आहे. शिक्षणामुळे लोकांचा दृष्टिकोन बदलतो. देशाच्या विकास कार्यक्रमात जनतेचे यातूनच कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढीस लागते. अत्यंत लाभदायक असते. आर्थिक विकासाला अनुकूल वातावरण तयार करावयाचे असेल तर शिक्षण प्रसार होणे अत्यावश्यक आहे.

शिक्षणावरील गुंतवणुकीत प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत, साक्षरतेपासून प्रौढ शिक्षणापर्यंत आणि निरनिराळ्या कारखान्यात दिले जाणारे प्रत्यक्ष कामासंबधीचे प्रशिक्षण या सर्वांचा समावेश आहे. भारतात ज्या व्यक्तीस लिहिता वाचता येते व काही वेळा तर ज्या व्यक्तीला आपली सही करता येते तिला साक्षर असे म्हटले जाते. अशा साक्षरांची संख्या भारतात १९१ साली २९.४८ टक्के होती. ती १९९१ साली ४२.९४ टक्के इतकी वाढलेली आहे. हा मानवी विकास तुलनेने भारतात आजही सुमारे ६० टक्के निरक्षर आहेत. यावरुन आपल्या मानवी भांडवलाचा अल्प दर्जा लक्षात येतो. भारताचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास कायद्याने प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी ९३.४ टक्के इतके विद्यार्थी भरती होतात आणि प्रत्यक्षात ४१ टक्के प्राथमिक भारतात प्रौढ साक्षरतेचे प्रमाण केवळ ४९ टक्के आहे हेच प्रमाण इतर विकसित देशात १०० टक्के आहे.

भारतासारख्या विकसनशील देशात झपाट्याने होत असणार्या औद्योगिकीकरणाची गरज भागविण्यासाठी तांत्रिक ज्ञान असणार्या व्यक्तींची वाढती गरज निर्माण होते. यातूनच तांत्रिक शिक्षणाची गरज आणि महत्त्व वाढत जाते.

**उच्च शिक्षण :**

उच्च शिक्षणाच्या बाबतीत भारतातचे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास १९८२ साली २० ते २४ या वयोगटातील केवळ ९ टक्के लोकसंख्येला उच्च शिक्षणाचा फायदा घेता आला. भारतातील हे प्रमाण विकसित देशांच्या केवळ $\frac{१}{४}$ इतके झाले.

**मानवी विकासाचे निर्देशक (१९९३)**

| देश | आयुर्मान | प्रौढ साक्षरता | एकूण शिक्षण प्रवेश प्रमाण | दरडोई वास्तव उत्पन्न | मानवी विकास उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| कॅनडा | ७७.५ | ९९.० | १०० | ५,९४७ | १ |
| अमेरिका | ७६.१ | ९९.० | ९६ | ५,९८३ | २ |
| जपान | ७९.६ | ९९.० | ७८ | ५,९४७ | ३ |
| फ्रान्स | ७७.० | ९९.० | ८८ | ५,९४३ | ७ |
| इंग्लंड | ७६.३ | ९९.० | ८३ | ५,९२८ | १६ |
| चीन | ६८.६ | ८०.० | ५७ | २,३३० | १०८ |
| भारत | ६०.७ | ८०.६ | ५५ | १,२४० | १३५ |

**३) दरडोई उत्पन्न :**

देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नास त्या देशाच्या त्या विशिष्ट वर्षातील एकूण लोकसंख्येने भागल्यास त्या देशातील लोकांचे त्या विशिष्ट वर्षाचे दरडोई उत्पन्न समजते. मानवी विकास मोजण्याचा हा एक चांगला निर्देशक आहे. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास होत

असताना दरडोई उत्पन्न वाढणे अपेक्षित असते. वाढत्या दरडोई उत्पन्नामुळे लोकांच्या राहणीमानाचा दर्जा त्यांना मिळणार्या शैक्षणिक, आरोग्यविषयक सोयीसुविधा यात वाढ होऊन व्यक्तीची कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढीस लागणे हाच मागणी विकास होय. बहुतेक सर्व अविकसित आणि विकसनशील देशात दरडोई उत्पन्न कमी आहे. याची मुख्य कारणे म्हणजेच श्रमिकांची अल्प उत्पादकता, शिक्षण आणि प्रशिक्षणाचा अभाव, दरडोई अल्प भांडवल उपलब्धता, सदोष शिक्षण पद्धती आणि वाढत्या लोकसंख्येचा ताण ही होत. खाली दिलेल्या तक्त्यावरुन लक्षात येते की, इतर देशांशी, तुलना करता भारतातील दरडोई उत्पन्न खूपच कमी आहे. साहजिकच मानवी विकासावर मर्यादा येतात.

१९९३ (येथे अमेरिकेचे दरडोई उत्पन्न हा पाया धरलेला आहे.)

| **देश** | **दरडोई उत्पन्न (US = 100)** | **दरडोई उत्पन्न विनिमय दरानुसार (US = 100)** |
|---|---|---|
| अमेरिका | १०० | १०० |
| जपान | ८१.७ | १३३.८ |
| जर्मनी | ७५.३ | ९८.८ |
| इंग्लंड | ७९.४ | ७०.९ |
| भारत | ४.९ | १.२ |

**Source: Derived from World Development Report (1996)**

### १.४.३ आधुनिक मानवी विकास निर्देशांक [Human Development Index (HDI)] :

आर्थिक विकासाच्या निर्देशांकात युनायटेड नेशन्सने यू. यू. एन. डेव्हलपमेंट कार्यक्रमामध्ये तयार केलेला व १९९० पासून वापरात असलेला मानव विकास निर्देशांक हा महत्त्वाचा निर्देशांक मानला जातो. हा निर्देशांक मानवी विकासाची आयुर्मान किंवा जन्मसमयी जीवन आयुर्मान, संभावना, ज्ञान आणि बरा राहणीमान स्तर यांची मोजदाद करीत असतो. आयुर्मान हे जन्मसमयी जीवन आयुर्मान संभावनेने मोजले जाते. बरे राहणीमान म्हणजे पक्के घर, पुरेसे वस्त्र, अन्न, पाणी, उर्जा, आरोग्य व स्वच्छता सोयी, किमानपक्षी सुखसोयीच्या वस्तू घेण्याइतपत आर्थिक कुवत असणे. ज्ञान हे प्रौढ साक्षरता दर आणि एकूण प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय भरती गुणोत्तर यावरुन मापन केले जाते. आणि राहणीमान हे दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादनावरुन मोजले जाते. पहिले दोन निर्देशांक सामाजिक तर तिसरा निर्देशांक आर्थिक आहे. मानवी विकास ही संकल्पना मानव विकास निर्देशांकापेक्षा व्यापक आहे.

मानव विकास निर्देशांकातील या तीन निर्देशांकांचे प्रत्येकी चालू किंवा मूल्य आणि कमाल असावे असे मूल्य याचा विचार करुन देशांची क्रमवारी लावली जाते. प्रत्येक देशाने किमान कडून कमाल मूल्यापर्यंत किती प्रगती केली किवा मजल मारली ते टक्केवारीत मोजले जाते. या निर्देशकांत मानवास जगण्यासाठी पुरेसे असे पायाभूत उत्पन्नाच्या नंतर उत्पन्नाला दिलेला भार किंवा वेटेज हा एकदम कमी होतो. त्यामुळे इतर दोन निर्देशांकाना महत्त्व प्राप्त होते. मानव विकास निर्देशांक हा एवढ्यासाठी तयार करण्यात आला की, त्यातून देशाचा विकास ठरविण्यासाठी अंतिम अट ही आर्थिक विकास नसून देशातील लोक आणि त्याचे जीवन हे होय.

मानव विकास निर्देशांक तयार करताना वरील तीनही बाबीसाठी किमान आणि कमाल मूल्य (Value) ठरविण्यास आल्या. त्या पुढीलप्रमाणे आहेत :

**जन्मसमयी सरासरी आयुर्मान :** २५ वर्ष आणि ८० वर्ष.

**प्रौढ साक्षरता दर (१५ वर्ष व वर) :** शून्य टक्के आणि शंभर टक्के.

**एकत्रित एकूण नोंदणीचे प्रमाण:** शून्य टक्के आणि शंभर टक्के.

दरडोई वास्तव स्थू. दे. उ. (Real GDP)

खरेदीशक्ती समता डॉलर (PPPS) – १०० आणि ४०,००० (PPPS) त्याचे सर्वसाधारण सूत्र

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

समजा, जन्मसमयी सरासरी आयुर्मान ६५ आहे, तर सरासरी आर्युमान निर्देशांक -

$$= \frac{\text{प्रत्येक मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

$$= \frac{६५ - २५}{८५ - २५} = \frac{४०}{६०} = ०.६६६$$

मानव विकास अहवाल २००३ नुसार भारताची क्रमवारी नुसार क्रम १२७ असून मा. वि. निर्देशांक ०.५९०, वास्तव स्थूल देशांतर्गत उत्पादन दरडोई (PPPS) २८४० इतके आहे.

मानव विकास निर्देशांक देशातील, प्रांतातील, वंशिक, भाषिक, धार्मिक, समुहातील मोठ्या प्रमाणावरील तफावतींवर प्रकाश झोत टाकत असतो. मानव, विकास निर्देशांक हा अपेक्षित उद्दिष्टांकडे वाटचालीचा मापनदंड होय.

उच्च मानवी विकास गटात नॉर्वे प्रथम क्रमांकावर कॅनडा दुसर्या तर अमेरिका तिसर्या स्थानावर आहे. भारत मध्यम, मानव विकास गटात असून जागतिक क्रमावरील ११५ वा क्रमांक आहे. कनिष्ट मानव विकास पातळीत पाकिस्तान, बांगला देश इ. देश येतात.

मानव दारिद्र्य निर्देशांकात आयुर्मान, ज्ञान आणि राहणीमान या गुणात्मक लक्षणांचा अभाव मोजला जाते. याच बरोबर लिंग निगडीत विकास निर्देशांकामुळे लोकसंख्येचा गुणात्मक दर्जा लक्षात येतो.



## २.२ लिंग निगडित विकास निर्देशांक

लिंग निगडीत विकास निर्देशांक मानव विकास निर्देशांक सारखेच बदलचे मापन करत असतो. फक्त त्यात असमानतेचा विचार केला जातो. प्रत्येक देशातील जीवन आयुर्मान, साक्षरता आणि उत्पन्न यातील पुरुष आणि स्त्री यांच्या प्रगतीतील तफावतीचा विचार या निर्देशांकात स्त्रियांचा सामाजिक दर्जा यांचा विचार केला जातो. आणि यांच्या क्रमवारीवरुन स्त्री आणि पुरुष यांच्या प्रगतीतील देशातील फरकाची कल्पना येऊ शकते. भारतात राज्यनिहाय मानव विकास लक्षात घेतल्यास मोठी तफावत आढळते.

### १.५.१ GDI चे मोजमाप :

HDI वरुन सर्वसाधारण मानवी प्रगती मोजली जाते, तर GDI द्वारे स्त्री आणि पुरुष यांतील असमानता खालील तीन बाबींवरुन समजून घेता येते.

१) **दीर्घायु आणि सशक्त आरोग्य :** याचे मोजमाप जन्मकालीन आयुष्यमान यावरुन मोजता येते.

२) **ज्ञान :** प्रौढ साक्षरता दर आणि प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षण यांतील एकूण नोंदणी गुणोत्तर याद्वारे मोजला जातो.

३) **सुधारलेले राहणीमान :** याचे मापन अपेक्षित मिळविलेले उत्पन्न (PPP US) यावरुन केले जाते.

**GDI च्या मापनात खालील ३ पायर्या येतात :**

**१) पुरुष आणि स्त्री यांच्यासाठी वेगवेगळे निर्देशांकांचे मूल्यमापन करणे :**

या पहिल्या पायरीत स्त्री आणि पुरुष यांसाठी आयुष्यमान, राहणीमान, व शिक्षण या प्रत्येक संदर्भात वेगवेगळा निर्देशांक काढणे, त्यासाठी खालील सूत्राचा उपयोग करावा लागतो.

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य - किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य - किमान मूल्य}}$$

**२) प्रत्येक संदर्भात समान वितरीत निर्देशांकाचे मूल्यमापन :**

आयुष्यमान राहणीमान व शिक्षण या प्रत्येक संदर्भात स्त्री व पुरुष यांचे वेगवेगळे निर्देशांक संयुक्तिक (एकत्र) केले जातात.

**समान वितरीत निर्देशांक =**

$$= \left\{ \begin{array}{l} \left[ \text{स्त्रियांचा लोकसंख्येतील भाग} \left( \text{स्त्रियांचा निर्देशांक}^{१-\in} \right) \right] \\ + \left[ \text{पुरूषांचा लोकसंख्येतील भाग} \left( \text{पुरूषांचा निर्देशांक}^{१-\in} \right) \right] \end{array} \right\}^{\frac{१}{१-\in}}$$

येथे, $\in$ = असमानतेपासूनचे विचलन मोजले जाते,

GDI मध्ये $\in$ = २.

$\in$ चे मूल्य म्हणजे लिंग असमानता साठी दंडाचा आकार होय. $\in$ चे मूल्य जास्त असल्यास त्या देशात मोठ्या प्रमाणात लिंग असमानता दर्शविते.

$\in$ चे मूल्य ० असल्यास लिंग असमानता दंडात्मक नसते. जर GDI चे मूल्य $\in$ = २, तर लिंग असमानता मध्यम दंडात्मक असते.

अशाप्रकारे, लिंग निगडीत विकास निर्देशांक मापनाचे सर्वसाधारण सूत्र खालीलप्रमाणे असते.

समान वितरीत निर्देशांक =

$$= \left\{ \begin{array}{l} \left[ \text{स्त्रियांचा लोकसंख्येतील भाग} \left( \text{स्त्रियांचा निर्देशांक}^{-१} \right) \right] \\ + \left[ \text{पुरूषांचा लोकसंख्येतील भाग} \left( \text{पुरूषांचा निर्देशांक}^{-१} \right) \right] \end{array} \right\}^{-१}$$

वरील सूत्राद्वारे स्त्री आणि पुरुष निर्देशांकांचा हार्मोनिक मध्य (Harmonic Mean) काढता येतो. अशा रीतीने प्रत्येक संदर्भात समान वितरित निर्देशांक काढता येतो. उदा.

I. समान वितरित आयुष्यमान निर्देशांक.
II. समान वितरित शिक्षण निर्देशांक.
III. समान वितरित उत्पन्न निर्देशांक.

### ३) GDI चे मूल्यमापन :-

ही GDI काढण्याची तिसरी पायरी आहे. यामध्ये तिन्ही संदभार्तील समान वितरित निर्देशांक एकत्र करुन त्यांची सरासरी काढली जाते.

$$\text{GDI} = \frac{1}{3} \left[ \begin{array}{l} \text{समान वितरित आयुष्यमान निर्देशांक} + \text{समान वितरित शिक्षण} \\ \text{निर्देशांक} + \text{समान वितरित उत्पन्न निर्देशांक} \end{array} \right]$$

### १.५.२ भारतातील लिंग-निगडीत विकास निर्देशांक GDI :

खालील तक्त्यात भारतातील GDI चे मूल्य दाखविलेले आहे. त्यावरुन असे दिसते की, भारतातील GDI चे मूल्य इ.स. १९९३ मध्ये ०.४०१ पासून इ.स. २००६ मध्ये ०.५९१ पर्यंत वाढलेले आहे. तरीही भारताचे GDI चे मूल्य कमी आहे. GDI च्या जागतिक क्रमवारीत भारताचे स्थान इ.स. २००६ मध्ये १५७ पैकी ११६ वे आहे. GDI चे कमी

असलेले मूल्य आणि भारताचे गौण स्थान असे दर्शविते की, भारतातील त्रास सहन करावा लागतो. आणि लिंग-समानतेसाठी होणारे प्रयत्न अपुरे आहेत.

**भारतातील GDI ची आकडेवारी**

| **वर्ष** | **GDI चे मूल्य** | **GDI क्रमवारी** |
|---|---|---|
| १९९३ | ०.४०१ | ९९ |
| २००४ | ०.५९१ | ९६ |
| २००५ | ०.६०० | ११३ |
| २००६ | ०.५९१ | ११६ |

**□□□□□□□ : मानवी विकास अहवाल १९९५, २००६-०८.**

**१.५.३ इतर देशांतील GDI मूल्य आणि क्रमवारी :**

| **देश** | **GDI चे मूल्य** | **GDI क्रमवारी** |
|---|---|---|
| आइसलँन्ड | ०.९६३ | १ |
| चीन | ०.७६० | ७९ |
| श्रीलंका | ०.७३५ | ९० |
| भारत | ०.५९१ | ११६ |
| पाकिस्तान | ०.५३७ | १२१ |
| बांग्लादेश | ०.५१६ | १२८ |

□□□□□□□ : मानवी विकास अहवाल :सांख्यिकीय सुधारित २००८.

जगातील एकूण १५७ देशांपैकी फक्त ६२ देशांत GDI मूल्य ०.८ पेक्षा जास्त आहे. (२००६) म्हणजेच अतिशय थोड्या देशांत लिंग-समानतेसाठी प्राथमिक प्रयत्न केले जात आहेत. लिंग-समानता ही एखाद्या देशातील उत्पन्न पातळीवर अवलंबून नसते, तर त्या देशातील सरकारच्या लिंग-समानतेसाठी आखलेल्या धोरणांवर आणि स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या प्रयत्नांवर अवलंबून असते.

### १.५.४ GDI च्या मर्यादा :-

**१) GDI हे लिंग असमानतेचे खरे (वास्तविक) मापदंड नाही :**

GDI च्या मूल्यावरुन एखाद्या देशातील लिंग-असमानतेचे वास्तविक आकलन होत नाही. क्लॅसन यांच्यामते, GDI ची HDI शी तुलना केल्यावर असे दिसते की, GDI आणि HDI मधील फरक, जो संबंधित संदर्भातील असेल, त्यामुळे त्या देशांचा एकूण मानवी विकास निर्देशांक खाली येतो. उदा. भारतातील इ.स. २००६ मध्ये HDI आणि GDI मूल्य अनुक्रमे ०.६०९ आणि ०.५९१ होते. त्यामुळे एकूण निर्देशांकात ०.०१८ ने घट येते. जी इतर तीन संदर्भातील लिंग-असमानता दर्शविते.

**२) अर्जित उत्पन्नाचा अपुरेपणा :-**

GDI मधील अर्जित उत्पन्नाचा भाग पोषण, निवारा आणि वस्त्र यांतील लिंग-असमानता मोजू शकत नाही. प्रत्येक कुटुंबातील लिंग-असमानता लिंग-शक्तीने प्रभावित असते. तसेच स्त्रियांकडून जे घरगुती काम केले जाते, ज्याचा मोबदला त्यांना मिळत नाही, त्यामुळे अर्जित उत्पन्न निकष चुकीचा ठरतो. स्त्रियांचे विना-मोबदला काम मानवी विकासाला कोणतेही योगदान देत नाही असे दिसते. मुलांचे संगोपन आणि घरातील सदस्यांची सेवा, काळजी घेणे इ. मुळे खरे तर मानवी विकासाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन मिळते. किंबहुना स्त्रियांच्या अशा बिनामोबदला कुटुंबासाठी घेतलेल्या परिश्रमांनीच मानवी विकास घडून येतो. भारतात स्त्री शिकली तर ती त्या कुटुंबाचा सर्वतोपरी विकास करते असे चित्र आहे. पण त्यासाठी कोणताही पैशातील मोबदला मिळत नाही वा स्त्री देखील अशा मोबदल्याच्या अपेक्षेने काम करीत नाही.

अशाप्रकारे वरील मर्यादा असल्या तरी GDI मुळे जागतिक पातळीवर लिंग-समानतेसाठी प्रयत्न केले जात आहेत. आणि लिंग-असमानता कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## २.४ हरित जीडीपी

हरीत सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) हा महत्त्वाचा आणि नविन विषय आहे.

हरित सकल देशांतर्गत उत्पादन, किंवा थोडक्यात हरित GDP, हे देशाच्या प्रमाणित GDP सोबत विचारात घेतलेल्या पर्यावरणीय घटकांसह आर्थिक वाढीचे सूचक आहे. "कार्बन डायऑक्साइड प्रति वर्ष किंवा "दरडोई कचरा" सारखे भौतिक निर्देशक "शाश्वत विकास निर्देशांक" सारख्या निर्देशांकांमध्ये एकत्रित केले जाऊ शकतात.

**ग्रीन जीडीपीची गणना कशी केली जाते?**

ग्रीन GDP ची गणना प्रमाणित GDP मधून निव्वळ नैसर्गिक भांडवली उपभोग वजा करून केली जाते. यामध्ये संसाधनांचा ऱ्हास, पर्यावरणाचा ऱ्हास आणि संरक्षणात्मक पर्यावरणीय उपक्रमांचा समावेश आहे. ही गणना वैकल्पिकरित्या निव्वळ देशांतर्गत उत्पादनावर (NDP) लागू केली जाऊ शकते, जी जीडीपीमधून भांडवलाचे अवमूल्यन वजा करते. प्रत्येक

बाबतीत, कोणत्याही संसाधन उत्खननाच्या क्रियाकलापांना आर्थिक मूल्यामध्ये रूपांतरित करणे आवश्यक आहे कारण ते राष्ट्रीय लेखांकनाद्वारे व्यक्त केले जातात.

## २.५ "डॉ. अमर्त्य सेन यांचा क्षमता विकास दृष्टीकोन"

मागील काही दशकांत, गरीबी, असमानता आणि मानवी विकास यांच्या बाबतीतील प्रमाणित आर्थिक विश्लेषणाला पर्याय म्हणून डॉ. सेन यांचा क्षमता विकास दृष्टीकोन पुढे आला आहे. १९८० पासून आपल्या अनेक पुस्तकांतून, लेखांतून डॉ. सेन यांनी असा एक आकृतीबंध मांडला की, ज्याचा प्रत्यक्ष संबंध मानवी क्षमता आणि स्वातंत्र्य यांच्याशी आहे. सेन यांच्या या क्षमता-विकास दृष्टीकोनाने युनोला मानवी विकास निर्देशांक (HDI) निर्मितीसाठी प्रेरणा दिली. डॉ. सेन यांना १९९८ साली विकास आणि कल्याणकारी अर्थशास्त्र यांच्या आंतरसंबंधावरील संशोधनाला 'नोबेल पारितोषिक' देण्यात आले. आंतरराष्ट्रीय समुदायाने त्यांच्या या संदर्भातील संकल्पना आणि विचारांची दखल घेतली.

डॉ. सेन यांच्यानुसार, "कार्य करण्याची क्षमता" हीच एखादी व्यक्ती गरीब की श्रीमंत हा त्याचा दर्जा ठरविते. त्यांच्या मते, "आर्थिक वाढ म्हणजे गरजांची पूर्तता नव्हे. मानव (आपण) जे जीवन जगतो आणि जी स्वातंत्र्ये उपभोगतो त्यांचा दर्जा वाढविण्याशी विकासाचा संबंध असला पाहिजे."

त्यांच्यामते, पारंपारिक आर्थिक विकासाच्या अर्थशास्त्राची मुख्य मर्यादा म्हणजे त्याने राष्ट्रीय उत्पादन, एकूण उत्पन्न, विशिष्ट वस्तूचा एकूण पुरवठा यावर भर दिलेला होता. त्यापेक्षा या आर्थिक परिमाणांवर व्यक्तिंची किती मालकी आहे आणि त्यांची क्षमता किती विकसित होते हे पाहिले पाहिजे. मालकी हक्क आणि क्षमता-विकासाचा विस्तार यांच्याशी आर्थिक विकासाचा संबंध असला पाहिजे.

डॉ. अमर्त्य सेन यांचा 'क्षमता-विकास दृष्टीकोन' खालील प्रमुख संकल्पनाद्वारे स्पष्ट करता येतो.

### १) अधिकार प्रदानता किंवा हक्क प्रदानता (Entitlement) :

अधिकार प्रदानता / हक्क प्रदानता म्हणजे "अशा पर्यायी वस्तूंचा संच जो एखादी व्यक्ति नियंत्रित करु शकते, जेव्हा ती व्यक्ती आपले अधिकार आणि संधी यांचा समाजात वापर करते." अधिकार प्रदानता काही गोष्टी करण्याची क्षमता निर्माण करते. अधिकार प्रदानता स्वाभिमान आणि जीवन निरंतरता देते. पुष्कळशा व्यक्तिंसाठी, अधिकार प्रदानता वस्तूंच्या किंमती आणि त्यांची श्रम विकण्याची क्षमता यांवर अवलंबून असते. शाळा आणि आरोग्य केंद्रे यांसारख्या साधनसामग्रीचे समाजातील क्षेत्रीय वितरण, समाजातील विविध दबावगटांचे वजन आणि सरकारकडून व्यक्ति कोणते हक्क मिळवू शकतात. इ. सर्वांवर अधिकार प्रदानता / हक्क प्रदानता प्रामुख्याने अवलंबून असते.

### २) विविध क्षमता (Capabilities) :

अधिकार प्रदानता व्यक्तिंत विविध क्षमता निर्माण करते. कोणत्याही व्यक्तिची उपयोगिता त्याच्या क्षमतेवरुन ठरते. उदा. "ती काय करु शकते व काय नाही? किंवा काय करेल वा

नाही." अशा प्रकारे सेन यांच्या मते, गरीबी ही उत्पन्नावरुन किंवा अगदी उपयोगितेवरुन ही योग्य प्रकारे मोजता येत नाही, जे परंपरागतपणे मानले जाते. सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे व्यक्तिकडे काय आहे, त्यापेक्षा ती व्यक्ति काय आहे, ती काय बनु शकेल किंवा काय करते किंवा करु शकते ही आहे. व्यक्तिंचे कल्याण त्यांनी उपभोग घेत असलेल्या वस्तूंच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून नसते, परंतू त्या वस्तूंचा उपयोग व्यक्ति कसा आणि कशासाठी करते यावर अवलंबून असतो. अशा रीतीने, सेन यांच्यानुसार, गरीबी ही अंतिमत: उत्पन्नावर अवलंबून नसते, तर ती किमान क्षमताही निमाण न झाल्यामुळे आलेले अपयश नसते, तर ती किमान क्षमताही निर्माण न झाल्यामुळे आलेले अपयश असते. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, मनुष्यप्राणी कशाप्रकारे कार्य करतो यांवरच फक्त भर न देता, त्याबरोबरच त्यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण पद्धतीने कार्य करण्याची क्षमता असली पाहिजे. काही व्यक्ति अशा प्रकारच्या क्षमतांपासून वंचित असतात कारण त्यांचे अज्ञान, सरकारचा दबाव, आर्थिक स्त्रोतांची कमतरता किंवा चुकीची जाणीव इ. असू शकतात.

### ३) क्रियाशीलता (Functioning) :-

डॉ. सेन यांच्या मते, मानवी कल्याण आणि गरीबी हे वस्तूंच्या उपलब्धतेवर अवलंबून नसते, परंतू उपभोक्त्याला त्याचा किती उपयोग / उपयुक्तता आहे यांवर अवलंबून असते. उदा. एखाद्या अशिक्षित व्यक्तिला पुस्तकांचे मूल्य अतिशय कमी आहे. त्याच्यासाठी पुस्तक हे उच्च दर्जाचे प्रतिक असण्याऐवजी इंधनाचे एक साधन असू शकते. सेन यांनी 'कल्याण' संकल्पनेचे 'क्रियाशीलता' या संकल्पनेबरोबर विश्लेषण केले आहे. क्रियाशीलता किंवा कार्यात्मकता म्हणजे "दिलेल्या वैशिष्टपूर्ण वस्तू एखाद्या व्यक्तिच्या ताब्यात आल्यावर किंवा नियंत्रणाखाली आल्यावर ती व्यक्ति त्यांचा कशाप्रकारे उपभोग घेते ते होय."

सेन यांच्या मते, "क्रियाशीलता किंवा कार्यात्मकता एखादी व्यक्ती ज्या वस्तू / गोष्टी करण्यास महत्त्व देते किंवा राखून ठेवते ते प्रतिबिंबित करते. मौल्यवान क्रियाशीलता प्राथमिक स्वरुपाच्या वस्तूपेक्षा वेगळी असते." उदा. टाळता येणार्या रोगांपासून मुक्त आणि योग्यप्रकारे पालनपोषण केलेली व्यक्ति ते अत्यंत गुंतागुंतीच्या क्रिया किंवा वैयक्तिक बाबी ज्या व्यक्तिचा स्वाभिमान दर्शवितात वा व्यक्ति सामाजिक कार्यक्रमात भाग घेत असते. व्यक्तिंच्या कल्याणासंबंधातील इतर दृष्टकोनापेक्षा क्षमता-विकास दृष्टीकोनातील क्रियाशीलता वा कार्यात्मकता यावर विशेष भर दिलेला आहे.

### ४) प्रत्यक्ष फायदे आणि वास्तविक उत्पन्न यामधील फरक (Differences between Real Income & Actual Income) :

डॉ. सेन यांच्या मते, वास्तविक उत्पन्न आणि प्रत्यक्ष फायदे यामध्ये फरक उत्पन्न होण्याचे पाच विविध स्त्रोत आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

i. वैयक्तिक भिन्नता उदा. ज्या व्यक्तिच्या अपंगत्व, वय, लिंग वा आजारपण इ. शी संबधित असतात.
ii. पर्यावरणात्मक विभिन्नता, उदा. उष्णता आणि हिवाËयातील कपड्यांची गरज, विषुववृत्तीय प्रदेशातील संसर्गजन्य रोग किंवा प्रदूषणाचे परिणाम.

iii. सामाजिक पर्यावरणातील बदल, उदा. गुन्हेगारी आणि हिंसा यांचे समाजातील प्रमाण आणि सामाजिक भांडवल.

iv. परस्परसंबंधातील विभिन्नता, याचा अर्थ विभिन्न समुदायात, परंपरा आणि चालीरिती, यांवर आधारित स्थापित वर्तनपद्धती असतात त्यात विविध वस्तूंचा उपभोग समाविष्ट असतो. उदा. श्रीमंत वर्गातील व्यक्तिंचे वस्त्र परिधान संबंधी उच्च दर्जाचे महागडे कपडे वापरण्याची पद्धत समाजात वावरताना असते. त्यांचे इतर उपभोग देखील अवास्तव स्वरुपाचे असतात. तर गरीब वर्गात हाच उपभोगखर्च वेगळा आणि कमी स्वरुपाचा असतो.

v. कुटुंबातील वितरण म्हणजे कौटुंबिक उत्पन्न स्त्रोतांचे कुटुंबातील सदस्यांमधील असमान वाटप. उदा. कुटुंबातील मुलांवर मुलींपेक्षा शिक्षण वा वैद्यकीय बाबींवर जास्त खर्च केला जातो.

अशाप्रकारे, सेन यांच्या मते, वास्तविक उत्पन्नपातळी किंवा विशिष्ट वस्तूंच्या उपभोगाची पातळी हे कल्याणाच्या मोजमापाचे योग्य मापदंड होऊ शकत नाही. उदा. एखाद्या व्यक्तिकडे अनेक वस्तू असतील, परंतू त्या वस्तू त्यांच्या इच्छेनुसार नसतील तर त्या वस्तूंचे मूल्य अतिशय कमी असते. अशा रीतीने, व्यक्तीची क्रियाशीलता किंवा कार्यात्मकता ही त्याची उल्लेखनीय कामगिरी असते. व्यक्तिजवळ असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण वस्तूंचा उपभोग घेतल्यामुळे व्यक्ति कामगिरी करण्यात यशस्वी होते. दुसर्या शब्दात, व्यक्तिचे कल्याण त्याच्या क्रियाशीलतेवर वा कार्यात्मकतेवर अवलंबून असते. म्हणजेच व्यक्ति त्याच्या ताब्यातील वस्तूंचा उपयोग करुन आपले कल्याण साधते. अशा रीतीने, वैशिष्टपूर्ण वस्तूंचे क्रियाशीलतेमध्ये रुपांतर करण्यासाठी आरोग्य, शिक्षण यांच्याबरोबरच उत्पन्नाची आवश्यकता असते.

**५) स्वातंत्र्य (Freedom) :**

सेन यांनी विविध प्रकारच्या क्षमतांनाच स्वातंत्र्ये असे संबोधले आहे ज्या व्यक्तिजवळ क्रियाशीलतेची निवड करताना असतात, त्या व्यक्तिच्या वैयक्तिक गुणवैशिष्टे आणि त्याच्या ताब्यातील वस्तूंवर अवलंबून असतात. संबंधित क्षमता विविध प्रकारच्या असतात. उदा. उपासमारी, भूक यांपासून मुक्तता, कुपोषणापासून मुक्तता, सामाजिक जीवनातील सहभाग, योग्य प्रकारचा निवारा असणे, मित्र व नातेवाईकांना भेटण्यासाठी मुक्त असणे, इ. क्षमता-विकास दृष्टीकोनामध्ये, व्यक्ति ज्या गोष्टींना मानतात, महत्त्व देतात, त्या पूर्ण करण्याची खरी संधी मिळणे याच्याशी स्वातंत्र्य संबंधित असते.

विकासाची परिपूर्ती करण्याचा मुख्य साधन तसेच विकासाचे उद्दिष्ट म्हणजेच स्वातंत्र्य असे सेन मानतात. स्वातंत्र्यामध्ये समाज आणि समाजाचे सदस्य यांच्यासाठी विस्तारलेल्या निवडी यांचाही समावेश असतो. विकासामध्ये, व्यक्तिंवरील विविध बंधने किंवा पारतंत्र्य यांच्या निर्मूलन अपेक्षित असते, जिथे व्यक्ति कमीत कमी संधी आणि निवडी यामध्ये जगतात. प्रमुख प्रकारच्या पारतंत्र्यामध्ये यांचा समावेश असतो. तसेच राजकीय स्वातंत्र्याचा अभाव, मूलभूत समावेश होतो. सेन यांच्या मते, विकास म्हणजे व्यक्तिंनी उपभोगण्याच्या खर्या स्वातंत्र्यांच्या विस्ताराची प्रक्रिया असली पाहिजे.

### २.१.१ टीकात्मक समीक्षण :

डॉ. सेन यांच्या क्षमता विकास दृष्टीकोनावर अनेक मुद्‌द्यांवर टीकात्मक समीक्षण करण्यात आले आहे.

#### १) क्षमतांचे मूल्यमापन करणे कठीण आहे :

सेन मानत असलेल्या क्रियाशीलता वा क्रियात्मकता आणि कल्याण या संकल्पनेबाबत अनेक व्यक्तींमध्ये असलेली असहमती यामध्ये पुष्कळ अंतर असल्यामुळे, सेन यांचा दृष्टीकोन प्रत्यक्षात आणणे अशक्य आहे. असे म्हटले जाते की सेन यांचा क्षमता-विकास दृष्टीकोन खालील बाबतीत पुरेशी दिशा देऊ शकत नाही.

i. मौल्यवान क्षमता कशा प्रकारे ओळखायच्या?
ii. धोरणात्मक आर्थिक निर्णय कशाप्रकारे घ्यायचे की जे क्षमता विकासाला प्राधान्य आणि प्रमाण देतील?
iii. जेव्हा मूल्यात्मक निर्णय एकमेकांशी विवादास्पद बनतील तेव्हा काय करायचे?
iv. क्षमतांचे संच कशाप्रकारे मूल्यमापन करायचे की एखादी व्यक्ति आर्थिक सुधारणांद्वारे झालेल्या बदलांचे मूल्यमापन करता येईल?

टीकाकारांचे असे म्हणणे आहे की मानवी क्रियाशीलतेसाठी वस्तूनिष्ठ प्रमाणके निर्धारित करण्याची गरज आहे. आणि अशी प्रक्रिया ठरविली पाहिजे की, ज्याद्वारे क्रियाशीलतेचे चांगल्या मानवी जीवनासाठीच्या योगदानाचे वस्तूनिष्ठ समीक्षण तपासता येईल.

#### २) कोणतीही क्षमता अमूल्य आहे असे वर्गीकरण करणे शक्य नाही :-

डेव्हिड क्रोकर यांच्या मते, सेन यांचा क्षमता विकास दृष्टीकोन क्षमतांचे अमूल्य असे वर्गीकरण करु शकत नाही. त्यांच्या मते, सेन यांचे गृहीतक की क्षमता याचा व्यक्तिच्या अदृश्य शक्ती (सुप्त गुण) पेक्षा संधी असतात. त्यामुळे मौल्यवान क्षमता व वाईट क्षमता यामध्ये भेद करणे कठीण आहे. तसेच अशीही टीका केली जाते की, सेन यांचा दृष्टीकोन स्वातंत्र्याच्या साधनांना पुरेसे महत्त्व देण्यात अपयशी ठरतो. टीकाकारांच्या मते, फक्त एवढेच आवश्यक नाही की कोणत्या क्षमता कल्याणासाठी आवश्यक आहेत तर त्यापैकी कोणत्या नैतिक स्वरुपाच्या आहेत हे ही सांगणे आवश्यक आहे.

#### ३) मूल्यांकनासाठी पद्धत दिलेली नाही :-

सामाजिक निवड, मौलिक निर्णय, प्रतिसादपणा यासाठी वैयक्तिक आणि सामाजिक उद्दिष्टांची बाह्य छाननी कण्याची गरज सेन यांनी नियमितपणे संबोधित केली आहे. परंतु कोणत्या प्रक्रियेद्वारे मूल्यात्मक बाबी सोडविता येतील हे स्पष्ट केलेले नाही. जे ग्लोवर यांच्या मते, मुल्ये आणि तत्वे जी व्यक्तिच्या क्रियांना दिशा देतात. त्यांचे अधिक संक्षिप्त विवरण देणे आवश्यक आहे.

वरील सर्व टीका असला तरी, सेन यांचा दृष्टीकोन आंतरराष्ट्रीय स्तरांवर लोकप्रिय झाला आहे. असे म्हटले जाते की मानवी विकास आणि गरीबी निर्मुलन ही दोन्ही उद्दिष्टे व्यक्तिच्या क्षमतांचा विस्तार करण्यासाठी असली पाहिजेत. मौल्यवान कृत्ये करण्यासाठी व्यक्तिंना

अधिग्रहित वा विकसित करता येतील. यापुढेही, व्यक्ति त्यांना आवश्यक असणार्या बाबींची निवड करु शकतील.

**आपली प्रगती तपासा :-**

1. मानवी विकास म्हणजे काय?
2. मानवी विकास निर्देशांक व्याख्या लिहा.
3. लिंग-निगडीत विकास निर्देशांक म्हणजे काय? त्याचे मोजमाप कशा प्रकारे करतात?
4. डॉ. अमर्त्य सेन यांच्या क्षमता विकास दृष्टीकोनाचा मुख्य हेतू सांगा.
5. डॉ. सेन यांच्या क्षमता विकास दृष्टीकोनातील प्रमुख संकल्पना कोणत्या?

## २.६ सहस्त्रकातील विकासाची ध्येये (MILLENNIUM DEVELOPMENT GOALS)

**प्रास्ताविक :**

संयुक्त राष्ट्रसंघाचे (UNO) सरचिटणीस कोफी अन्नान यांनी २००२ मध्ये जेफ्री सॅक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. या समितीत जगातील वेगवेगळ्या तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला होता. या समितीत सन २००५ मध्ये जागतिक पातळीवर या सहस्त्रकातील विकासाची ध्येयासंबंधी भिन्न व्यक्ती व सहसंस्थाच्या प्रतिक्रिया मागविल्या होत्या. सन २००६ मधील अंतिम अहवालाला यूनाने मान्यता दिली. या बैठकीला १९३ सभासद देशांनी ३००० पेक्षा जास्त बिगर सरकारी संघटना आणि २३ आंतरराष्ट्रीय संघटना उपस्थित होत्या त्यांनी आपली सहमती दर्शविली. जगातील अतिगरीब देशांच्या विकासाला चालना देऊन त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे हा उद्देश होता. एकूण आठ ध्येये होती. ती २०१५ पर्यंत पूर्ण करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली होती. सहस्त्रकातील विकासाची ध्येये पुढीलप्रमाणे दर्शविली आहेत.

### १) आत्यंतिक दारिद्र्य आणि भूक यांचे निर्मूलन करणे (Eradicate Extreme Poverty and Hunger) :

यूनोने आपल्या स्थापनेपासून अति दारिद्र्य देशातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आर्थिक आणि इतर मदत देते तसेच यूनो IMF, ADB, IBRD यांचे अर्थसाहाय्य घेऊन ही दारिद्र्य यूनोला कमी करता आले नाही त्यांची खंत होती. म्हणून सहस्त्रकातील विकासाची ध्येये ठरविताना दारिद्र्य निर्मूलनाला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले. अति-दारिद्र्याचा निकष ज्या व्यक्तीचे दररोजचे उत्पन्न एक डॉलरपेक्षा कमी आहे त्यांना आत्यंतिक दारिद्र्यातील व्यक्ती संबोधले. त्यांचा राष्ट्रीय उपभोगातील हिस्सा अगदी कमी असतो.

जागतिक दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी जागतिक बँक वेगवेगळ्या देशांतील सरकारला सुरुवातीपासून आर्थिक व तांत्रिक मदत करत आहे. एकूण २२ सामाजिक व

आर्थिक निर्देशकांच्या साहाय्याने यशाचे मापन केले जाते. सन २०११-१२ मधील आशियाई-पॅसिफिक विभागीय सहस्त्रकातील विकासाची ध्येये अहवालानुसार भारतात गेल्या दहा वर्षातील दारिद्र्य निर्मूलनाचा वेग अतिशय कमी होता. सन १९९४ मध्ये भारतातील ४९.४% लोक प्रत्येक दिवशी १.२५ डॉलरपेक्षा कमी उत्पन्न गटातील होते. सन २००५ मध्ये हे प्रमाण ४१.६% एवढे कमी झाले. दक्षिण आशियाई देशांच्या तुलनेत भारतातील दारिद्र्य घटण्याचे प्रमाण कमी आहे. २००५ मध्ये बांगला देशात ४९.६%, पाकिस्तान २२.६%, श्रीलंका ७% तर तुर्कस्तान २.७% एवढे होते.

कृषिक्षेत्रात मोठी गुंतवणूक करुन रोजगार निर्मिती करुन दारिद्र्य आणि भुकेचा प्रश्न सोडवला जाऊ शकतो. पौष्टिक आहाराचा पुरवठा दोन वर्षाच्या आतील मुलांना करुन दारिद्र्य निर्मूलन करता येते. वेतनामध्ये वाढ करुन गरिबांची आर्थिक स्थिती सुधारता येते. शाळा, रस्ते, दवाखाने, आरोग्याच्या सोई देऊन, जागतिक बँकेच्या सहकार्याने व आंतरराष्ट्रीय विकास संघटनेच्या कर्जमाफी धोरणाने गरिबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करता येईल. आंतरराष्ट्रीय संस्थांकडून तांत्रिक मदत दिली जाते. लहान मुलांना मध्यान्ह भोजनाची सोय जागतिक बँकेमार्फत केली जाते. अन्न सुरक्षितता योजनेअंतर्गत शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासाठी मोठ्या प्रमाणात कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. ८४% देशात दारिद्र्याचे प्रमाण निम्म्यावर आणण्यात यश आले. दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले की दरडोई उत्पन्नात वाढ होते. त्यामुळे लोकांना अन्नधान्य मिळते भुकेचा प्रश्न नाहीसा होतो.

**२) सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण साध्य करणे (Achieve Universal Primary Education) :**

शिक्षणामुळे समतोल सामाजिक आणि आर्थिक विकास होतो. शिक्षणामुळे वैयक्तिक आणि सामाजिक अधिकार प्राप्तीच्या संधी मिळतात. शिक्षणामुळे लोकांना कौशल्य आणि ज्ञानात वाढत. त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. देशाच्या विकासात ही शिक्षणाची भूमिका महत्त्वाची भूमिका असते. ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींना जवळच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा कायदा २०१० पासून लागू करण्यात आला. मोफत शिक्षण हा सर्वांचा अधिकार आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण कार्यक्रमानुसार विद्यार्थ्यांचा राहत्या घरापासून १.५ किमीच्या अंतरात शिक्षणाच्या सुविधा असणे गरजेचे आहे. हे धोरण राबविण्यासाठी जिल्हा परिषदांना अनुदान देते. १५ ते २४ वर्षे वयातील सर्व मुला-मुलींना शिक्षणासाठी सुविधा पुरविणे हे सरकारच मुख्य कर्तव्य ठरते. सन २०१५ पर्यंत सर्व जगातील मुला-मुलींनी प्राथमिक शिक्षण दिले पाहिजे. भारतात सन २००० मध्ये ८५% मुला-मुलींना प्राथमिक शिक्षणाच्या प्रवाहात आणले ते सन २००८ मध्ये ९६.९% झाले. बांगलादेश ८९.४%, भूतान ८८.४%, इराण ९९.६%, नेपाळ ७३.६% आणि पाकिस्तान ६६.४% आहे.

सहारा विभागात सहस्त्रकातील विकासाची ध्येये सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण या लक्ष्यात प्रगती झाल्याचे आढळते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे शिक्षक-पालक संघटनांनी आणि समाजाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फी मध्ये भागीदारी केली. तसेच त्याबरोबर क्रमिक पुस्तके, गणवेश आणि अन्य खर्चामध्ये समाजाने दायित्व स्वीकारले. इथिओपिया, घाना, केनिया, मालवी, मोझांबिक, युगांडा, टांझानिया या लोकसत्ताक देशांनी शाळेची फी रद्द केली. त्यामुळे विद्यार्थ्यांची पट संख्या वाढली. उदा. सन २००४-५ मध्ये घानामधील

पब्लिक स्कूल मधील पटसंख्या ४.२ दशलक्षावरुन ५.४ दशलक्ष पर्यंत वाढली. केनियातील पटसंख्या २००३ मध्ये १.२ दशलक्षावरुन २००४ मध्ये ७.२ दशलक्ष एवढी झाली.

भारतात सर्व शिक्षा अभियान राबविले जाते. समाजात्मक दर्जा शिक्षणाचा केंद्रबिंदू मानून सर्व सामाजिक आणि तीव्र भेदावर आधारित विषमता कमी करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. मूलभूत शिक्षणासाठी लागणार्या सर्व योजना सर्व शिक्षा अभियानातून राबविण्यात येतात. या अभियानामुळे विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण कमी झाले. संगणक प्रयोगशाळा, मोफत पुस्तके, कौशल्य प्रशिक्षण, वर्गखोल्या इ. सुविधा पुरविल्या जातात. विकलांग मुलांना शिक्षण मिळावे म्हणून विकलांग समावेशक शिक्षण कार्यक्रम राबविला जातो. या कार्यक्रमातून मुलांची वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना ब्रेल पुस्तक, चष्मा, श्रवणयंत्र यासारखी उपकरणे व इतर सुविधा दिल्या जातात. मुलीच्या शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, अहिल्याबाई होळकर योजना, उपस्थिती भत्ता योजना, मोफत प्रवास, मध्यान्ह भोजन योजना, मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो.

### ३) लिंग समानता आणि स्त्रियांचे सबलीकरण करण्यात वाढ करणे (Promote gender equality and empower woman) :

सहस्त्रकातील विकासाची ध्येये निश्चित करताना स्त्री-पुरुष समानतेला महत्त्वाचे स्थान देण्यात आले. महिला सक्षमीकरण ही एक प्रक्रिया आहे. ज्यावेळी एखादी स्त्री स्वत:साठी किंवा कुटुंबासाठी नियोजन करेल आणि त्या नियोजनाला अनसरुन योग्य निर्णय घेऊन अपेक्षित उद्दिष्ट्ये साध्य करेल त्यावेळी तिला सक्षम म्हणता येईल. महिलांचे संघटन महिला सक्षमीकरणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. महिलांना संघटित करण्यासाठी स्वयंसाहाय्यता गट हे चांगले माध्यम आहे. स्वयंसाहाय्यता गटामुळे महिला आर्थिक दृष्ट्या सबल होऊन कुटुंब आणि समाजाचा विकास करतात. आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीच्या मदतीने देशात ग्रामीण महिला सक्षमीकरणाचा कार्यक्रम राबविला आहे. त्यामधून गरीब महिलांमध्ये त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आर्थिक व राजकीय क्षेत्रातील पर्याय आणि संधीचा वापर करण्याची क्षमता निर्माण होते.

प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तांत्रिक शिक्षण आणि उच्च शिक्षणामध्ये मुले व मुलि मध्ये समानता प्रस्थापित करणे. स्त्रियांची बिगर कृषी क्षेत्रातील वेतनात वाढ करणे. संसद, विधानसभा व इतर क्षेत्रातील प्रमाण वाढविण्यासाठी कायदेशीर तरतुदी केल्या आहेत. स्त्रियांचे रोजगारातील प्रमाण वाढत आहे. सार्वजनिक संस्थामध्ये स्त्रियांचे प्रमाण वाढत आहे. भारतात सन २००१ मध्ये स्त्रियांच्या सबलीकरणाचे राष्ट्रीय धोरण राबविले आहे.

### ४) बालमृत्यूच्या प्रमाणात घट घडवून आणणे (Reduce Child Mortality Rate):

प्रतिवर्षी दरहजारी मृत्युमुखी पडणार्या बालकांची संख्या म्हणजे बाल मृत्युप्रमाण होय. साधारणपणे मुल जन्माला आल्यापासून ते एक वर्षाचे होई पर्यंत त्याच्या मृत्युचे प्रमाण जास्त असते. यालाच आपण अर्भक मृत्यु असे म्हणतात. मुल दुसर्या वर्षापासून ते पाचव्या

वर्षापर्यंत मृत्युची शक्यता अर्भक मृत्युपेक्षा कमी असते. त्यानंतर ५ ते १४ वर्षापर्यंत मर्त्यता प्रमाण वेगाने कमी होते. १० ते १४ वयोगटातील मृत्युचे प्रमाण सर्वात कमी असते. सन १९६१ मध्ये भारतातील बालमृत्युचे प्रमाण ११५ होते. त्यात घट होऊन सन २००० मध्ये ६९ झाले. त्याचवेळी चीनमध्ये ३२ व जर्मनी आणि जपान मध्ये ४ इतके होते.

दारिद्र्य अवस्थेत असलेल्या कुटुंबात बालमृत्युचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे ते आपले कुटुंब मोठे असावे अशा अपेक्षा करतात. अशा कुटुंबासाठी आरोग्याच्या आणि वैद्यकीय सोई अधिक प्रमाणात दिल्यास, साथीच्या रोगांवर नियंत्रण ठेवल्यास आणि साक्षरता प्रमाण वाढविल्यास बालमृत्युचे प्रमाण कमी होते. सहा वर्षापेक्षा लहान बालके गर्भवती स्त्री व स्तनदा माता यांचे आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी तसेच शालेय पूर्व शिक्षणास उत्तेजन देणे यासाठी मूलभूत सेवा पुरविणे हे एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. तसेच त्यांना आरोग्यविषयक सुविधा देण्यासाठी पूरक पोषण आहार कार्यक्रम राबविला जातो.

**सन २००८ मधील निवडक आशियाई देशातील बाल-मृत्युप्रमाण**

| अ.न. | देश | बालमृत्युप्रमाण |
|---|---|---|
| १) | अफगाणिस्तान | १०३ |
| २) | पाकिस्तान | ७० |
| ३) | भारत | ४८ |
| ४) | भूतान | ४४ |
| ५) | नेपाळ | ४१ |
| ६) | बांगलादेश | ३८ |
| ७) | इराण | २२ |
| ८) | मालदीव | १४ |
| ९) | श्रीलंका | १४ |
| १०) | तुर्कस्थान | १४ |

### ५) मातांच्या आरोग्यात सुधारणा घडविणे :

मातांच्या आरोग्यात सुधारणा करण्यासाठी केलेली गुंतवणूक ही उत्पादक गुंतवणूक असते. कारण त्यामुळे देशातील स्त्रीयांच्या श्रमशक्तीत वाढ होते. त्यामुळे देशाचे आणि समाजाचे कल्याण होते. ज्या मातांना प्रसुतीकाळात पुरेशी वैद्यकीय मदत मिळाली नाही अशा लाखों महिला अपंग, दुर्बल झाल्या असून त्यांच्यामुळे त्याच्या कुटुंबाची क्षमता कमी झाल्याची आढळते. जागतिक बँकेने अशा मातांच्या आरोग्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे सन १९९० ते २००५ या काळात जगात मृत्युमुखी पडणार्या मातांचे

प्रमाण १% पेक्षा कमी झाले आहे. जागतिक बँकेने या कार्यक्रमावर लक्ष दिलेले आहे. त्यातून नवनवीन उपक्रम राबविले जातात. कुटुंब नियोजन कार्यक्रम, सकस आहार, कुटुंबनिहाय प्रसुती, त्यासाठी सोई, सुविधा व नावीण्यपूर्ण पद्धतीच्या साहाय्याने अर्थसाहाय्य यावर भर दिला जातो. मुले व मुली यांच्या शिक्षणावर खर्च करुन अल्पवयीन मातृत्व कमी करण्यासाठी प्रयत्न केला जातो. स्त्रियांच्या सक्षमीकरणावर भर दिला जातो. प्रसुतिकालीन मदत मोठ्या प्रमाणात दिली जाते.

मातांच्या आरोग्यात सुधारणा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय विकास संस्था आणि जागतिक बँकेने गरीब देशांना मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. सन २००० ते २०१० या १० वर्षाच्या कालावधीत ४७ लाखापेक्षा अधिक व्यक्तींना याचा लाभ झाला आहे. या काळात जगातील २.५ लाख मातांची काळजी घेतली गेली. जागतिक बँकेने आरोग्य, रोगनियंत्रण माता संगोपन आणि बाल संगोपन यासाठी ४.१ डॉलर खर्च केला होता. सन २००३ मध्ये अफगाणिस्तानमध्ये ६% मातांची प्रसूती ही प्रशिक्षित दाईकडून होत होती ते प्रमाण वाढून २००९ मध्ये २३% झाले. सन २००४ मध्ये उझबेकिस्तानमध्ये ७९% मातांना मातृत्व मदत मिळत होती ज्यात वाढ होऊन २००८ मध्ये ८६% झाले. सन २०१५ पर्यंत १००% मातांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करुन देण्याचे लक्ष आहे.

### ६) एच.आय.व्ही (एडस्, मलेरिया आणि अन्य रोगांविषयी हल्ला करणे (Combat HIV / AIDS, Malaria and other diseases) :

जागतिक पातळीवर एड्सच्या नियंत्रणासाठी १५ ते २४ वर्षे वयोगटातील स्त्री-पुरुषांनी निरोध वापरणे सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे. १५ ते ४९ वर्षे वयाच्या स्त्री-पुरुषांनी संतती प्रतिबंधक साधने वापरताना निरोधचा वापर करावा. तसेच संतती प्रतिबंधनाचा आधुनिक पद्धतींचा अवलंब केला पाहिजे. त्यांचे शिक्षण दिले पाहिजे. HIV पासून सुरक्षित राहण्याचा त्यांचा प्रयत्न पाहिजे. सन २०१५ पर्यंत मलेरियाचे जगातून उच्चाटन झाले पाहिजे. टी.बी. चा आजारी लाखात एखादाच राहिला असे धोरण असले पाहिजे.

जागतिक बँकेच्या पाहणी अहवालानुसार विकसनशील देशातील ९९% आजारी लोक हे एड्स, मलेरिया, टीबी या रोगांचे बळी असतात. एड्सवर विविध औषधांचा व पद्धतींचा शोध लागत असला तरी ३४ लाख लोक आजही HIV बाधीत आहेत. आफ्रिका, सहारा खंडात साथीच्या रोगाचे प्राबल्य आहे. या खंडातील ७०% तरुण आणि ९०% लहान मुले आजही साथीच्या रोगांनी हैराण झालेली आहेत. दरवर्षी ७,८१,००० लोक मलेरियाने मृत्युमुखी पडतात. त्यांचा आफ्रिकन अर्थव्यवस्थेवर प्रतिगामी परिणाम होतो. सन २००६ पासून जागतिक स्तरावर टी.बी. च्या आजाराचे प्रमाण कमी होत आहे. तरीसुद्धा २०१० मध्ये टी.बी. रोगाचे रुग्ण ६.६ दशलक्ष आढळले.

सुरक्षित संभोग, योग्य वातावरण, एच.आय.व्ही. ची ट्रीटमेंट आवश्यक काळजी घेतली पाहिजे. मलेरिया उच्चाटनाची मोहीम सर्वव्याप्ती राबविली पाहिजे. आंतरराष्ट्रीय विकास संघटना (IDA) आणि जागतिक बँकेने अतिगरीब देशांना निधी उपलब्ध करुन दिला. सन २००६ ते २०११ च्या मध्यापर्यंत आफ्रिकन देशातील २ दशलक्ष तरुणांना व एच.आय.व्ही ग्रस्त मुलांना विशिष्ट औषधांचा लाभ झाला आहे. ५७ दशलक्ष मलेरियाग्रस्त व्यक्तींनाही औषध वाटप करण्यात आले. भारतातील निरोधचा वापर २००१ मध्ये ५९%

होता तो २००९ मध्ये ८४% पर्यंत वाढला आहे आणि टी.बी विरोधी मोहिम यशस्वी झाली.

**७) पर्यावरणीय निर्वाहक्षमतेची हमी देणे (Ensure Environmental Sustainability) :**

आर्थिक हितसंबधात पर्यावरणीय मूल्य हे महत्त्वाचे आहे. आर्थिक कल्याणासाठी मर्यादित नैसर्गिक कार्यक्षमतेचा वापर काटकसरीने केला पाहिजे. मर्यादित हवा, पाणी, राहण्याची जागा याचा योग्य वापर केला पाहिजे. श्रम आणि भांडवलामध्ये बचत केली पाहिजे. आपल्या दुर्मिळ साधनसामग्रीचे रक्षण केले पाहिजे. मानव हा फक्त प्राणी नाही तर तो स्वत:च्या पर्यावरणीय स्थितीचा निर्माता आहे. पर्यावरण मानवाला आर्थिक, सामाजिक, राजकीय, व सांस्कृतिक विकासाच्या संधी पुरविते. मागणी-पुरवठ्याच्या नियम फक्त नैसर्गिक साधनसामग्रीची उपलब्धता निश्चित करीत नाही तर इतर अनेक कार्यामध्ये भूमिका बजावतो. ज्याचा परिणाम पर्यावरणावर होतो. अर्थशास्त्र उत्पादन अथवा प्रदूषण यांच्याशी संबंधित आहे. उदा. ताजी हवा, स्वच्छ पाणी इ. मूलभूत गरजा प्रदूषणाने दुर्मिळ होतात व पर्यावरणी अवनती होते. हवा प्रदूषण, जल प्रदूषण, भूप्रदूषण, वायू प्रदूषण यासारखी प्रदूषणे निर्माण होतात.

प्रदूषण नियंत्रणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकूण जमिनीच्या ठराविक एवढा हिस्सा जंगलांनी व्यापला पाहिजे याची काळजी घेतली पाहिजे. हवेतील कार्बन डाय-ऑक्साईडचे प्रमाण कमी करण्यासाठी स्थूल देशांतर्गत दरडोई उत्पन्नातील १ डॉलर खर्च केला पाहिजे. देशातील नागरिकांना शुद्ध जंतुरहित पिण्याचे पाणी पुरविणे व त्यांना स्वच्छता व आरोग्यरक्षण सोई उपलब्ध करुन देणे. या गोष्टी अपेक्षित आहेत.

पवनऊर्जा व सौरऊर्जा यामधील गुंतवणूक ही पर्यावरणीय निर्वाहक्षमतेची हमी देते. उद्योग व्यवसायाची उभारणी करुन रोजगार संधी निर्माण करणे अपेक्षित आहे. जागतिक बँकेच्या पाहणीनुसार सन १९९० मध्ये योग्य पेयजल ७६% लोकांना मिळत होते. त्यात वाढ सन २००६ मध्ये ८६% झाली. विषयक व स्वच्छतेच्या सोईत चांगली वाढ झाली आहे. जमिन प्रदूषण वाढत आहे. जंगलतोड मोठ्या प्रमाणात वाढ होते. हवेतील कार्बनचे प्रमाण वाढत आहे. जागतिक पर्यावरणीय नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनाला चालना दिली आहे.

**८) जागतिक सहभागित्वाचा विकास करणे (Developing a Global Partnership for Development) :**

यूनोच्या स्थापनेपासून जागतिक सहभागित्वाला सुरुवात झाली असल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMP), जागतिक बँक (IBRD) संस्थांनी जागतिक सहभागित्वात मोठी कामगिरी केली. विकसनशील देशांना या संस्थांनी विकासाची कामे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला. सन १९९१ पासून भारतत नवीन आर्थिक सुधारणांना सुरुवात झाली. त्यात उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले. या धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक मोकळी करुन परकीय गुंतवणूकदारांना व्यवसाय संधी उपलब्ध करुन दिली. एप्रिल २००० ते ऑक्टोबर २०१० या कालावधीत भारतातील एकूण प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक ५४९४९१ कोटी डॉलर्स इतकी होती. सिंगापूर, अमेरिका, इग्लंड, इजिप्त, जपान या देशाची प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक

अधिक होती. परकीय कर्ज व साहाय्यामध्ये जपान, जागतिक बँक (IBRD), आंतरराष्ट्रीय विकास संस्था (IDA) आशियाई विकास बँक यांचा हिस्सा मोठा आहे.

## २.७ सारांश

अशा रितीने वरीलप्रमाणे सहस्त्रकातील विकासाची ध्येये स्पष्ट केली आहेत आढळते. सन २००७ च्या मानवी विकास निर्देशांकाच्या अहवालानुसार नॉर्वे, कॅनडा, इंग्लंड, अमेरिका, मेक्सिको, जपान, मलेशिया, इंडोनेशिया, फिलीपाईन्स, श्रीलंका, चीन, व्हिएतनाम व इंडोनेशिया या देशात लिंग समानता आढळते. तर सौदी अरेबिया, पाकिस्तान, भारत, इराण, इजिप्त व नायजेरिया या देशात लिंग विषमता आढळते.

अलिकडच्या काळात जागतिक पातळीवर लिंग विषमतेसाठी जागृती निर्माण केली जात आहे. लिंग विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. स्त्रीला शिक्षण दिले जात आहे कुटूंबामध्ये महत्त्व दिले जाते. निर्णय प्रक्रियेमध्ये महत्त्व दिले जात असल्याचे दिसून येते.

## २.८ प्रश्न

Q1. यावर एक टीप लिहा -

अ) मानव विकास निर्देशांक.

b) लिंग विकास निर्देशांक.

c) हरीत जीडीपी.

ड) सहस्त्र विकास ध्येये.

Q2. सेन यांचा क्षमता दृष्टिकोन स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ३

## आर्थिक विकासाचे सिद्धांत - १

**घटक रचना**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्तविक

३.२ रोस्टो-प्रणित विकासाच्या अवस्था

३.२.१ परंपरागत समाज जीवनावस्था

३.२.२ उड्डाण अवस्थेतील पूर्वतयारी

३.२.३ उड्डाणअवस्था

३.२.४ परिपक्व अवस्थेकडे धाव

३.२.५ सार्वत्रिक उच्च उपभोगाची अवस्था

३.२.६ रोस्टोच्या प्रतिपादनाचे मूल्यमापन

३.२.७ रोस्टोच्या प्रतिपादनाचे महत्त्व

३.३ हेरॉड-डोमर वृद्धी समीकरण (प्रतिमान)

३.४ मोठा धक्का सिद्धांत

३.५ लिबिन्स्टिनचा गंभीर किमान प्रयत्न सिद्धांत

३.६ सारांश

३.७ प्रश्न


## ३.० उद्दिष्टे

- रोस्टो प्रणित आर्थिक वाढीच्या अवस्था अभ्यासणे.
- रोस्टो प्रणित विविध अवस्थांमधील सहसंबंध तपासणे.
- अर्थव्यवस्थेच्या संतुलनासाठी पूर्ण-रोजगार पातळीचा पुरस्कार करणारे हेरॉड-डोमर प्रतिमानाची ओळख करुन घेणे.
- हेरॉड-डोमर प्रतिमानाची गृहीतके अभ्यासणे.
- हेरॉड-डोमर सिद्धांताच्या मर्यादा लक्षात घेणे.

- अविकसित देशांच्या संदर्भात हेरॉड-डोमर सिद्धांताचे विचार समजून घेणे.
- रोजेस्टिन रोडानचा मोठा धक्का सिद्धांत अभ्यासणे.
- लिबिन्स्टिनचा गंभीर किमान प्रयत्न सिद्धांत अभ्यासणे.

## ३.१ प्रास्ताविक

डब्ल्यु. डब्ल्यु. रोस्टो यांनी कार्ल मार्क्सच्या इतिहासाच्या भौतिक मीमासेला पर्याय दिला. त्यांनी काही देशाच्या आर्थिक वाढीचा व विकासाचा विवेचनात्मक अभ्यास केला. त्यांच्या मते मार्क्सची भविष्यवाणी पूर्णपणे खरी ठरु शकत नव्हती. त्यातील त्रुटी दाखवून देण्याचा प्रयत्न रोस्टो यांनी केला व भांडवलीचा विनाश न होता तिची वाटचाल आर्थिक भरभराटीकडे होईल हे त्यांनी स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.२ रोस्टो-प्रणित विकासाच्या अवस्था (ROWSTOW'S STAGES OF ECONOMIC GROWTH)

अर्थरचना अविकसित अवस्थेत आहे असे गृहीत धरुन म्हणजे अविकसित अवस्था हा आरंभबिंदू मानून सर्वसाधारणपणे विकासाच्या सिद्धांताची मांडणी केली जाते. अविकसित अवस्थेपूर्वीचा विकास घडून आल्यानंतरच्या अवस्थाच्या फारसा सखोल विचार क्वचितच केला जातो. अशा अवस्थांचा थोडाफार विचार ॲडम् स्थिम याने केलेला दिसतो. त्यांच्या मते, मानवी समाज १) भटकी अवस्था, २) पशुपालन अवस्था, ३) शेती-विकास अवस्था, ४) व्यापार अवस्था व ५) औद्योगिक अवस्था अशा क्रमाने उन्नत होत जातो. औद्योगिक अवस्था प्राप्त झाल्यानंतर उपलब्ध साधनांचा पूर्ण वापर होऊ लागतो व सरतेशेवटी अर्थरचना कुंठितावस्थेत जाते असा निष्कर्ष त्याने काढला आहे. मानवी समाजाच्या अवस्थांतरांचा मागोवा कार्ल मार्क्स यानेही घेतला आहे. त्याच्याच मते, भांडवलशाहीची अवस्था ही कायम स्वरुपाची नसून मानवी समाजाची स्थित्यंतरे १) सरंजामशाही, २) भांडवलशाही, ३) समाजवाद व साम्यवाद अशा क्रमाने होत असतात. या अवस्थांचे विवेचन मार्क्सने भांडवलशाहीचा विनाश अटळ असतो ही गोष्ट पटवून देण्यासाठी केला आहे. भांडवलशाही ही एक सडकी, नासकी, अन्याय व शोषणावर आधारलेली व्यवस्था असून तिचा नाश अटळ असल्याने ती नष्ट होणेच योग्य होईल असे प्रतिपादन करुन हा नाश लवकर घडून यावा म्हणून मार्क्सने श्रमिक क्रांतीची हाक ही आपल्या विवेचनात दिली आहे.

मार्क्सच्या भविष्यवाणीचा फोलपणा उघड करण्यासाठी आणि भांडवलाशाहीची वाटचाल विनाशाकडे नसून सुबत्तेकडे (Affluence) होत आहे पटवून देण्यासाठी W. W. Rostow यांनी आपले [Stages of Economic Growth हे पुस्तक लिहीले.]

**रोस्टो प्रणित विकासाच्या अवस्था किंवा पाय-या :**

रोस्टोच्या मते, अर्थरचना विकास पुढील पाच अवस्थांमधून होत असतो.

१) परंपरागत समाज जीवनावस्था (Traditional Society)

२) उड्डाण-अवस्थेतील पूर्व तयारी (Pre-Condition for takeoff)

३) उड्डाण-अवस्था (Take –off stage)

४) परिपक्व (पूर्ण वाढ) अवस्थेकडे धाव (Drive to Maturity)

५) सार्वत्रिक उच्च उपभोगाची अवस्था (Age of high Mass)

रोस्टोच्या मते, भांडवलशाहीचा विनाश न होता प्रगत भांडवलशाही सार्वत्रिक उपभोगाची पातळी व दर्जा उंचावते. भांडवलशाहीच्या विकासातून भांडवलशाहीच्या मार्गाने सुबत्ता निर्माण करता येते. सुबत्ते साठी साम्यवादाला पाचारण करण्याची आवश्यकता नाही. या पाचही अवस्थांचे विवेचन क्रमश: दिले आहे.

**१) परंपरागत समाज जीवनाची अवस्था :**

या अवस्थेतील समाजजीवन प्रामुख्याने रुढी व परंपरा यांच्या आधारे नियंत्रित होत असते. कर्मकांड आणि धार्मिक रुढी, रीतीरिवाज यांचा जबर पगडा असल्याने अशा समाजात न्यूटन प्रणित शास्त्रीय दृष्टी नसते. निसर्गाची रचना समजून घेणे व त्यानुसार नैसर्गिक शक्ती व इतर साधनसंपत्ती यांचा मानवी हितासाठी उपयोग करुन घेणे इ. गोष्टी अशा समाजात शक्यच वाटत नाहीत. आपल्या भोवतालची परिस्थिती वृद्धीचा बळावर आपल्याला अनुकूल करुन घेता येते, हा विचारच अशा अवस्थेत नसतो. त्यामुळे नवे विचार-नवे बोध यांचा अभावच असतो. सर्व आर्थिक व्यवहार परंपरेनुसार चालतात. साहजिकच उत्पादनाची पद्धत प्राथमिक स्वरुपाची असते व उत्पादनाची पातळीही अगदी कमी असते. शेती हा प्रमुख व्यवसाय असतो. शेती उत्पादनात-नवीन जमीन लागवडीखाली आणून वाढ केली जाते. व्यापाराचा हा काही प्रमाणात विस्तार झालेला असतो. पण या अवस्थेत प्रचंड प्रमाणात 'वाढावा' (Surplus) निर्माण होऊन त्यामधून भांडवल-निर्मिती होण्याची शक्यता फारशी असत नाही. उत्पादनाची एकूण पातळीच अगदी कमी असल्याने एकूण 'वाढावा' देखील कमी असतो व हा अल्पसा वाढावा देखील उत्पादक कार्यासाठी न वापरता त्यामधुन मंदिरे, पिरॅमिडस्, राजवाडे, विसावा गृहे आणि संरजामशाहीची आपापसातील युद्धे यावरच खर्च केला जातो. असा समाज केवळ निर्वाह पातळीवरच जगत असतो.

**२) उड्डाण-अवस्थेची पूर्व तयारी :**

उड्डाण अवस्थेची पूर्वतयारी होण्यासाठी बराच काळ लागू शकतो. हा काळ एक ते दोन शतके इतका देखील असू शकतो. या दीर्घकाळात अनेक प्रकारचे पुढील बदल घडून येत असतात.

१) शेतीचा विस्तार व विकास शेती विकासामळे अन्नधान्याचा प्रश्न कमी तीव्र होतो व शेतीपासून वाढावाही अधिक प्रमाणात मिळू लागतो. व्यापारी किंवा नगदी पिकांचीही वाढ (उदा. लोकर) होऊ लागते.

२) शास्त्रीय दृष्टीची वाढ होऊन रेशीम इ. शास्त्रीय प्रगतीमुळे काही महत्त्वाचे प्राथमिक शोध लावले जातात. मुख्यत: आपल्या भोवतालची परिस्थिती परिश्रमाने व बुद्धिबलाने वापरता येते ही जाणीव होऊ लागते.

३) समाजाच्या वृत्तीत बदल होऊन सामाजिक प्रगती व सामाजिक स्थान मिळवण्यासाठी आर्थिक किंवा भौतिक विकास आवश्यक असतो ही गोष्ट स्वीकारली जाते. अशा भौतिक (आर्थिक) विकासासाठी गुंतवणूक करणे, साहस व धोके पत्करणे या गोष्टींना प्राधान्य दिले जाऊ लागते.

४) वाहतुकीचे मार्ग व वाहतुकीच्या सोयी यात वाढ होते. नवे प्रदेश शोधले जातात. व्यापारपेठेचा विस्तार होतो व त्यामुळे उत्पादनाला चालना मिळते.

५) उत्पादक गुंतवणूकीचे प्रमाण राष्ट्रीय विकासाच्या जवळ जवळ ५% इतके होते. याचा अर्थ गुंतवणूक पुरेशा प्रमाणात असतेच असे नाही. अजूनही एकूण उत्पादनाचा वेग लोकसंख्या-वाढीच्या वेगापेक्षा बराच कमी असतो.

६) राजकीय घटकामुळे किंवा शासकीय धोरणामुळेही उड्डाण अवस्थेला आवश्यक ती पूर्व तयारी होऊ शकते. (जपानमधील मैजी शासनाचे आर्थिक धोरण हे यांचे एक चांगले उदाहरण आहे. पूर्वतयारीची अवस्था निरनिराळ्या देशात एकाचवेळी निर्माण होणे शक्यच नाही. रोस्टोच्या मते, पश्चिम युरोपात प्रामुख्याने इंग्लंडमध्ये अशी अवस्था सर्वप्रथम म्हणजे सतराव्या अठराव्या शतकात निर्माण झाली. इंग्लंडचे भौगोलिक स्थान, त्यांचे समाज जीवन, तेथील साधनसंपत्ती इ. अनुकूल घटकांमुळेच इंग्लंडने उड्डाणावस्थेची पूर्वतयारी लवकर केली असे म्हणता येईल.

**३) उड्डाण अवस्था (Take – off stage) :**

उड्डाण अवस्था या संकल्पनेचा अर्थ धावपट्टीच्या एका टोकाशी विमान स्थिर असते, त्यात इंधन भरले जाते. थोड्या वेळाने त्याचे दरवाजे बंद होतात. शिडी दूर केली जाते. शक्तीप्रेरक इंजिने सुरु होतात. विमान हळूहळू पुढे सरकू लागते. आणि एक ठराविक उच्च वेग गाठला गेला की जमिनीवरुन आकाशात उड्डाण करते. हवाई उड्डाणाच्या या वर्णनाशी मिळती जुळती अशीच रोस्टोची 'उड्डाण अवस्थे' संबंधीची संकल्पना आहे. विकासाला बाधक असे अडथळे हळूहळू (पूर्वतयारीच्या अवस्थेत) दूर होतात. अर्थव्यवस्थेत प्रेरक शक्तीचा संचय होऊ लागतो. अर्थव्यवस्था हळूहळू विकासाच्या मार्गाकडे जाऊ लागते. गुंतवणूकीचा वेग वाढीस लागतो आणि या उत्पादक गुंतवणूकीचा काही विशिष्ट दर गाठला गेला की अर्थव्यवस्था विकासाची भरारी (Take off) घेते. म्हणजेच रोस्टोच्या मते उड्डाण अवस्था निर्माण होण्यासाठी आवश्यक ती प्रेरक शक्ती अर्थ-रचनेत निर्माणझाली पाहिजे आणि अशी प्रेरक शक्ती निर्माण होण्यासाठी काही महत्त्वाचे आणि रचनात्मक बदल समाजात आणि व्यवहारात घडून येणे आवश्यक आहे. रोस्टोच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास "The take – off is interpreted as a decisive transition in a society's history a period when the scale of productive economic activity reaches a critical level & produces changes when lead to a massive & progressive structural transformation in economic & societies of which they are a part, better view as changes in kind than merely in degree."

या अवतरणाचा अर्थ असा की, उड्डाणवस्था म्हणजे मानवी समाजाच्या इतिहासातील एक निर्णायक स्वरुपाचे संक्रमण आहे. या संक्रमणाच्या प्रक्रियेत उत्पादक व आर्थिक क्रिया अशा विशिष्ट उच्च पातळीवर पोचतात. की ज्यामुळे आर्थिक आणि सामाजक जीवनात एक शक्तिशाली आणि संरचनात्मक असे परिवर्तन घडून येते. अशा परिवर्तनामुळे सामाजिक आर्थिक जीवनाची पातळी तर बदलतेच (तीत सुधारणा होते) पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा परिवर्तनामुळे आर्थिक-सामाजिक जीवनाचे महत्त्व बदलून जाते.

म्हणजेच, उत्पादक अशा आर्थिक क्रियांचा वेग आवश्यक प्रमाणात वाढवून त्या वेगाच्या प्रेरणेने सामाजिक आणि आर्थिक व्यवहारांची पातळी आणि स्वरुप विकासाला अनुकूल ठरेल अशा रितीने ज्या अवस्थेत बदलले जाते किंवा निर्माण होते त्या अवस्थेला उड्डाण अवस्था म्हणता येईल.

ही अवस्था निर्माण होण्यासाठी रोस्टोच्या मते पुढील तीन अटी पूर्ण होणे आवश्यक आहे.

अ) उत्पादक कार्यातील गुंतवणूकीचे प्रमाण ५% किंवा त्यापेक्षा कमी पातळीवरुन राष्ट्रीय उत्पन्नाच्या १०% किंवा त्याहून जास्त इतके वाढले पाहिजे.

ब) ज्यांच्या वाढीचा वेग जास्त असू शकतो अशा एक किंवा त्यापेक्षा जास्त अधिक क्षेत्रांचा विकास होत असला पाहिजे.

क) गुंतवणूकीचा वाढता वेग, आधुनिक आर्थिक क्षेत्रांचा विकास व त्यामुळे निर्माण होणारे बाह्य फायदे या सर्वांचा जास्तीत जास्त फायदा करुन घेता येईल अशा प्रकारची सामाजिक, राजकीय व संस्थात्मक परिस्थिती अस्तित्त्वात तरी हवी किंवा अशी परिस्थिती कमीत कमी वेळात निर्माण तरी केली गेली पाहिजे.

**उड्डाण अवस्थेतील प्रक्रिया :**

रोस्टोच्या मते उड्डाण अवस्था निर्माण होणे व ती मधून आर्थिक विकासाची जोरदार व निरंतर स्वरुपाची प्रक्रिया सुरु होणे या गोष्टीसाठी एखाद्या जोरदार व निरंतर स्वरुपाची आवश्यकता किंवा राष्ट्रीय क्रांती किंवा चळवळ यामधून किंवा व्यापारातील अनुकूलतेतून मिळू शकते. उड्डाण अवस्थेतील प्रेरणेचे स्वरुप महत्त्वाचे नसून त्या प्रेरणेमुळे निर्माण होणारी शक्ती विकास कार्यासाठी वापरता येईल अशी आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती अस्तित्वात असणे किंवा निर्माण होणे हीच गोष्ट महत्त्वाची आहे.

**उड्डाण अवस्थेचा ऐतिहासिक मागोवा :**

उड्डाण अवस्था निरनिराळ्या देशात निरनिराळ्या वेळी निर्माण झाली असे रोस्टो यांचे प्रतिपादन असून काही देशातील उड्डाण अवस्थांचा कालावधी ते पुढीलप्रमाणे देतात.

| देश | उड्डाण अवस्थेचा काळ | देश | उड्डाण अवस्थेचा काळ |
|---|---|---|---|
| इंग्लंड | १७८३-१८०२ | रशिया | १८९०-१९१४ |
| फ्रान्स | १८३०-१८६० | तुर्कस्थान | १९३७ |
| अमेरिका | १८४३-१८६० | भारत | १९५२ |
| जर्मनी | १८५०-१८७३ | चीन | १९५२ |
| जपान | १८७८-१९०० | | |

प्रत्येक देशातील उड्डाण अवस्थांचा काळ लक्षात घेतल्यास त्या त्या काळात त्या देशात विकासाला आवश्यक अशा प्रेरणा निर्माण झाल्या होत्या हे लक्षात येईल. इंग्लंडमधील शेती, व्यापार व उद्योग क्षेत्र यातील क्रांती, फ्रान्स विरुद्ध युद्ध हे प्रेरक घटक आहेत तर अमेरिकेतील, पश्चिम भागातील वसाहती, रेल्वेचा विस्तार, व्यापारसंरक्षण धोरण इ. घटक प्रेरक ठरले असावेत. जर्मनीमधील औद्योगिक संरक्षणाचे धोरण तर जपानमधील मैजी शासनाचे औद्योगिक आणि आर्थिक धोरण या उड्डाणावस्थेच्या बलशाही प्रेरणा ठरल्या आहेत. तुर्कस्थानमधील केमलापाशाची कारकीर्द तर रशियातील दुसरा अलेक्झांडर यांचे शासन उपकारक ठरल्याचे दिसते. भारताच्या बाबतीत स्वातंत्र्यप्राप्ती आणि लोकशाही नियोजनामध्ये उड्डाणावस्था निर्माण झाली असावी तर चीनच्या बाबतीत माओचा विजय हीच मोठी प्रेरक शक्ती ठरली असे म्हणता येईल.

**उड्डाण अवस्थेच्या अटींची पूर्तता :**

उड्डाण अवस्थेचे स्वरुप व प्रक्रिया समजून घेतल्यानंतर ती अवस्था प्राप्त होण्यासाठी ज्या तीन अटी पूर्ण होणे आवश्यक आहे त्या अटींची पूर्तता कशी होऊ शकते याचे थोडक्यात विवेचन करु.

**अ) गुंतवणूकीचा दर १०% किंवा त्यापेक्षा जास्त असणे :**

ही अट पूर्ण होण्यासाठी सर्वप्रथम बचतीचा दर वाढवावा लागेल. म्हणजेच अनावश्यक उपभोगावरील खर्च कमी करणे व ज्या विभागात बचत होऊ शकेल अशा विभागात उत्पन्नाचा जास्त ओघ पळवणे या गोष्टी घडून येणे आवश्यक आहे. बचतीची साधने, सोयी व बचतीसाठी योग्य ती प्रलोभने निर्माण झाली पाहिजेत.

गुंतवणूकीचा दर केवळ बचत वाढवून होणार नाही. बचतबरोबरच वित्त पुरवठा देखील प्रमाणात वाढला पाहिजे. यासाठी देखील उत्पन्नाची पुनर्वाटणी करणे, वाढत्या नपा|यातून गुंतवणूक करणे असे उपाय योजावे लागतील. तसेच कोणत्याही स्वरुपाचा वाढावा चैनीसाठी वापरला न जाता केवळ उत्पादक कार्यासाठी वापरला जाईल याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. वित्तपुरवठा करणार्या संस्था आणि साधने उदा. बँका, नाणे बाजार, भांडवल बाजार, हुंडी बाजार, इ. यांची वाढ त्वरित होणे आवश्यक आहे. व्यापारी वाढावा आणि विदेशी भांडवल या दोन मार्गांचाही अवलंब वित्तपुरवठ्यासाठी केला जाऊ शकतो.

**ब) महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रांचा विकास :**

उड्डाण अवस्थेची ही दुसरी अट पूर्ण होण्यासाठी महत्त्वाच्या उद्योगांचा आणि क्षेत्रांचा विकास आवश्यक ठरतो. हा विकास प्राथमिक, पूरक किंवा इतर क्षेत्रांत घडून येऊ शकतो. इंग्लंडमधील वस्त्रोद्योगाचा विकास, तर अमेरिकेत रेल्वेचा विकास हा महत्त्वाचा ठरला होता. जपान, चीन, रशिया या देशात तर सैन्य बळाची वाढ व आधुनिकीकरण हेच क्षेत्रमहत्त्वाचे ठरुन त्यामध्ये अनेक पुरक व सहाय्यक उद्योगांचा अल्पवधीत विकास घडून आला. महत्त्वाच्या उद्योग आणि क्षेत्रांचा (Sectors) विकास घडून येण्यासाठी

१) अशा उद्योगांची उत्पादनासाठी बाजारपेठ अस्तित्त्वात असणे आवश्यक आहे.

२) अशा उद्योगांची उत्पादन क्षमता वाढवली जाणे आवश्यक आहे.

३) सुरुवातीचे आवश्यक ते भांडवल अर्थव्यवस्थेत उपलब्ध असले पाहिजे आणि

४) अशा महत्त्वाच्या उद्योग क्षेत्रातील विकासामुळे इतर क्षेत्रांत विकास घडून आला पाहिजे.

**क) सामाजिक, राजकीय व संस्थांत्मक बदल :**

उड्डाण अवस्था निर्माण होण्यासाठी अर्थरचनेत विकास प्रवणता निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी अनेक सामाजिक-सांस्कृतिक व राजकीय बदल आवश्यक असतात. सामाजातील विकास व गतिक्षमता यांना विरोध करणार्या रुढी व संस्था यात सुधारणा करणे नवीन औद्योगिक व आर्थिक मूल्यांची वाढ करणे, संशोधन व नवसंयोजन यांची वाढ करणे, तंत्रज्ञानाचा विकास आणि उपयोग मोठ्या प्रमाणावर होणे, आंतरक्षेत्रीय व आंतरदेशीय सहकार्य वाढवणे या गोष्टी अत्यावश्यक ठरतात. तसेच नव्या वित्तीय, औद्योगिक व व्यापार संस्थाही निर्माण व्हाव्या लागतात. शिक्षण धोरण आणि शैक्षणिक कार्यक्रम यात आवश्यक त्या सुधारणा घडवून आणाव्या लागतात. राजकीय स्थैर्य, विश्वास व विदेशी भांडवलाची गुंतवणूक यासाठी अनेक राजकीय बदलही आवश्यक असतात. सरकारी धोरण, प्रगतीचे व गतिमान असावे लागते. शासन यंत्रणा कार्यक्षम व विकासोन्मुख करावी लागते. विकास कार्यात प्रत्यक्ष सहभागी होणे व विकासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे अशी दुहेरी जबाबदारी शासनाने स्वीकारावी लागते. सार्वजनिक वित्तीय धोरणे विकासाला पोषक अशीच ठरवावी लागतात.

**४) परिपक्व अवस्थेकडे धाव (Towards Maturity Stage) :**

उड्डाण अवस्था निर्माण झाल्यानंतर अर्थरचना विकासाची भरारी घेते आणि ४० ते ६० वर्षाच्या काळात क्रमाक्रमाने तिचे रुपांतर परिपक्व अवस्थेत (पूर्ण वाढीची अवस्था) होते. या कालामधील अर्थव्यवस्थेत अनेक महत्त्वाचे बदल वेगाने घडून येतात. गुंतवणूकीचा दर १०% पेक्षा वर गेलेला असतो. नवे शोध, नवसंयोजन व प्रगत तंत्रज्ञान यांचा विकास घडून येतो. महत्त्वाचे उद्योग व क्षेत्रे यांचा विकास होऊन इतर अनेक उद्योगांचा विकास घडून येतो. अर्थरचना उत्पादन करावयास समर्थ झालेली असते. आवश्यक त्या सोयी व तरतूदी उपलब्ध झालेल्या असतात. समाजाने औद्योगिक व आर्थिक विकासाशी सुसंगत अशी उड्डाण अवस्था निर्माण झाल्यानंतर अर्थरचना विकासाची भरारी होते आणि ४० ते

६० वर्षाच्या काळात क्रमाक्रमाने तिचे रुपांतर परिपक्व अवस्थेत (पूर्ण वाढीची अवस्था) होते. या कालामधील अर्थव्यवस्थेत अनेक महत्त्वाचे बदल वेगाने घडून येतात. गुंतवणूकीचा दर १०% पेक्षा वर गेलेला असतो. नवे शोध, नवसंयोजन व प्रगत तंत्रज्ञान यांचा विकास घडून येतो. महत्त्वाचे उद्योग व क्षेत्रे यांचा विकास होऊन इतर अनेक उद्योगांचा विकास घडून येतो. अर्थरचना उत्पादन करावयास समर्थ झालेली असते. आवश्यक त्या सोयी व तरतुदी उपलब्ध झालेल्या असतात. समाजाने औद्योगिक व आर्थिक विकासाशी सुसंगत अशी नवी मुल्ये स्वीकारलेली असतात. समाजातील उद्योजक व साहसाप्रियता वाढलेली असते. आर्थिक विकासाची अनेक नवी दालने उघडली जातात व उड्डाण अवस्थेतील उद्योगापेक्षा वेगळे असे इतर अनेक उद्योग आणि व्यवसाय निर्माण होतात. उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर तर होतोच पण त्याचबरोबर नवीन साधन-संपत्ती निर्माण केली जाते.

रोस्टो यांचे निरीक्षण ग्राह्य मानल्यास ही परिपक्व अवस्था भारतात एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला निर्माण होऊ शकेल. त्यावेळी भारतातील संगणक क्षेत्र, इलेक्ट्रॉनिक्स् व अवजड उद्योग यांचा प्रचंड विस्तार झालेला असेल, उर्जा, वाहतूक, संदेश वाहन, जहाज बांधणी, व संरक्षण साहित्याचे उत्पादन या बाबतीत भारत स्वयंपूर्ण असेल तर भूगर्भ वायू व तेल तसेच खते, रसायन, औषधे यांच्या निर्मितीतही भारताचे स्थान फारच वरचे ठरेल.

### ५) सार्वत्रिक उच्च उपभोगाची अवस्था (State of High Mass Consumption) :

पूर्ण विकासाची अवस्था प्राप्त झाल्यानंतर अशा विकसित अर्थरचनेतील लोकांचे जीवनमान कमालीचे सुधारते. सर्वच वस्तू मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने वास्तव उत्पन्नात (Real Income) वाढ होते. ग्रामीण वस्ती कमी होऊन शहरीकरणाचा वेग प्रचंड प्रमाणात वाढतो. या अवस्थेतील उत्पादक यंत्रसामुग्रीचा उपभोग जास्त करीत असल्याने कुशल कामगार जास्त प्रमाणात लागतात व त्यासाठी कामगारांना आपले कौशल्य व प्रशिक्षण वाढवावे लागते. कामगार संघटनाही जास्त सामर्थ्यवान होऊ लागतात. शासनसंस्था, सामाजिक सोयी व सुरक्षितता अशा गोष्टींसाठी प्रचंड प्रमाणात खर्च करु शकते. व तसा खर्च, आरोग्य, निर्वाहभत्ता, स्त्री आणि बाल संरक्षण, वृद्ध आणि अपंग यांना साहाय्य, रोग व नैसर्गिक आपत्ती यांना प्रतिबंध घालणे इ. अनेक गोष्टींवर केला जातो. विकासाच्या या अवस्थेच्या संदर्भात सार्वत्रिक उच्च उपभोग ही संकल्पना नीट समजावून घेणे आवश्यक आहे. या अवस्थेत समाजातील सर्व लोकांच्या अत्यावश्यक गरजा तर भागतातच पण त्याचबरोबर अनेक प्रकारच्या सुखसोयी व चैनीच्या वस्तू यांचा उपभोग देखील सार्वत्रिक स्वरुपाचा असतो. उदाहरणार्थ अशा समाजात, टेलिफोन, टी. व्ही., मोटर, पुस्तके, शीतकपाटे वर्तमानपत्रे, खेळांची साधने, प्रवास आणि सुट्टीतील सहली इ. गोष्टींची मौज जवळ जवळ सर्वच कुटुंबाना लुटता येते. समाजातील काही भाग अर्धपोटी आणि अर्धनग्न राहिला आहे. तो आधुनिकीकरणाच्या संधीपासून वंचित राहिला आहे असे घडत नाही. अशा समाजालाच विपुलावस्थेतील समाज (Affluent Society) असेही म्हणावयास हरकत नाही. अर्थातच सार्वत्रिक उच्च उपभोगाची अवस्था निर्माण झाल्यानंतर विपुलावस्था निर्माण होण्यासाठी आणखी थोडा अवधी जावाच लागतो. उच्च-उपभोगाच्या अवस्थेत उत्पादनाचे प्रमाण असे असते की, बहुविध वस्तू जवळ जवळ सर्वांनाच मिळू शकतात. विपुलावस्थेत आणखी प्रगती झालेली असते. आता बहुविध वस्तु जवळजवळ

सर्वांनाच विपुल प्रमाणात मिळू शकतात. रोस्टोच्या मते, १९२० च्या सुमारास अमेरिकेत सार्वत्रिक उच्च-उपभोगाची अवस्था निर्माण झाली. प्रा. गोलब्रथ यांच्या मते, आता या अवस्थेचे रुपांतर विपुलावस्थेत झालेले आहे.

**रोस्टोच्या प्रतिपादनाचे मूल्यमापन (Critical Evaluation of Rostow's stages of growth) :**

रोस्टोच्या सिद्धांतावर अनेकांनी अनेक बाजूंनी तीव्र टीका केली असून या सिद्धांताचे दोष पुढीलप्रमाणे दाखविले आहेत.

१) रोस्टोच्या प्रतिपादनाला विकासाचा सिद्धांत म्हणताच येणार नाही कारण आर्थिक विकासाचे निरनिराळ्या अवस्थांत वा टप्प्यात केलेले विभाजन हे फारसे तर्कशुद्ध व व्यवहार्य नाही. एकतर विकासाची प्रक्रिया अशा निरनिराळ्या अवस्थात विभागणे शक्यच होणार नाही. आणि दुसरे म्हणजे प्रत्येक देश याच अवस्थांतून जाईल असेही नाही. या अवस्थांतून न जाता आणि पूर्वीच्या काही अवस्था वगळूनही देशाच्या विकासाची पुढची प्रगत अवस्था सहज गाठता आली आहे. ही गोष्ट उदाहरणांनी दाखवता येण्यासारखी आहे.

२) काही टीकाकारांच्या मते, भिन्न भिन्न अवस्थांतील सीमारेषा ठरविणे कठीण आहे व त्यामुळे आधीच्या व पुढच्या अवस्थांची वैशिष्ट्ये एकमेकांत मिसळणे किंवा समान असणे सहज शक्य आहे. पूर्वतयारीच्या अवस्थेत उद्योजकता असणे. तंत्रज्ञानाचा विकास होणे, गुंतवणकीचा वेग वाढणे इ. वैशिष्ट्ये असावीच लागतील व हीच वैशिष्ट्ये उड्डाण अवस्थेचीही असू शकतात. तसेच उड्डाण अवस्थेतील, उच्च गुंतवणूक, नव-संयोजन इ. वैशिष्ट्ये पुढच्या अवस्थेसाठीही आवश्यकच आहेत.

३) केवळ गुंतवणूकीच्या वेगातील वाढीवरुन विकासाच्या निरनिराळ्या अवस्था ठरविणे फारच अवघड व अव्यवहार्य गोष्ट आहे. असे करण्यासाठी अनेक प्रकारची आकडेवारी उपलब्ध हवी. पण अशी आकडेवारी उपलब्ध असतेच असे नाही. शिवाय अशी आकडेवारी मिळाली तरी केवळ उत्पन्नातील वाढीमुळे विकासाची विशिष्ट अवस्था निर्माण झाली असे मानणे फारसे योग्य होत नाही.

४) विकसनशील अर्थरचनांचे द्विविध (Dualistic) स्वरुप रोस्टोने विचारात घेतलेले नाही. एकाच वेळी पारंपारिक व आधुनिक असे दोन विभाग या अर्थरचनात कार्य करीत असतात. अशा स्थितीत विकासाचे टप्पे ठरविणे शक्यच नसते. तसेच अशा अर्थरचनेत शेती व उद्योग या क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या बाबतीतही फार तफावत असते. उद्योग अत्याधुनिक तंत्र वापरली तर शेती त्या बाबतीत बरीच मागे असते अशा परिस्थितीत विकासाचे टप्पे नीटपणे ठरविणे जवळ जवळ अशक्यच ठरते.

**रोस्टोच्या प्रतिपादनाचे महत्त्व (Importance of Rostow's stages of Growth) :**

रोस्टोच्या प्रतिपादनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) मार्क्स प्रणित भांडवलशाहीचा विकास हा केवळ इंग्लंडमधील घडामोडी आणि बदल यांच्या आधाराने प्रतिपादन केला गेला आहे. या उलट आर्थिक विकासाचा विचार करताना

रोस्टोने अनेक देशातील अनुभवास येऊ शकणार्या अनेक सर्वसाधारण घटनांचा आधार आपल्या विवेचनात घेतला आहे.

२) मार्क्सचे प्रतिपादन फक्त आर्थिक बदलांनाच अवास्तव महत्त्व देणारे दिसते. तर रोस्टोचे प्रतिपादनात आवश्यक त्या राजकीय, सामाजिक व इतर संस्थात्मक बदलांची नोंद घेण्यात आली आहे.

३) मार्क्सच्या मते, सरंजामशाहीच्या पतनानंतर भांडवलशाही उदयास येते व भांडवलशहीत वर्गविग्रह, ताण-तणाव आणि शोषण या गोष्टी वाढू लागतात. रोस्टोचे प्रतिपादन मात्र या संदर्भात जास्त अनेक व्यापक व रचनात्मक आहे. त्यांच्या मते परंपरागत अवस्थेच्या पुढच्या अवस्थांत नव्या सामाजिक व राजकीय जाणिवा निर्माण होतात व या जाणिवांमुळे समाजविघटन न होता नवसमाज कार्य सुरु होते. बालमृत्यूत घट घडवून आणणे, निरक्षरता कमी करणे, शासनयंत्रणेची पुनर्रचना करणे इ. नव्या जाणिवा रोस्टोला विकास-प्रक्रियेसाठी महत्त्वाच्या वाटतात.

४) मार्क्सने भांडवलशाहीचे भयंकर व बिभत्स रुप चितारुन तिच्या अंत: कालाची घंटा वाजत आहे असा इशारा दिला. साम्यवादाच्या संबंधाने युरोपला झपाटले आहे अशी भीतीही दाखविली. मार्क्सवादाच्या या पिशाच्यावरील उतारा म्हणून रोस्टोच्या सिद्धांताकडे पाहता येईल. भांडवलशाहीचा विकास विनाशाकडे जात नसून समृद्धीकडे जाणारा आहे या गोष्टीवर रोस्टोने भर दिला आहे.

५) रोस्टोने सांगितलेल्या भिन्न भिन्न अवस्थांत भिन्न भिन्न समस्यांना अर्थरचनेला तोंड द्यावे लागते. अवस्थांमधील भिन्नता दाखविण्यात रोस्टो फारसा यशस्वी झाला नसला तरी त्याच्या प्रतिपादनामुळे विकासाच्या निरनिराळ्या समस्याकडे तरी आपले लक्ष चांगल्या प्रकारे वेधले जाते ही गोष्ट महत्त्वाची आहे.

६) रोस्टोने वर्णन केलेला 'उड्डाण' (Take off) कल्पना एका दृष्टीने विकसनशील देशांना फार उपकारक ठरणारी आहे. विकासाचे स्वरुप ठरवणे, त्यासाठी योग्य दिशा व साध्ये ठरविणे या गोष्टी वाटतात तितक्या सोप्या नाहीत, उड्डाणा साठी गुंतवणूकीचा वेग वाढता राहून तो 'उड्डाण' मर्यादेपर्यंत येतो की नाही हे पाहून विकासाची दिशा किंवा वेग योग्य आहे की नाही देखील ठरविता येईल. विकसनशील देशांनी 'उड्डाण' वेगाइतका 'गुंतवणूकीचा वेग' गाठणे ही देखील त्या देशांच्या दृष्टीने समाधानाची आणि आत्मविश्वासा वाढविणारी अशीच बाब ठरु शकेल. उंच उडीसाठी ठरावीक अंतर कोणत्या वेगाने कापणे योग्य आहे याची कल्पना आल्यास उडी जास्त अचूक ठरण्याची शक्यता वाढते. विकास उडीच्या संदर्भात रोस्टोच्या 'उड्डाण' संकल्पनेचे हेच कार्य असावे म्हणता येईल.

**आपली प्रगती तपासा :-**

१) रोस्टोच्या सिद्धांतातील आर्थिक वाढीच्या पाच मुख्य अवस्था कोणत्या?

२) उड्डाण अवस्थेतील विविध अटी सांगा.

३) टीप लिहा - सार्वत्रिक उच्च उपभोगाची अवस्था.

४) रोस्टोच्या सिद्धांताचे महत्त्व स्पष्ट करा.

## ३.३ हेरॉड-डोमार वृद्धि समीकरण (प्रतिमान) (HARROD-DOMAR GROWTH MODEL)

अर्थव्यवस्थेचे संतुलन पूर्ण-रोजगाराच्या उत्पन्न पातळीवर (Full Employment Income Level) झाली आहे असे मानल्यास हे संतुलन सातत्याने टिकवून धरण्यासाठी गुंतवणूकीमुळे एकूण खर्चात (Spending) जी वाढ होईल ती वाढ गुंतवणूकीमळे निर्माण होऊ शकणार्या उत्पादनाला विकत घेऊ शकेल इतकी असणे अत्यावश्यक आहे. बचतीचा सीमांत दर (Marginal Prosperity to save) कायम असताना तो कमी होण्याची प्रवृत्ती नसल्यास भांडवल संचय वाढता राहील आणि त्यामुळे शुद्ध (Net) गुंतवणूक ही उत्तरोत्तर वाढती राहणे आवश्यक आहे आणि अशा परिस्थितीत गुंतवणूक सतत वाढत राहण्यासाठी वास्तव राष्ट्रीय उत्पन्न ही सातत्याने वाढत राहणे आवश्यक आहे. भांडवल संचय आणि गुंतवणूक वाढत असताना जर वास्तव उत्पन्न वाढले नाही तर एकूण खर्चात घट होऊन

अ) नवीन वापरलेच जाणार नाही किंवा

ब) नवीन भांडवलाचा वापर जुन्या भांडवलाऐवजी होईल किंवा

क) नव्या भांडवलाचा उपयोग श्रमिकांना पर्यायी घटक म्हणून होऊ शकेल म्हणजे गुंतवणूक वाढली असता वास्तव उत्पन्न न वाढल्यास भांडवल किंवा श्रम हे दोन्ही घटक बेरोजगार राहतील व पूर्ण-रोजगाराची पातळी टिकवता येणार नाही अशा प्रकारे हेरॉड-डोमार विकास प्रतिमानाच्या दृष्टीने, पूर्ण रोजगाराची पातळी टिकवून ठेवण्यासाठी, वास्तव उत्पन्न कोणत्या दराने वाढणे आवश्यक आहे व हा दर अर्थव्यवस्थेला गाठता आणि टिकविता येईल काय हीच मध्यवर्ती समस्या आहे.

### ३.३.१ हेरॉड-डोमार सिद्धांतामधील गृहितके (Assumption of Harrod-domar Model) :

आपला सिद्धांत मांडण्यासाठी हेरॉड व डोमार यांनी पुढील गोष्टी गृहीत म्हणून स्वीकारल्या आहेत.

१) बचतीचा दर स्थिर असतो व बचतीची सीमांत आणि सरासरी प्रवृत्ती समान असते.

२) उत्पादन प्रक्रियेत उत्पादन गुणांक (Co-Efficient of Productions) स्थिर आणि निश्चित असतात म्हणजेच राष्ट्रीय उत्पादनाच्या एका एककासाठी लागणारे श्रम आणि भांडवल यांचाच विचार करण्यात आला असून त्याचे परस्पर प्रमाण आर्थिक प्रक्रिया बाह्य कारणांनी ठरते असे मानण्यात आले आहे.

३) कामगारांची संख्या एका ठराविक दराने वाढते व हा तर बाह्य कारणांनी ठरत असतो.

४) सरकारी हस्तक्षेपाचा अभाव असतो.

५) विदेशी व्यापार होत नाही.

६) व्याजाचा दर कायम असतो.

७) पूर्ण रोजगाराच्या पातळीवर उत्पन्नाचा समतोल (Equilibrium) साधला आहे.

### ३.३.२ डोमारचे प्रतिपादन किंवा सिद्धांत (Domer's Model) :

डोमारचे प्रतिपादन पुढील समस्येची उकल करण्याच्या दृष्टीने केले आहे. गुंतवणूकीमुळे १) उत्पन्न वाढते व २) उत्पादन क्षमतेत वाढ होते ही गोष्ट लक्षात घेता उत्पन्न व उत्पादन क्षमता यांची समान वाढ होऊन पूर्ण रोजगाराच्या पातळीवर समतोल साधण्यासाठी गुंतवणूकीतील वाढीचा योग्य दर शोधून काढण्याचा प्रयत्न डोमार सिद्धांतात करण्यात आला आहे. डोमारचे विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

समजा, भांडवल निर्मिती १ रुपयांने वाढली व त्यामुळे वास्तव उत्पन्नही ५ रुपयाने वाढले तर S ने वास्तव उत्पन्नातील व भांडवलातील वाढ हे गुणोत्तर दाखविले जाईल. (S = वास्तव उत्पन्नातील वाढ/भांडवलातील वाढ) व या प्रकारे हा प्रवेगकाचा (Accelerator) व्यस्तांक ठरेल कारण प्रवेगक गुंतवणूकीतील (भांडवलातील) वाढ / वास्तव उत्पन्नातील वाढ हे आपल्याला माहित आहेच जर वास्तव उत्पन्न रु. ५ ने वाढवण्यासाठी भांडवलाची वाढ रु. १० नी होणे आवश्यक असेल तर $S = \frac{५}{१०} = \frac{१}{२}$ होईल. S वास्तव उत्पन्न म्हणजेच उत्पादनातील वाढीचा वेग दाखवत असल्याने उत्पादन क्षमतेतील एकूण वाढ ही एकूण गुंतवणूक (क्षमता I) व उत्पादन वाढीचा दर यांच्या गुणाकाराइतकी होईल. म्हणजेच उत्पादनक्षमतेची वाढ ($= I \times S$) पण प्रत्यक्षात मात्र उत्पादनातील वाढीचा दर S इतका असेलच असे नाही. कारण नव्या भांडवलामुळे काही जुने भांडवल मोडीत निघून उत्पादनक्षमतेत काहीशी घट होईल. तसेच नव्या भांडवलाला इतका घटक मिळविण्यासाठी बाजारात स्पर्धा करावी लागेल व त्यामुळेही उत्पादन क्षमतेतील वाढ काहीशी कमी होऊन उत्पादन क्षमतेचा प्रत्यक्ष दर S असा न रहाता त्या पेक्षा कमी राहील समजा तो दर P ($P<S$) आहे. याचाच अर्थ उत्पादन क्षमतेतील प्रत्यक्ष वा [गुंतवणूकीसाठी ($I \times P$)] इतकी राहील. अर्थातच ही उत्पादन क्षमतेतील प्रत्यक्ष वाढ असल्याने ही वाढ एकूण पुरवठा दर्शविते.

याउलट मागणीच्या बाजूचे स्पष्टीकरण केन्सप्रणित गुणक तत्वाने (Multiplier Principle) होऊ शकते. जर गुंतवणूकीत वाढ $\triangle I$ असेल व उत्पन्नातील वाढ $\triangle Y$ असेल तर गुणक

$$\frac{\text{उत्पन्नातील वाढ}}{\text{गुंतवणूकीतील वाढ}} = \frac{\Delta Y}{\Delta I} \text{ होईल.}$$

समजा बचतीची सीमांत प्रवृत्ती $\alpha$ असेल तर गुणक $\frac{१}{\text{सीमांत बचत प्रवृत्ती}} = \frac{\Delta Y}{\Delta I}$

असे म्हणता येईल व उत्पन्नातील एकूण वाढ; $\Delta Y = \frac{1}{\alpha}(\Delta I)$ असे समीकरण मांडता येईल.

$$Q \frac{I}{\alpha} \frac{\Delta Y}{\Delta I} \therefore (\Delta Y) = \frac{I}{\alpha}(\Delta I)$$

अर्थव्यवस्थेचे पूर्ण-रोजगाराच्या पातळीवरील संतुलन टिकविण्यासाठी एकूण पुरवठा आणि एकूण मागणी यांची म्हणजेच उत्पादन क्षमतेची व वास्तव उत्पन्नाची वाढ सारखीच असणे आवश्यक आहे. याचाच अर्थ $\frac{I}{\alpha} I\Delta = IP$ हे समीकरण साधले गेले पाहिजे. समीकरणाच्या दोन्ही बाजूंना I ने गुणून व ने भागून आपण असे लिहू शकतो.

समीकरणाची डावी बाजू $\left(\frac{I\Delta}{I}\right)$ गुंतवणूकीच्या वाढीचा दर दाखवते. याचाच अर्थ पूर्ण रोजगाराची स्थिती कायम राहण्यासाठी गुंतवणूकीच्या वाढीचा आणि त्यामुळे वास्तव उत्पन्नाच्या वाढीचा दर, दरसाल शेकडा $\alpha P$ इतका असला पाहिजे. पूर्ण रोजगाराची स्थिती कायम ठेवण्यासाठी गुंतवणूकीचा कोणता दर आवश्यक आहे. या प्रश्नाचे उत्तर आता आपणाला देता येते. तो गुंतवणूकीचा दर $\alpha P$ या गुणाकाराइतका म्हणजेच सीमांत बचत प्रवृत्ती व गुंतवणूकीच सरासरी उत्पादन क्षमता यांच्या गुणाकाराइतका (दर साल दर शेकडा) असला पाहिजे.

वरील विवेचन एका साध्या उदाहरणाने स्पष्ट करता येईल. समजा वास्तव राष्ट्रीय उत्पन्न (५) रु. १०० कोटी असून या पातळीवर पूर्ण रोजगाराची संतुलन अवस्था निर्माण झाली आहे आणि P =२५% असून $\alpha$=१०% आहे. पूर्ण रोजगाराच्या अवस्थेत संतुलन असण्यासाठी एकूण गुंतवणूक (I) = एकूण बचत (S) अशी स्थिती असणे आवश्यक आहे. म्हणजेच S = I आता एकूण बचत (S) ही मूळ उत्पन्न व सीमांत बचत प्रवृत्ती ($\alpha$) यांच्या गुणाकाराने मिळेल. S=Y $\alpha = १०० \times \frac{१}{१०} = १०$कोटी रुपये म्हणजे एकूण गुंतवणूक रु. १० कोटी इतकी असणे आवश्यक आहे. या गुंतवणूकीमुळे उत्पादन क्षमता वाढेल व उत्पादन क्षमतेची वाढ = गुंतवणूक व P यांचा गुणाकार इतकी असते हे आपण पाहिलेच आहे म्हणून उत्पादन क्षमतेची वाढ = IP म्हणजेच $(Y\alpha)$ P अंकामध्ये हीच गोष्ट $\left(१०० \times \frac{१}{१००} \times \frac{२५}{१००}\right) = २.५$कोटी रुपये अशी दाखविता येईल. पूर्ण रोजगाराची स्थिती टिकवून धरण्यासाठी वास्तव उत्पन्नातील वाढही उत्पादन क्षमतेच्या वाढीइतकीच म्हणजेच $\left(१०० \times \frac{१}{१००} \times \frac{२५}{१००}\right) = २.५$कोटी इतकी होणे आवश्यक आहे व या उत्पन्न वाढीचा दर उत्पन्नातील वाढीला मूळ उत्पन्नाने भागून काढता येईल, तो दर $१०० \times \frac{१}{१००} \times \frac{२५}{१००} = \frac{१०}{१००} \times \frac{२५}{१००} = २.५$ % इतकी होईल पण $\frac{१०}{१००} = \alpha$ आणि $\frac{२५}{१००}$ = P आहे हे लक्षात घेता २.५% = $\alpha P$ हे स्पष्ट होईल.

या सर्व विवेचनातून डोमारने अर्थव्यवस्थेची एक अटळ अशी शृंगापती स्पष्ट केली आहे. जर $\alpha$ चे मूल्य (बचत प्रवृत्ती) जास्त असेल तर पूर्ण रोजगार कायम ठेवण्यासाठी आवश्यक गुंतवणूक मोठी लागेल. तसेच P चे मूल्य जास्त असेल. तर उत्पादन क्षमतेत जास्त वाढ होऊन तिच्यासाठी वास्तव उत्पन्नात जास्त वेगाने भर पडावी लागेल. पण उत्पन्नातील वाढ शेवटी गुंतवणूकीवरच अवलंबून असल्याने उत्पन्न वाढवण्यासाठी

गुंतवणूक वाढवावी लागेल. जर आजची गुंतवणूक कमी झाली तर आजच (सदयकाली) रोजगारी घटेल हे खरे पण समस्या येथेच संपत नाही. सदयकाली गुंतवणूक पुरेशी असली तरी भावी रोजगारी कायम राखण्यासाठी भावी गुंतवणूक जास्तीत जास्त होणे आवश्यक आहे. कारण आज वाढलेल्या गुंतवणूकीमुळे उदयाची उत्पादनक्षमता वाढून त्या उत्पादन क्षमतेचा वापर व्हावा म्हणून वास्तव उत्पन्नात वाढ व्हावी लागते व ही वाढ गुंतवणूक वाढवूनच करावी लागते. थोडक्यात म्हणजे एकाच जागी (पूर्ण रोजगाराच्या अवस्थेत) राहण्यासाठी अर्थव्यवस्थेला अधिक आणि अधिक वेगाने पळत रहावे लागते. वास्तव उत्पन्नात वाढत्या दराने वाढ करण्याइतकी गुंतवणूक भांडवलशाही अर्थव्यवस्था करु शकेल काय हीच ती मूलभूत समस्या आहे.

### ३.३.३ हेरॉडचे विवेचन (Harrod's Model) :

हेरॉडचे विवेचन समजून घेण्यासाठी, त्या विवेचनात वापरलेल्या वाढीच्या दरासंबंधीच्या काही संकल्पना सर्वप्रथम समजून घेणे आवश्यक आहे. उत्पादन प्रक्रियेत श्रम व भांडवल प्रामुख्याने असल्याने वाढीच्या दराचा विचार १) श्रमाच्या संदर्भात आणि २) भांडवलाच्या सांदर्भात हेरॉडने केला आहे. श्रमाच्या संदर्भात वाढीचा विचार करताना त्याने वाढीचा नैसर्गिक दर (Natural Growth Rate) ही संकल्पना मांडली आहे. आपण हा दर असा दाखवू. हेरॉडच्या प्रतिमानात Gn हा वाढीचा दर सर्वोच्च दर किंवा पूर्ण रोजगाराची कमाल मर्यादा असून हा दर श्रमिकांची संख्या, नैसर्गिक साधनसंपत्ती व तंत्रविज्ञान या गोष्टीवरुन ठरतो. मानवी व नैसर्गिक साधनसंपत्ती आणि तंत्रविज्ञान यात प्रगती झाल्यास Gn वाढू शकतो. भांडवलाच्या संदर्भात वाढीचा विचार करताना त्याने विकासाचा अनुज्ञेय दर (Warranted Growth Rate) ही संकल्पना मांडली आहे. हा दर Gw असा दाखवू. Gw म्हणजे भांडवल संचयातील वाढीचा पूर्णपणे उपयोग होण्यासाठी आवश्यक असलेल्या वाढीचा दर होय. 'प्रत्यक्ष वाढीचा दर' (Actual Growth Rate) ही त्याची तिसरी संकल्पना होय. हा दर आपण G असा दाखवू. G म्हणजे वाढीचा प्रत्यक्ष अस्तित्त्वात असलेला दर अर्थात Gn हा वाढीचा कमाल दर असल्याने G हा Gn पेक्षा कधीच जास्त असू शकणार नाही तो Gn इतका किंवा त्यापेक्षा कमी असू शकतो. ही अट $G<Gn$ अशी सांगता येईल. हेरॉडने आपल्या विवेचनात Gn, G व Gw यामधील संतुलनासाठी कोणती परिस्थिती आवश्यक आहे, त्यासाठी कोणत्या अटी पूर्ण व्हावा लागतात व या विकास दरात तफावत निर्माण झाल्यास काय परिणाम होऊ शकतो याचे स्पष्टीकरण केले आहे.

पूर्ण रोजगाराच्या संतुलनासाठी बचत = गुंतवणूक (S=I) ही अट पूर्ण होणे आवश्यक आहे हेरॉड ही अट (GC=S) अशी मोडतो. येथे म्हणजे उत्पादन वाढीचा (प्रत्यक्ष) दर होय.

$\alpha Y = V\Delta Y$ $G = \dfrac{\text{उत्पन्नातील वाढ}}{\text{मूळ उत्पादन}} = \dfrac{\Delta Y}{Y}$ असे म्हणता येईल. C म्हणजे भांडवल संचयातील वाढ असून गुंतवणूक व वाढीव उत्पन्न याचे गुणोत्तर C दर्शवते. $C = \dfrac{I}{\Delta Y}$ S म्हणजे बचत असून ती उत्पन्नाचा विशिष्ट भाग म्हणून दाखविली जाते. म्हणजे GC = S हे समीकरण आता $\dfrac{\Delta Y}{Y} \; \dfrac{I}{\Delta Y} = S$ म्हणजेच $\dfrac{I}{Y} = S$ असे लिहिता येईल. पण बचत S ही

उत्पन्नाचा भाग किंवा प्रमाण म्हणून दशा|वली असल्याने $S = \frac{S}{Y}$ असे मोडता येईल व त्यामुळे $\frac{I}{Y} = \frac{S}{Y}$ असे समीकरण मांडून त्यावरुन I = S म्हणजेच गुंतवणूक = बचत असा निष्कर्ष काढता येईल. येथे I व S प्रत्यक्ष (Ex-post) गुंतवणूक व बचत दाखवितात स्थिर दराने विकास घडून येण्यासाठी अपेक्षित [Ex-ante] I व S समान असले पाहिजेत. ही अट हेरॉड Gw CR = S अशी लिहितो. येथे Gw म्हणजे वाढीचा अनुज्ञेय दर असून Cr म्हणजे वाढीच्या अनुज्ञेय दरामुळे वाढलेला उपभोग पुरेसे असे उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेला भांडवल संचय होय. जर अपेक्षित I व S मध्ये तफावत पडली. समजा जर अपेक्षित S अपेक्षित I पेक्षा जास्त असेल तर मालाच्या साठ्याच्या स्वरुपात गुंतवणूक वाढवावी लागेल व शेवटी असमतोल निर्माण होईल.

हेरॉडचे हे प्रतिमान आपल्याला डोमारच्या प्रतिमानात सहज रुपांतरित करता येते. समजा अपेक्षित बचत ($S^1$) सीमांत बचत प्रवृत्ती व उत्पन्न यांच्या गुणाकाराइतकी आहे. ($S^1 = \alpha Y = \alpha$ सी. ब. प्र. व Y = उत्पन्न) आणि अपेक्षित गुंतवणूक ($I^1$) ही भांडवल गुणक V व उत्पन्नातील वाढ ($\Delta Y$) यांच्या गुणाकाराइतकी ($I^1 = V\Delta Y$) आहे. अशा परिस्थितीत समतोलासाठी $S^1 = I^1$ ही अट पूर्ण व्हावी लागले. म्हणजेच $\alpha Y = V\Delta Y$ किंवा $\frac{\Delta Y}{V} = \alpha / V$ अशी स्थिती निर्माण व्हावी लागेल येथे $\Delta Y / Y$ हा वास्तव उत्पन्नाच्या वाढीचा दरसाल दर शेकडा दर असून तो $\alpha / V$ इतका असणे आवश्यक आहे. $\alpha / P$ हा दर डोमारच्या किंवा हेरॉडच्या Gw या दराइतकाच आहे.

आपण मागे पाहिलेले Gw CR = S हे समीकरण स्थिर विकासाची अट पूर्ण करणारे असले तरी खरोखरच अर्थव्यवस्था या स्थिर विकासाच्या मार्गावर नेहमी असते का? असा प्रश्न हेरॉड उपस्थित करतो. या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी असू शकते. अर्थव्यवस्था या स्थिर विकासाच्या मार्गापासून ढळू शकते व असमतोल निर्माण होऊ शकतो. या असमतोलाचे स्वरुप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

जर G (प्रत्यक्ष दर) Gw पेक्षा (अनुज्ञेय दर) जास्त असेल तर C (भांडवलाचा प्रत्यक्ष संचय) Cr (आवश्यक भांडवल संचय) पेक्षा कमी असेल. त्यामुळे भांडवली वस्तूंचा तुटवडा जाणवू लागेल व स्फीती (Inflation) ची अवस्था निर्माण होईल अपेक्षित गुंतवणूक (II) अपेक्षित बचतीपेक्षा ($S^1$) जास्त होईल व एकूण उत्पादन एकूण मागणीपेक्षा कमी असेल या उलट G जर Gw पेक्षा कमी असेल तर C, Cr पेक्षा जास्त होईल भांडवल व संचयाचा साठा आवश्यकतेपेक्षा जास्त होईल अवस्फीती निर्माण होऊन $S^1$, $I^1$ पेक्षा जास्त होईल. सर्व उत्पादन विकले जाणे कठीण होऊन बसेल. येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे ती म्हणजे जेव्हा G, Gw पेक्षा जास्त असते त्यावेळी उत्पादन वाढत असल तरी उत्पादनापेक्षाही जास्त प्रमाणात एकूण मागणी वाढते व त्यामुळेच 'स्फीती' निर्माण होते.

अर्थव्यवस्थेचे वाढीच्या स्थिर पथापासूनचे विचलन हे एकदा सुरु झाले म्हणजे आवर्त पद्धतीने त्याच दिशेने वाढते. म्हणजेच ज्यावेळी G>Gw अशी स्थिती असते त्यावेळी

स्फीती वाढतच जाते तर या उलट ज्यावेळी G>Gw अशी स्थिती असते त्यावेळी 
अवास्फीती ही वाढत जाते.

या विचलनाच्या किमान व कमाल मर्यादाही हेरॉडने सांगितल्या आहेत. कमाल मर्यादा Gn ने ठरते व G>Gn अशी स्थिती कधीच निर्माण होत नाही. पण Gn, Gw पेक्षा कमी असू शकतो. अशावेळी उत्पन्नातील वाढ Gn या दरापर्यंतच येऊन थांबते. उत्पन्नाच्या वाढीचा दर Gn च्या पलीकडे जाऊ शकत नसल्याने व Gw>Gn अशी स्थिती असल्याने उत्पन्न वाढीचा दर Gw पेक्षा कमी राहून अतिरिक्त-उत्पादनाची अवस्था निर्माण होऊन अर्थव्यवस्था घसरणीला लागते. या प्रमाणे Gw हा G आणि Gn पेक्षा जास्त असल्यास दीर्घकालीन कुंठितावस्था निर्माण होऊ शकते.

### ३.३.४. हेरॉड-डोमार समस्या (Harrod-Domar Problem) :

श्रमिक आणि भांडवल यांच्या संदर्भात उत्पादनाचा एकत्र विचार केल्यास विकासाचा नैसर्गिक दर (Gn) व अनुज्ञेय दर (Gw) समान होणे आवश्यक आहे. ही गोष्ट स्पष्ट होते Gn = Gw अट पूर्ण होण्यासाठी श्रमिक शक्तीच्या वाढीचा दर, बचतीचे प्रमाण व भांडवल गुणक (Capital Co-efficient) यांचे योग्य प्रमाण नेहमी साधता आले पाहिजे. त्यापैकी श्रमिक शक्तीच्या वाढीचा दर व भांडवल गुणक या गोष्टी 'आर्थिक प्रक्रिया' बाह्य (externally) घटकांनी ठरतात. आता प्रश्न फक्त बचत दराचा आहे. केन्सच्या सिद्धांताप्रमाणे बचतीचे प्रमाण उत्पन्नाच्या वाढीवरुन ठरते आणि अशी गुंतवणूक मागणीच्या अपेक्षेवर अवलंबून असते. मागणीची ही अपेक्षा नेहमीच खरी ठरेल अशी निश्चिती नसते. श्रमिकांच्या वाढीचा एखादा विशिष्ट दर असता ही मागणी कमी झाल्यास बेकारी निर्माण होईल या उलट मागणी वाढल्यास श्रमशक्तीचा तुटवडा पडून निर्माण होईल. म्हणजेच पूर्ण रोजगाराची पातळी कायम ठेऊन स्थिर दराने वाढणारी व समतोल राखणारी अर्थव्यवस्था प्रत्यक्षात अशक्यप्राय आहे असा निष्कर्ष निघतो. या अशक्यतेलाच हेरॉड-डोमार समस्या म्हणतात.

### ३.३.५ हेरॉड-डोमार सिद्धांताचे मूल्यमापन (मर्यादा) (Limitations of Harrod-Domar Model) :

या सिद्धांतानुसार काढण्यात आलेले निष्कर्ष अनेक प्रकारच्या अवाजवी व अनावश्यक गृहीतकांवर आधारलेले असल्याने या सिद्धांताला अनेक मर्यादा पडल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे:

१) श्रमिक भांडवलाचे उत्पादन व्यवस्थेतील प्रमाण कायम मानण्यात आले आहे. प्रत्यक्षात ते कायम नसते व हे प्रमाण बदलल्यास असमतोल निर्माण होतोच असे नाही.

२) बचत प्रवृत्ती दर व भांडवल गुणक या गोष्टी गृहीत धरल्याप्रमाणे स्थिर नसतात व त्या गोष्टी नसल्या तरी विकासाचा दर कायम राखणे शक्य होऊ शकते.

३) सरकारी हस्तक्षेप, सरकारी गुंतवणूक, औद्योगिक धोरण, इ. चा विकासावर मोठा परिणाम होतो, त्या गोष्टी अस्तित्त्वातच नाहीत असे मानणे अव्यवहार्य ठरेल.

४) किंमत बदलांचा विचार या सिद्धांतात नाही प्रत्यक्षात मात्र किंमतीची पातळी बदलत असते.

५) व्याजाचा दर स्थिर धरण्यात आला आहे. प्रत्यक्षात मात्र व्याज-दर बदलून त्याचा विकासावर परिणाम होऊ शकतो.

या मर्यादा मान्य करुनही या सिद्धांताचे महत्त्व कमी लेखून चालणार नाही, केन्सचा सिद्धांत अल्पकालीन परिस्थितीचे विवेचन करणार होता. या उलट दीर्घकालीन व गतिशील अवस्थेत पूर्ण रोजगाराची कितपत शक्यता असेल याचा विचार हा सिद्धांत करतो.

### ३.३.६ अविकसित देशांच्या संदर्भात हेरॉड-डोमर सिद्धांताचा विचार (Harrod-Domar Model with respect to underdeveloped countries) :

हा सिद्धांत प्रामुख्याने अर्थव्यवस्थेची कुंठितावस्था (Stangnation) व असमतोल यांचा विचार करीत असला तरीही अविकसित किंवा विकसनशील देशातील काही समस्या सोडण्यासाठी या सिद्धांताचा उपयोग होऊ शकतो. अविकसित देशातील साधनसामग्रीचा पूर्ण उपयोग होण्याच्या दृष्टीने विकासाचा आवश्यक दर ठरविणे. राष्ट्रीय उत्पन्नाची विशिष्ट पातळी गाठण्यासाठी आवश्यक असा बचत दर व भांडवलउत्पादन गुणोत्तर ठरविणे या गोष्टी ह्या सिद्धांतामुळे शक्य होतात. उदा. जर वाढीचा अनुज्ञेय दर (Gw)३% असेल व भांडवल उत्पादन गुणोत्तर ४:१ असेल तर बचतीचा योग्य दर ४ × ३=१२ (दरवर्षी) ठरवता येईल.

अविकसित देशांना हा सिद्धांत लागू करण्याच्या दृष्टीने हेरॉडने आपल्या सिद्धांतात काही बदल व सुधारणा केल्या आहेत. बचतीच्या पुरवठा-मागणीचे स्पष्टीकरण करण्यासाठी त्याने नैसर्गिक व्याज-दराची कल्पना मांडली असून हा दर ($\alpha n$) म्हणजे दरडोई उत्पन्नाचा नैसर्गिक दर (Pn) व वाढीचा नैसर्गिक दर (Gn) याचा गुणाकार व उत्पन्नाची लवचिकता (ey) यांचे गुणोत्तर होय. म्हणजेच $\alpha n = Pn\ Gn/ey$ ची किंमत १ पेक्षा कमी असेल $\alpha n$ हा दर ey च्या व्यस्त प्रमाणात बदलती हे लक्षात ठेवले पाहिजे. भांडवलाचा वापर $\alpha n$ च्या व्यस्त प्रमाणात बदलेल हे स्पष्ट आहे. भांडवल पुरवठ्यासाठी बचतीची आवश्यकता असते. साधारणपणे अविकसित देशात बचतीचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा कमी असते. जर प्रत्यक्ष बचत आवश्यकतेपेक्षा जास्त असेल तर Gw/Gn अशी परिस्थिती निर्माण होईल. म्हणजे बचत जास्त असल्याने उद्योजक जास्त गुंतवणूक करतील. अविकसित देशात बचतीचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असते ही गोष्ट दीर्घकाळात शक्यच नाही. त्यामुळे दीर्घकाळात Gw/Gn ही परिस्थिती निर्माणच होणार नाही. या उलट वाढीचा प्रत्यक्ष दर (G) हा Gw पेक्षाही कमीच राहण्याची शक्यता अधिक त्यामुळे मंदीची परिस्थिती निर्माण होईल.

प्रचंड प्रमाणावरील गुंतवणूक, चलन फुगवटा व अल्पप्रमाणात बचत ही अविकसत देशांची प्रमुख लक्षणे आहेत. प्रचंड गुंतवणूकीसाठी बँकाकडून पत पुरवठा करण्यात यावा व चलन वाढीमुळे मिळणारा नफा भांडवल-बाजारात [Capital Market] गुंतवावा असे हेरॉड सुचवतो. अशा देशात संघटित बाजार नसल्याने पत-पैसा पुरवण्याची जबाबदारी बँकावर पडते हे उघड आहे. प्रभावी उपाय योजनानी बचतीचे प्रमाण वाढवणे हाच एक मार्ग यावर

सुचवता येईल. त्याचबरोबर सामाजिक व संस्थात्मक बदलही घडून येणे अत्यंत आवश्यक आहे ही गोष्ट देखील नजरे आड करुन चालणार नाही.



### ३.३.७ अविकसित देशांच्या संदर्भात हेरॉड-डोमार सिद्धांताच्या मर्यादा (Limitations of Harrod-Domar Model with respect to Underdevelopedd Countries)

अविकसित देशातील विकासाच्या काही समस्यांचा विचार या सिद्धांतात केला गेला तरी अशा रितीने या सिद्धांताचा उपयोग करण्यात पुढील अडचणी येतात.

१) विकसित व अविकसित देश यामधील सामाजिक व संस्थात्मक परिस्थिती, मुद्रा बाजार, बचत-गुंतवणूकीचे दर इ. सर्वच बाबतीत फार तफावत असल्याने विकसित देशांमधील संभाव्य कुंठितावस्था निर्देशित करण्यासाठी मांडलेला सिद्धांत अविकसित देशांना फारसा उपयोगी पडत नाही.

२) हा सिद्धांत उच्च-बचत दर व उच्च भांडवल उत्पादन गुणोत्तर असलेल्या देशांनाच उपयोगी आहे. निर्वाहपातळीवर जगणार्या समाजासाठी त्याचा उपयोग होऊ शकत नाही.

३) अविकसित देशातील उत्पादन प्रक्रियेत कोंडीची (Bottle Necks) परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे या देशात भांडवल उत्पादन गुणोत्तराची कल्पना फारशी उपयोगी पडत नाही.

४) सिद्धांत प्रामुख्याने सार्वत्रिक मागणी कमी असलेल्या परिस्थितीतून उद्भवणार्या बेरोजगारीचा विचार करतो. अविकसित देशातील बेकारी रचनांतर्गत कारणामुळे (Structural Unemployment) व भांडवली वस्तूंच्या दुर्मिळतेमुळे असते. हा सिद्धांत अशा स्वरुपाची बेकारी विचारात घेत नाही.

५) हा सिद्धांत पूर्ण रोजगारीच्या गृहीतावर आधारलेला आहे. उलट अविकसित देश छुप्या बेकारीने ग्रासलेले असतात. त्यांना हा सिद्धांत लावताच येणार नाही.

६) अविकसित देश शासकीय हस्तक्षेपापासून मुक्त राहूच शकत नाही. भांडवल गुंतवणूक, संयोजन इ. ची प्रमुख जबाबदारी शासनाकडेच असते. अशा परिस्थितीचा विचार हेरॉड-डोमार सिद्धांत करीत नाही.

७) हेरॉड-डोमार सिद्धांत विदेशी व्यापाराचा विचार करीत नाही. उलट अविकसित देश विदेशी व्यापाराशिवाय जागूच शकत नसल्याने हा सिद्धांत त्यांना फारसा लागू करता येणार नाही.

८) किंमतीचे स्थैर्य हा सिद्धांत गृहित धरतो. अविकसित देशांत किंमती वाढण्याची व सापेक्ष किंमती बदलण्याची प्रवृत्ती आढळते. त्यामुळे हा सिद्धांत या देशात फारसा उपयोगी नसतो.

९) हा सिद्धांत संस्थात्मक बदल होत नाहीत असे मानतो मात्र अविकसित देशात संस्थात्मक बदल विकासासाठाr आवश्यक असतात. त्यामुळे हे सिद्धांत अशा देशाच्या बाबतीत अपुरा ठरतो.

**आपली प्रगती तपासा :**

१) हेरॉड-डोमर वृद्धी प्रतिमानातील मुख्य विचार थोडक्यात लिहा.

२) हेरॉड-डोमर प्रतिमानाची गृहीते स्पष्ट करा.

३) हेरॉड-डोमर प्रतिमानाच्या समस्या विशद करा.

४) हेरॉड-डोमर सिद्धांताचे मूल्यमापन करा.

५) हेरॉड-डोमर सिद्धांताचे अविकसित देशांच्या बाबतीतील विचार स्पष्ट करा.

## ३.४ रोडानचा मोठा धक्का सिद्धांत (THE BIG PUSH THEORY)

**प्रास्ताविक :**

गतिशून्य अर्थव्यवस्थेचे मूळच जडत्व नष्ट करुन तिला अधिकाधिक उत्पादनाच्या दिशेने गतिशील करण्यासाठी अनेक लहान-लहान, काळाच्या ओघात विखुरलेल्या प्रयत्नांपेक्षा एकाच वेळी मोठ्या सुसंघटित व व्यापक प्रयत्नांची शक्ती वापरणे आवश्यक आहे.

रोझेन्स्टीन रोडान यांनी १९४३ मध्ये The Economic Journal ceO³es "Industrialization of Eastern & South Eastern Europe" हा शोधनिबंध लिहिला होता. तर १९५७ मध्ये MIT-CIS मध्ये "मोठा धक्का सिद्धांत" (Theory of the Big Push) यावर नोट्स लिहिली.

**मुख्य कल्पना :**

प्रा. रोझेन्स्टीन रोडान यांनी मांडलेल्या सिद्धांताची मुख्य कल्पना अशी आहे की, विकासाची ही प्रक्रिया मुळात अनेक तुटक अशा उड्डणांची असते. विकासास आवश्यक असणार्या घटकांपैकी परस्परसंबंध अनेक स्वरुपाच्या खंडितपणाचे अगर अविभाज्य अशा किमान आकाराचे असतात. आर्थिक विकासाचा प्रयत्न यशस्वी करावयाचा असेल तर एका किमान मोठ्या प्रमाणात साधनसंपत्तीचा वापर करणे अपरिहार्य असते. विमानाला आकाशात झेप घेण्यासाठी धावपट्टीवरुन एका किमान वेगाची मर्यादा ओलांडावी लागते. तसेच आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी ही एका किमान वेगाची किंवा एका मोठ्या धक्क्याची गरज असते.

**अविभाज्यता (Indivisibilities) :**

रोझेन्स्टीन रोडान ने तीन प्रकारच्या अविभाज्यतेची चर्चा केली आहे. ती उत्पादन फलनातील अविभाज्यता, मागणीची अविभाज्यता आणि बचतीच्या पुरवठ्यातील अविभाज्यता सांगितली आहे. त्यांची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे केली आहे.

**अ) उत्पादन फलनातील अविभाज्यता :**

या अविभाज्यतेत उत्पादन घेण्यासाठी आवश्यक असणार्या सामाजिक व आर्थिक स्वरुपाच्या सुविधांचे आकारमान पुरवठा हा किमान प्रमाणात असावा लागतो. उदा. रस्ते,

रेल्वे, शिक्षण, आरोग्य, दळणवळण, वीज, पाणीपुरवठा, गृहनिर्माण इ. सेवा अशा प्रकारच्या आवश्यक असणार्या सेवा अल्प प्रमाणात निर्माण करुन फायदा होत नाही. त्याऐवजी अशा प्रकारच्या सुविधा मोठ्या प्रमाणात निर्माण केल्यास इतर उद्योगाच्या विकासासाठी आवश्यक असणार्या गुंतवणूकीस संधी मिळते. अशा प्रकारच्या सेवा किमान प्रमाणात निर्माण केल्याशिवाय इतर उद्योगाचा विकास होत नाही. अशा प्रकारच्या सेवाची इतर देशांकडून आयात ही करता येत नाही. या सेवेत केलेली गुंतवणूक दीर्घकाळ उपयुक्त असते. या गुंतवणूकीचा फलधारणा कालावधी जास्त असतो. वरील सांगितलेल्या क्षेत्रात किमान करण्याची गरज असते. तरच त्यांचा उपयोग होतो. अशा प्रकारच्या सेवा व क्षेत्रात अप्रगत देशांनी ३० ते ४०% गुंतवणूक करण्याची गरज असते. त्यामुळे विकसनशील देशांच्या विकास येणारे अडथळे दूर करता येतात. या अविभाज्यता विचारात घेऊन अप्रगत देशांनी या सुविधांत प्रचंड अशी किमान गुंतवणूक केली पाहिजे. सामाजिक वरकड भांडवलात, कालाची अविभाज्यता, टिकाऊपणाची अविभाज्यता दीर्घ फलधारणा कालाची अविभाज्यता व विविध सार्वजनिक उपयुक्ततेचे मिश्रण असणारी फेरफार न करता येणारी अविभाज्यता असते.

अशा रीतीने सामाजिक वरकड भांडवलाच्या पुरवठ्याच्या अविभाज्यता हा अप्रगत देशांच्या विकासातील अडथळा असतो. म्हणून उत्पादन लवकरात लवकर व्हावे यासाठी सुरुवातीलाच सामाजिक वरकड भांडवलाची गुंतवणूक मोठ्या प्रमाणात व आवश्यक प्रमाणात झाल्यास या अप्रगत देशांच्या विकासाचा मार्ग सुलभ होतो.

**ब) मागणीची अविभाज्यता :**

मागणीची अविभाज्यता ही संकल्पना रोझेन्स्टीन रोडान यांनी १९४३ मध्ये मांडली होती. नंतर त्या संकल्पनेत प्रा. रॅग्नर नर्क्स यांनी संतुलित विकासाचे स्पष्टीकरण करताना सुधारणा केली. प्रा. रोडानच्या मते, मागणीची अविभाज्यता प्राप्त करण्यासाठी एकाच वेळेस परस्परावलंबी उद्योग सुरु केले पाहिजेत. एखाद्या उद्योगात जर गुंतवणूक केली तर त्यात अनिश्चितता आणि धोक्याचे प्रमाण जास्त असते. कारण त्या उद्योगातील उत्पादनाला बाजारपेठ मिळेल का नाही म्हणजेच उत्पादनाला मागणी असेल का नाही सांगता येत नाही. त्यापेक्षा एका उद्योगाऐवजी अनेक उद्योग एकत्रितपणे सुरु करावेत त्यामुळे परस्परांच्या वस्तूंना मागणी निर्माण होते यासाठी रोडानने पुढील उदाहरण दिले आहे.

समजा एक बंद अप्रगत अर्थव्यवस्था आहे. निर्वाह क्षेत्रातील १०० छुप्या बेकारांना एका चप्पल तयार करण्याच्या कारखान्यात कामावर ठेवण्यात आले. त्यांना कामावर ठेवल्यामुळे त्यांना वेतन मिळते. वेतन मिळाल्यामुळे सुप्त बेकारांच्या उत्पन्नात वाढ हाते. या सर्व सुप्त बेकारांनी आपले सर्व उत्पन्न जर त्यांनी निर्माण केलेल्या चप्पलांवर खर्च केले तरच त्या उद्योगाला आवश्यक असणारी मागणी पूर्ण होते. परंतु हे बेकार कामगार सर्व उत्पन्न चप्पल खरेदी करण्यासाठी वापरणार नाहीत. कारण त्यांना इतर उपभोग्य वस्तू व सेवा खरेदी करण्यासाठी उत्पन्न खर्च करावे लागते. त्यामुळे चप्पल उत्पादनाला बाजारपेठ मिळणार नाही. त्यामुळे एखाद्या उद्योगातील गुंतवणूक धोक्याची वाटते त्यामुळे एखादा उद्योग स्वतंत्रपणे यशस्वी होणे अवघड असते. परंतु एका ऐवजी अनेक उद्योग सुरु केले तर यशस्वी होतील. एकाच वेळी १०० विविध उद्योगात प्रत्येकी १०० सुप्त कामगरांना काम

दिल्यास १०,००० सुप्त बेकार कामगारांना काम मिळेल. हे सर्व कामगार उपभोक्त्यांना गरजेच्या असणाऱ्या व त्यांना पण गरजेच्या असणार्या वस्तूंचे उत्पादन करतील. त्यामुळे एका उद्योगाचे कामगार दुसर्या उद्योगाचे ग्राहक होतील. त्यामुळे सर्व उद्योगातील उत्पादनाला मागणी मिळेल. अनेक ठिकाणी एकाच वेळी गुंतवणूक केल्याने परस्परपूरक मागणी निर्माण होईल. आवश्यक असणारी किमान गुंतवणूकीत चालना मिळेल.

वरील उदाहरणातील विवेचनावरुन पुढील दोन घटक स्पष्ट होतात.

१) नविन सुप्त बेकार कामगारांचे उत्पन्न ज्या उपभोग्य वस्तूंवर खर्च होणार आहे त्यांचे उत्पादन करण्यासाठी काही किमान गुंतवणूक विविध उद्योगांत करावी लागते.

२) प्रत्येक उद्योगात होणारी गुंतवणूक ही इतर उद्योगातील गुंतवणूकीच्या निर्णयावर अवलंबून असते.

थोडक्यात या गुंतवणूकीच्या निर्णयामध्ये परस्पर संबद्धता अविभाज्यता असते. प्रा. बेंजामिन हिगिन्स यांनीही या अविभाज्यतेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. अशा रीतीने अविकसित देशांतील बाजारपेठांच्या लहान आकार व गुंतवणूकीच्या क्षीण प्रेरणा टाळण्यासाठी परस्परावलंबी उद्योगात अधिक प्रमाणात किमान गुंतवणूक केल्यास मागणीची अविभाज्यता प्राप्त होते.

**क) बचतीच्या पुरवठ्यातील अविभाज्यता :**

रोडानने आपल्या सिद्धांतात बचतीच्या पुरवठ्याची तिसरी अविभाज्यता स्पष्ट केली आहे. अविकसित देशांना आपला जलद आर्थिक विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते. म्हणजेच गुंतवणूकीची गरज असते. मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी मोठ्या प्रमाणात बचतीची गरज असते. अविकसित देशात दारिद्र्यामुळे उत्पन्न पातळी कमी असते. उत्पन्न कमी असल्यामुळे बचतपण कमी असते. म्हणूनच बचतीच्या या वैशिष्ट्यालाच बचतीची अविभाज्यता असे म्हटले आहे. या बचतीच्या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी जेव्हा वाढत्या भांडवल गुंतवणूकीमुळे उत्पन्ना वाढ होते. त्यावेळी उत्पन्नातील वाढीचा मोठा भाग बचतीकडे वळविला पाहिजे. म्हणजे सरासरी बचत प्रमाणापेक्षा सीमांत बचत प्रमाण जास्त असले पाहिजे. यासाठी किमान मोठ्या प्रमाणात आवश्यक बचत व गुंतवणूक होण्यासाठी मोठ्या प्रमाणात शासकीय मदत, मार्गदर्शन व हस्तक्षेपाची गरज असते.

आर्थिक विकासातील अडथळे कमी करण्यासाठी किंवा नष्ट करण्यासाठी व अर्थव्यवस्थेला एका गतीला पोहचविण्यासाठी किमान मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतवणूकीची एक आवश्यकता असते. कारण अविकसित देशांत एक प्रकारची मानसिक अविभाज्यता असते. त्यामुळे लोकांना आवश्यक त्या सामर्थ्यांचे व उत्पादने काम करण्यासाठी एका किमान वर्गाची किंवा मोठ्या आकाराची गुंतवणूक करण्याची गरज असते.

**टीकात्मक मूल्यमापन :**

रोडान यांनी आर्थिक विकासाचे केलेले विवेचन अविभाज्यता व मोठ्या प्रमाणाचे फायदे तसेच विकासाची प्रक्रिया खंडित उड्डाणाची असते. या गृहीत गोष्टीवर अवलंबून असते. त्यामुळे रोडानने केलेले विश्लेषण गतिमान व वास्तव असल्याचे वाटते. त्याने आपल्या विवेचनात अर्थव्यवस्था समतोलित अवस्थेकडे कशी जाते यांचा मार्ग सांगितला आहे. अविकसित देशात बाजारपेठेत अपूर्णता असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्याची गरज त्याने सांगितली आहे. रोडानने आर्थिक विकासाचे केलेल विवेचन अधिक व्यवहारी वाटते. तरीपण रोडान यांच्या सिद्धांतावर पुढील टीका केलेल्या आहेत.

**१) शेती क्षेत्रातील गुंतवणूकीकडे दुर्लक्ष :**

रोडान यांनी आपला आर्थिक विकासाच्या सिद्धांत मांडताना शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष केले आहे. शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यास होणार्या फायद्याकडे दुर्लक्ष केले. अविकसित देशात शेती व व्यवसाय प्रमुख असतो. त्या व्यवसायासाठी पाणीपुरवठा, वाहतुक, दळणवळण, आधुनिक अवजारे, यंत्रे यासारंख्या सोई, खते, कीटकनाशके, जमीनसुधारणा केल्यास मोठ्या प्रमाणात शेतीतील उत्पादन आणि उत्पादकता वाढेल. परंतु रोडानने शेतीकडे दुर्लक्ष केले.

**२) कमी गुंतवणूकीचे अधिक उत्पादन शक्य :**

प्रा. जॉन ॲडलर यांनी भारत, पाकिस्तान व इतर आशियाई व दक्षिण अमेरिकन देशांचा अभ्यास करुन असे निष्कर्ष काढले की, कमी गुंतवणूक करुन ही अधिक उत्पादन करता येते. आर्थिक विकास करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीची गरजच असते असे नाही.

**३) परकीय व्यापाराकडे दुर्लक्ष :**

प्रा. जॅकोब व्हायनर च्या मते, अविकसित देशांना परकीय व्यापारातून ही मोठ्या प्रमाणात फायदे मिळू शकतात. अविकसित देशातील गुंतवणूकीचा मोठा वापर निर्यात उद्योग आणि कमी प्रमाणात आयात पर्यायी उद्योगासाठी वापरला जातो. त्यामुळे आवश्यक परकीय व्यापाराचे फायदे मिळत नाहीत.

**४) प्रशासकीय आणि संस्थात्मक समस्या :**

रोडान यांच्या मोठ्या प्रमाणातील गुंतवणूकीचे फायदे होण्यासाठी व गुंतवणूक व्यवस्थित पार पाडण्यासाठी कार्यक्षम अशा प्रशासकीय आणि संस्थात्मक रचनेची (संस्थेची) गरज असते. अविकसित देशात विकासाच्या सुरुवातीच्या काळातील व्यवस्था विकासाच्या विरोधी असते. शासन व्यवस्था अकार्यक्षम व दुर्बल असते. या काळात तंत्रज्ञान, यंत्रसामग्री, प्रशिक्षित कर्मचारी, व्यवस्थापक यांची कमतरता असते.

**५) चलनवाढीचा धोका :**

रोडानच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांत मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करावी लागते. भांडवल उत्पादन प्रमाण जास्त असते. अशा भांडवली गुंतवणूकीचा गर्भधारणा / फलधारणा

कालावधी जास्त असतो परंतु या अविकसित देशात उत्पन्न पातळी कमी असल्यामुळे बचत ही कमी असते. तेव्हा ही मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक करण्यासाठी तुटीचा अर्थभरणा करुन पैशाचा पुरवठा वाढवितात. परंतु अर्थव्यवस्थेत पैशाचा पुरवठा वाढला असता लोकांची क्रयशक्ती वाढून वस्तूची मागणी वाढते त्यांतून वस्तूच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढतात आणि अर्थव्यवस्था चलनवाढीच्या समस्येत जाते.

**६) कमी खर्चाच्या गुंतवणूकीचे अल्प बाह्य फायदे :**

सार्वजनिक सेवा व स्थानिक ग्राहक वस्तूंच्या उत्पादनात बाह्य फायदे कमी प्रमाणात मिळतात. अलवचिक वस्तूंच्या मागणीच्या संदर्भात गुंतवणूक खर्च कमी येतो पण त्यामानाने उत्पादनात वाढ होत नाही.

**७) ऐतिहासिक पुरावा नाही :**

रोडान यांच्या मोठा धक्का सिद्धांताला ऐतिहासिक पुरावा नाही असे प्रा. हॅगेन यांचे मत आहे. रोडानचा सिद्धांत हा एक विकासाचा संभाव्य मार्ग असा त्यांचा अर्थ घेता येईल.

**८) आर्थिकेत्तेर घटकाकडे दुर्लक्ष :**

रोडान यांनी आपला आर्थिक विकासाचा मोठा धक्का सिद्धांत मांडताना मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक केल्यास फायदे मिळतात असे आर्थिक घटकाचे विश्लेषण केले आहे. परंतु मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यासाठी तसेच ती यशस्वी होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज असते या आर्थिकत्तेर घटकाकडे दुर्लक्ष केले आहे.

रोडान यांच्या आर्थिक विकासाच्या विवेचनात वरीलसारखे दोष असले तरीसुद्धा त्यांनी ज्या काळात आपले विचार मांडले ते त्यावेळी अधिक व्यापक व वास्तव होते.

**आपली प्रगती तपासा :**

१) मोठा धक्का सिद्धांत कोणी मांडला?

२) रोडानच्या मतानुसार अविभाज्यतेचे तीन प्रकार कोणते?

## ३.५ लेबिन्स्टिन यांचा किमान आवश्यक प्रयत्नांचा सिद्धांत (LIEBENSTEIN'S THEORY OF CRITICAL MINIMUM EFFORT)

**प्रास्ताविक :**

विकसनशील अर्थव्यवस्थेतील दारिद्र्याचे दृष्टचक्र भेदून विकासाच्या प्रक्रियेत सातत्य येण्याच्या दृष्टीने उपाय सांगणार्या या प्रबंधावर प्रा. लेबिन्स्टिन यांना डा@क्टरेट मिळाली. प्रा. हार्वे लेबिन्स्टीन यांनी आपल्या 'Economic Backwardness and Economic Growth' या १९५७ साली प्रकाशित केलेल्या ग्रंथात आर्थिक विकासासाठी 'किमान आवश्यक प्रयत्नांची" गरज असते हा सिद्धांत मांडला.

विकसनशील अर्थव्यवस्थेत भांडवलनिर्मिती कमी असते. भांडवलनिर्मिती कमी होण्याचे कारण दारिद्र्य असते आणि दारिद्र्य असण्याचे कारण कमी भांडवलनिर्मिती हे आहे. हे दृष्टचक्र भेदल्याशिवाय विकासाला सुरुवात होत नाही. हे विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी निर्णायक प्रयत्न करण्याची गरज असते. ते निर्णायक प्रयत्न विशिष्ट मात्रेत होणे आवश्यक आहे. यालाच किमान आवश्यक प्रयत्न असेच म्हणतात. हा प्रयत्न किमानमात्रेएवढा असल्याशिवाय त्याचा प्रभाव पडत नाही.

प्रा. हार्वे लेबिनस्टीनच्या मते, प्रत्येक अर्थव्यवस्थेत प्रतिसारक व प्रेरक प्रेरणा असतात. प्रेरक प्रेरणांमुळेच दरडोई उत्पन्न वाढते व प्रतिसारक धक्क्यामुळे दरडोई उत्पन्न घटते. अविकसित देशांचा अविकसितपणा हा प्रतिसारक धक्क्यांची शक्ती प्रेरक प्रेरणांपेक्षा अधिक असल्यामुळे असतो. जेव्हा उत्पन्न वाढविणारे घटक (विस्तारित घटक) उत्पन्न कमी करणार्या घटकांपेक्षा (प्रतिसारक घटक) अधिक प्रभावी होतात त्यावेळी किमान आवश्यक प्रयत्नांची पातळी ओलांडली जाते त्यामुळे अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेग घेते. त्यासाठी निर्णायक किमान आवश्यक प्रयत्नांची गरज असते.

**लोकसंख्या वाढ व दरडोई उत्पन्न :**

लेबिन्स्टीन यांचा सिद्धांत प्रामुख्याने लोकसंख्या वाढ ही दरडोई उत्पन्नपातळीवर अवलंबून असते. या गृहीतावर आधारित आहे. आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये या घटकांचा संबंध दिसतो. हा संबंध पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

अर्थव्यवस्थेत जर उत्पन्नाची निर्वाह संतुलन पातळी असेल तर जन्मप्रमाण व मृत्युप्रमाण लोकसंख्या टिकऊन ठेवण्यास आवश्यक परंतु कमाल पातळीवर असतात. अशा परिस्थितीत दरडोई उत्पन्न निर्वाह पातळीपेक्षा अधिक उत्पन्नास जन्मप्रमाण स्थिर राहतो. परंतु मृत्युप्रमाण घटते. त्यामुळे लोकसंख्या वाढते. परंतु लोकसंख्या वाढीची प्रक्रिया विशिष्ट मर्यादेपर्यंतच चालते. त्याच्या पलीकडे दरडोई उत्पन्न वाढत गेल्यास जन्मप्रमाण कमी होत जाते व विकासाचा वेग जसजसा वाढत जाईल तसतसे लोकसंख्या वाढीचा वेग कमी होतो. कारण वाढत्या उत्पन्नाबरोबर जास्त मुले असावीत ही लोकांची इच्छा कमी होते. याबरोबर सामाजिक जाणिवा, शिक्षणाचा प्रसार हे घटकही कारणीभूत असतात. त्याचबरोबर वाढत्या विकासाबरोबर येणारे विशेषीकरण हे सामाजिक व आर्थिक गतिशीलतेला पूरक असल्याने मोठे कुंटुब असणे परवडत नाही. त्यामुळे जन्म व मृत्युदरातील प्रवृत्ती पाहता पहिल्यांदा लोकसंख्या वाढीचा वेग जास्त असतो. तसाच स्थिरावतो व नंतर कमी होतो. जपान आणि पाश्चात्य युरोपियन देशांचा अनुभव हेच सांगतो. तसेच याला सैद्धांतिक आधारपण आहे. लोकसंख्या स्थित्यंतराच्या सिद्धांत त्याला पूरक आहे.

प्रा. हार्वे लेबिन्स्टीन यांच्या मते, जीवशास्त्रीय घटक लक्षात घेता लोकसंख्या वाढीचा वेग ३ ते ४% वार्षिक किंवा त्यापेक्षा जास्त असू शकणार नाही. यातून निर्माण होणारा अतिरिक्त लोकसंख्येचा अडथळा पार करण्यासाठी किमान आवश्यक प्रयत्नांचे प्रमाण मोठे असावे लागते. हा विचार पुढील आकृतीत स्पष्ट केले आहे.




**आकृती क्र. ३.१**

वरील आकृती क्र. ३.१ ox अक्षावर लोकसंख्या वाढीचा दर व राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर व oy अक्षावर दरडोई उत्पन्न पातळी दाखविली आहे. N हा वक्र दरडोई उत्पन्नाची अशी पातळी दर्शवितो की ज्यामुळे उत्पन्नाच्या वाढीचा व लोकसंख्या वाढीचा दर समान होतात. P हा वक्र दरडोई उत्पन्नाच्या पातळीत लोकसंख्या कोणत्या वेगाने वाढेल हा दर दर्शवितो. OA या दरडोई उत्पन्नपातळीस लोकसंख्येची व राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ होत नाही. हा बिंदू एका अर्थात निर्वाह उत्पन्न पातळीचा समतोल दर्शवितो. $OY_1$ या दरडोई उत्पन्नपातळीस लोकसंख्या व राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर समान १% आहे.

दरडोई उत्पन्नपातळी $OY_2$ असेल तर लोकसंख्यावाढीचा दर ($y_2D=2\%$) हा राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दरापेक्षा ($Y_2C=1\%$) जास्त आहे. विकासाची प्रक्रिया सुरु करावयाची असेल तर लोकसंख्या वाढीचा दरापेक्षा राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा दर जास्त असावा लागतो. ही स्थिती $OY_3$ या दरडोई उत्पन्नपातळीनंतर आहे. त्याआधीच्या कोणत्याही पातळीसाठी लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे. प् या ठिकाणी लोकसंख्या वाढीचा कमाल दर ३% असतो. त्यानंतर तो कमी होत जातो $OY_3$ ही दरडोई उत्पन्नाची पातळी या परिस्थितीत आर्थिक विकासासाठी किमान निर्णायक ठरते. ही दरडोई उत्पन्नाची किमान पातळी गाठल्याशिवाय आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरु होणार नाही. वरील विश्लेषणात दरडोई उत्पन्नाची पातळी हा उत्पन्नवाढीसाठी आवश्यक असणारी प्रेरक शक्ती आहे. तर लोकसंख्या वाढीचा दर ही प्रतिसारक शक्ती आहे. कायम स्वरुपाची विकासाची प्रक्रिया सुरु करण्यासाठी प्रारंभिक गुंतवणूक प्रयत्न इतक्या किमान आकारापेक्षा जास्त पाहिजे त्यामुळे दरडोई उत्पन्नात वाढ झाली पाहिजे.

**आकृती क्र. 3.2**




वरील आकृतीत OW ही ४५° चा कोन करणारी रेषा दरडोई उत्पन्नातील प्रेरितवाढ व घट दर्शविते. N वक्र उत्पन्नवाढीची प्रेरणा दर्शवितो. P वक्र उत्पन्न घटीची प्रेरणा दर्शवितो. OX अक्षावर दरडोई उत्पन्न व प्रेरित उत्पन्नवाढ तर OY अक्षावर दरडोई उत्पन्न व प्रेरित उत्पन्नघट दाखविली आहे.

जर दरडोई उत्पन्न $OX_1$ असेल तर उत्पन्नवाढीच्या प्रेरणा af इतक्या असतील व उत्पन्नवाढीच्या प्रेरणा of इतक्या (bf > af) असतील. परिणामत: उत्पन्न घटत जाऊन ते eE इतके होईल हा उत्पन्नघटीचा मार्ग abcd असेल. म्हणजेच oe या निर्वाह संतुलन उत्पन्नपातळीसाठी प्रतिसारक व प्रेरक प्रभाव सारखे असल्याने अर्थव्यवस्था दृष्टचक्रात सापडलेली आहे.

जर उत्पन्नपातळी च्या वर वाढविता आली तरी प्रतिसारक प्रभाव तीव्र असल्याने पूर्वीचीच संतुलन पातळी प्रस्थापित होईल. परंतु जर उत्पन्नपातळी पेक्षा जास्त वाढविता आली तर प्रेरक घटक प्रभावी ठरुन अर्थव्यवस्थेच्या विकासाची सतत प्रक्रिया सुरु होईल व दरडोई उत्पन्न या मार्गाने सतत वाढतच राहिल. प्राथमिक गुंतवणूकिमुळे दरडोई उत्पन्न जर च्या पातळीपर्यंत वाढेल तरच त्यानंतर सतत विकास शक्य आहे. म्हणजेच दरडोई उत्पन्न इतके किंवा अधिक करण्यासाठी आवश्यक असणारी भांडवल गुंतवणूक म्हणजेच किमान आवश्यक प्रयत्न होय.

**निर्णायक किमान प्रयत्नांची आवश्यकता :**

१) विकासावस्थेतच बर्याच गुंतवणूकीचे स्वरुप अवाढव्य ठरते. उत्पादनाचे घटक जेथे अविभाज्य असतात व त्यासाठी किमान निर्णायक स्वरुपाची गुंतवणूक आवश्यक असते.

२) प्रतिसारक घटकांना निष्क्रिय करण्यासाठी विकसनशील अर्थव्यवस्थेत निर्णायक किमान गुंतवणूक आवश्यक असते.

३) विकासामध्ये अडथळा निर्माण करणारे आर्थिकेत्तर घटक निष्क्रिय करण्यासाठीसुद्धा असा खर्च आवश्यक आहे.

**विकासास मदत करणारे घटक :**

संयोजक, बचतदार, भांडवलदार, संशोधक, ज्ञानाची व कौशल्यात वाढ करणारे लोक यांचा समावेश होतो.

**विकासाची प्रेरणा :**

लेबिन्स्टीनच्या मते, विकासाचे अंदाज, त्यावर आधारित असणारी कृती, कृतींचे परिणाम यांचा सगळ्यांचा परिणाम विकासाच्या प्रेरणावर होतो. लेबिन्स्टीनच्या मते प्रेरणा पुढील दोन प्रकारच्या असतात.

१) ज्या प्रेरणांमुळे राष्ट्रीय उत्पन्न व वाढता केवळ त्यांच्या वितरणावर परिणाम होतो.

२) राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीस मदत होते अशा प्रभावशाली प्रेरणा.

प्रभावशाली प्रेरणात येणारे अडथळे पुढीलप्रमाणे आहेत.

१) संयोजकांमधील स्थितिप्रियता.

२) संघटित व असंघटित कामगारांची संकुचित बदलास विरोध करणारी प्रवृत्ती.

३) सर्वसामान्यपणे पुराणमतवादी दृष्टीकोनातून नव्या विचारांना, ज्ञानाला, तंत्राला विरोध करण्याची प्रवृत्ती.

४) चैनीच्या किंवा दिमाखाच्या उपभोगावर खर्च करण्याची श्रीमंतांची प्रवृत्ती

५) लोकसंख्येची वाढीमुळे श्रमपुरवठ्याची होणारी वाढ.

६) भांडवल उत्पादनाचे मोठे प्रमाण.

या घटकांचा विकासाच्या प्राथमिक अवस्थेतील अडथळा मोडून काढण्यासाठी व विशेषत: लोकसंख्येच्या वाढीचा वेग घटता करण्यासाठी लेबिन्स्टीन यांनी सुचविलेला किमान आवश्यक प्रयत्न गरजेचा असतो.

**सिद्धांताचे मूल्यमापन :**

१) किमान आवश्यक प्रयत्न सिद्धांतामध्ये दरडोई उत्पन्नवाढीचा दर आणि लोकसंख्यावाढीचा दर यांचा संबंध दर्शविला आहे. परंतु भारतात दरडोई वास्तव उत्पन्न स्थिर असतानाही मृत्युदर कमी झाल्यामुळे लोकसंख्या वाढ झाली.

२) लेबिन्स्टीनच्या मते, एका मर्यादेनंतर वाढत्या दरडोई उत्पन्नाबरोबर जन्मदर घटत जातो हे पटण्यासारखे नाही. अविकसित व विकसनशील देशात घटत्या जन्मदराचा प्रश्न सामाजिक-सांस्कृतिक स्वरुपाचा आहे.

३) लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यासाठी जन्मदर कमी करण्यासाठी शासनाकडून विविध कार्यक्रम आखले जातात त्यांचा विचार केलेला नाही.

४) प्रा. मिंट म्हणतात, दरडोई उत्पन्न पातळी व राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा वेग यातील संबंध सिद्धांतात सांगितलेले आहे तेवढा सोपा आणि सरळ नाही.

५) लेबिन्स्टीन यांनी भांडवल-उत्पादन प्रमाण स्थिर मानले आहे. परंतु ते स्थिर असत नाही. भारताच्या बाबतीत विचार केला नंतर आर्थिक विकासाबरोबर ते वाढत गेले आहे.

६) किमान आवश्यक प्रयत्नांना यश मिळवण्यासाठी किती वेळ / कालावधी लागेल हे सिद्धांतावरुन सांगता येत नाही.

७) प्रा. मिंट यांच्या मते, एखाद्या देशात लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा उत्पन्नवाढीचा दर जास्त असल्यानंतर सतत विकास होईल असे नाही.

८) मिंटच्या मते, सुरुवातीला निर्णायक गुंतवणूक कमी असल्यास लोकसंख्या वाढत राहील हे मान्य नाही.

९) जागतिक बँकेसारख्या संस्था आर्थिक मदत देतात त्यांचा विचार केला नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१) किमान आवश्यक प्रयत्नांचा सिद्धांत कोणी मांडला?

२) आर्थिक विकासासाठी मदत करणारे घटक कोणते असतात?

## ३.६ सारांश

१. कार्ल मार्क्स यानेही घेतला आहे. त्याच्याच मते, भांडवलशाहीची अवस्था ही कायम स्वरुपाची नसून मानवी समाजाची स्थित्यंतरे १) सरंजामशाही, २) भांडवलशाही, ३) समाजवाद व साम्यवाद अशा क्रमाने होत असतात. या अवस्थांचे विवेचन मार्क्सने भांडवलशाहीचा विनाश अटळ असतो ही गोष्ट पटवून देण्यासाठी केला आहे. मार्क्सच्या भविष्यवाणीचा फोलपणा उघड करण्यासाठी आणि भांडवलाशाहीची वाटचाल विनाशाकडे नसून सुबत्तेकडे (Affluence) होत आहे पटवून देण्यासाठी W. W. Rostow यांनी आपले [Stages of Economic Growth हे पुस्तक लिहीले.]

२. रोस्टोच्या मते, अर्थरचना विकास पुढील पाच अवस्थांमधून होत असतो.

१) परंपरागत समाज जीवनावस्था (Traditional Society)

२) उड्डाण-अवस्थेतील पूर्व तयारी (Pre-Condition for take off)

३) उड्डाण-अवस्था (Take –off stage)

४) परिपक्व (पूर्ण वाढ) अवस्थेकडे धाव (Drive to Maturity)

५) सार्वत्रिक उच्च उपभोगाची अवस्था (Age of high Mass)

३. रोस्टोने वर्णन केलेला 'उड्डाण' (Take off) कल्पना एका दृष्टीने विकसनशील देशांना फार उपकारक ठरणारी आहे. विकासाचे स्वरुप ठरवणे, त्यासाठी योग्य दिशा व साध्ये ठरविणे या गोष्टी वाटतात तितक्या सोप्या नाहीत, उड्डाणा साठी गुंतवणूकीचा वेग वाढता राहून तो 'उड्डाण' मर्यादेपर्यंत येतो की नाही हे पाहून विकासाची दिशा किंवा वेग योग्य आहे की नाही देखील ठरविता येईल. विकसनशील देशांनी 'उड्डाण' वेगाइतका 'गुंतवणूकीचा वेग' गाठणे ही देखील त्या देशांच्या दृष्टीने समाधानाची आणि आत्मविश्वासा वाढविणारी अशीच बाब ठरु शकेल.

४. हेरॉड-डोमार विकास प्रतिमानाच्या दृष्टीने, पूर्ण रोजगाराची पातळी टिकवून ठेवण्यासाठी, वास्तव उत्पन्न कोणत्या दराने वाढणे आवश्यक आहे व हा दर अर्थव्यवस्थेला गाठता आणि टिकविता येईल काय हीच मध्यवर्ती समस्या आहे.

५. डोमारच्या मते (पूर्ण रोजगाराच्या अवस्थेत) राहण्यासाठी अर्थव्यवस्थेला अधिक आणि अधिक वेगाने पळत रहावे लागते. वास्तव उत्पन्नात वाढत्या दराने वाढ करण्याइतकी गुंतवणूक भांडवलशाही अर्थव्यवस्था करु शकेल काय हीच ती मूलभूत समस्या आहे.

६. हेरॉडने आपल्या विवेचनात Gn, G व Gw यामधील संतुलनासाठी कोणती परिस्थिती आवश्यक आहे, त्यासाठी कोणत्या अटी पूर्ण व्हावा लागतात व या विकास दरात तफावत निर्माण झाल्यास काय परिणाम होऊ शकतो याचे स्पष्टीकरण केले आहे.

७. हेरॉड-डोमर हा सिद्धांत प्रामुख्याने अर्थव्यवस्थेची कुंठितावस्था (Stangnation) व असमतोल यांचा विचार करीत असला तरीही अविकसित किंवा विकसनशील देशातील काही समस्या सोडण्यासाठी या सिद्धांताचा उपयोग होऊ शकतो. अविकसित देशातील साधनसामग्रीचा पूर्ण उपयोग होण्याच्या दृष्टीने विकासाचा आवश्यक दर ठरविणे. राष्ट्रीय उत्पन्नाची विशिष्ट पातळी गाठण्यासाठी आवश्यक असा बचत दर व भांडवलउत्पादन गुणोत्तर ठरविणे या गोष्टी ह्या सिद्धांतामुळे शक्य होतात.

## ३.७ प्रश्न

१) रोस्टो प्रणित आर्थिक विकासाच्या सिद्धांतातील आर्तिक वाढीच्या विविध अवस्था सविस्तर स्पष्ट करा.

२) रोस्टोच्या सिद्धांतातील उड्डाण अवस्था सविस्तर विशद करा.

३) रोस्टोच्या विकासाच्या सिद्धांताचे टीकात्मक मूल्यमापन करा.

४) रोस्टोच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताचे महत्त्व लिहा.

५) हेरॉड-डोमर वृद्धी प्रतिमान गृहीतांसह सविस्तर स्पष्ट करा.

६) हेरॉड-डोमर सिद्धांताचे टीकात्मक मूल्यमापन करा.

७) अविकसित देशांच्या बाबतीतील हेरॉड-डोमर सिद्धांताच्या मर्यादा स्पष्ट करा.

8) रोडानचा मोठा धक्का सिद्धांत स्पष्ट करा.

9) लिबिनस्टिनचा न्युनत्तम प्रयत्न सिद्धांत स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ४

# आर्थिक विकासाचे सिद्धांत - २

**घटक रचना**


४.० उद्दिष्टे

४.१ अमर्याद-श्रम पुरवठा आणि आर्थिक विकास : आर्थर लुईसचा प्रतिमाबंध

४.२ सुप्त अगर छुपा बेरोजगार

४.३ आर्थिक विकासाचा शुंपीटरचा सिद्धांत

४.४ सारांश

४.५ प्रश्न


## ४.० उद्दिष्टये

• अमर्यादित श्रम पुरवठ्याच्या लुईस मॉडेलचा अभ्यास करणे.

• रॅगनर नर्कसेच्या प्रच्छन्न बेरोजगारीच्या सिद्धांताचा अभ्यास करणे.

• शुम्पीटरच्या विकास सिद्धांताचा अभ्यास करणे.

## ४.१ अमर्याद-श्रम पुरवठा आणि आर्थिक विकास : आर्थर लुईसचा प्रतिमाबंध

हेरॉड-डोमार प्रतिमानाचा विचार करताना ते प्रतिमान अविकसित देशांच्या संदर्भात कितपत उपयुक्त आहे या प्रश्नाची चर्चा आपण केली आहे. या चर्चेत लोकसंख्येच्या प्रचंड वाढीमुळे अविकसित लोकसंख्या विकासाला उपकारक न ठरता उलट लोकसंख्या वाढीचा अडथळाच विकास प्रक्रियेत निर्माण होईल असा विचार मांडला गेला आहे.

आर्थर लुईस (A. Lewis) मात्र अविकसित देशांच्या बाबतीत प्रचंड लोकसंख्या अमर्याद श्रमशक्तीचा पुरवठा करु शकेल व त्यामुळे अशा देशातील विकासाची प्रक्रिया गतिमान करता येईल असे मत प्रतिपादन करतो. अमर्यादक्षम पुरवठ्यातून विकास प्रक्रिया सुरु होण्यासाठी लुईसच्या मते दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून येणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे या अमर्याद श्रमशक्तीला निर्वाह पातळीवर जगत असलेल्या परंपरागत क्षेत्रातून (Traditional Sector) आधुनिक भांडवलप्रधान क्षेत्रात नेता आले पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे भांडवलप्रधान क्षेत्रातील बचतीचे प्रमाण वाढून त्या बचतीचा उपयोग नव्या गुंतवणूकीसाठी झाला पाहिजे. लुईसचा सिद्धांत पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**अविकसित देशांमधील अर्थव्यवस्थेचे द्विविध (Dualistic) स्वरुप :**

लुईसच्या मते, अविकसित देशाची अर्थव्यवस्था जणू काय दोन भिन्न क्षेत्रात विभागलेली असते. अर्थव्यवस्थेचा लहान भाग भांडवल प्रधान आधुनिक उद्योग व सेवापुरवठा (Service Sector) यात गुंतवणूक करीत असतो. या क्षेत्रातील उत्पादन प्रामुख्याने बाजारपेठांसाठी असून अंतिम उद्देश नफा कमावणे हाच असतो. या क्षेत्रातील गुंतवणूक आर्थिक मोजमाप व निवड (Rational Choice) या दोन तत्त्वाप्रमाणे होते. त्यामुळे दीर्घ कालावधीत नफा किंवा फायदे महत्तम करणे आणि / किंवा खर्च वा नुकसान न्यूनतम ठेवणे असा प्रयत्न सतत केला जातो. या साठीच कोणत्याही उत्पादक घटकाला त्याच्या सीमांत उत्पादनकतेहून जास्त मोबदला दिला जात नाही. तसेच अधिक्य स्वरुपाच्या उत्पन्नातून बचत करुन त्या बचतीमधून नवीन भांडवल उभारणी करुन उद्योगांची उभारणी केली जाते व अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढवण्याचा प्रयत्न केला जातो.

याउलट परिस्थिती अविकसित देशांतील परंपरागत क्षेत्राची असते. हे क्षेत्र तुलनात्मक दृष्ट्या फार मोठे असून शेती व परंपरागत व्यवसाय करण्यात यातील लोक गुंतलेले असतात. शेती व परंपरागत व्यवसाय करण्यात यातील लोक गुंतेले असतात. शेती जुनाट पद्धतीची असल्याने व भूमीवर लोकसंख्येचा प्रचंड भार असल्याने श्रमिकाची सीमांत उत्पादकता फार कमी अगदी शून्यापर्यंत पोचणारी असू शकते. तसेच परंपरागत व्यवसाय असल्याने त्यांची निवड आर्थिक मोजमापाच्या पद्धतीने न होता जीवनाचा व परंपरेचा भाग म्हणून हे व्यवसाय सुरु असतात. या क्षेत्रात शेती व इतर व्यवसाय यामधील उत्पादकता कमी असल्याने आधिक्य स्वरुपाचे उत्पादन उत्पन्न असू शकत नाही. वेतन व जीवनमान निर्वाह पातळीवरच राहते. अशा अवस्थेत या क्षेत्रातील बचत नगण्य असते. बचत फार कमी असल्याने (आणि ती फार वेगळ्या म्हणजे दागिने सोने इ. च्या रुपात केली जात असल्याने) भांडवलाची वाढ आणि उपयोग करुन घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. थोडक्यात म्हणजे या क्षेत्रात अमर्याद श्रम-शक्ती असते पण तिचा उपयोग अधिक उत्पादकता विकास कार्यास जुंपली जात नाही.

### ४.१.१ श्रम-शक्तीचे भांडवल-प्रधान क्षेत्रात स्थलांतर (Transfer of Labour Power to Industrial Sector) :

लुईसच्या विवेचनातील सर्वात प्रमुख विचार असा आहे की, या अमर्याद श्रम-शक्तीला भांडवल प्रधान क्षेत्रात वापरता आल्यास अविकसित देशांना विकास कार्य साधता येईल. ही गोष्ट समजून घेण्यासाठी – परंपरागत क्षेत्रातून भांडवलप्रधान क्षेत्राकडे श्रमशक्ती कशी वळविता येईल हे पुढील आकृतीच्या साहाय्याने दाखवता येईल. या आकृतीत श्रमाचा पुरवठा 'क्ष' अक्षावर व सीमांत उत्पादकता आणि वेतन 'य' अक्षावर दाखविले आहे. 'नन' ही सरळ-रुपांतर रेषा निर्वाह पातळीचे वेतन दर्शविते तर 'वव' ही समांतर सरळ रेषा सरळ-समांतर असल्याने स्पर्धात्मक बाजारात ठरणारे मूल्य दाखविते. 'वव' ही रेषा सरळ-समांतर असल्याने स्पर्धात्मक परिस्थिती 'अव' मजुरीचा दर असताना श्रम-शक्तीचा पुरवठा अमर्याद आहे ही गोष्ट दाखविली जाते. अ१, अ२, अ३ या उजवीकडे उतरणार्या वक्ररेषा श्रम-शक्तीची सीमांत उत्पादकता दाखवितात.




**आकृती क्र. ४.१**

आता असे समजू या की भांडवल प्रधान क्षेत्र-परंपरागत क्षेत्रातील काही श्रमिकांना आपल्याकडे कामावर घेत आहे. स्पर्धेच्या परिस्थितीत ज्या ठिकाणी अशा श्रमिकांची सीमांत उत्पादकता मजुरीच्या दराइतकी असेल तितकेच श्रमिक कामावर घेतले जातील. समजा ही सीमांत उत्पादकता अ१ या वक्र रेषेने दर्शविली आहे. साहजिकच म बिंदूचे ठिकाणी सीमांत उत्पादकता = मजूरी अशी स्थिती आढळते व या स्थितीत एकूण 'अस' इतके श्रमिक कामावर घेतले जातील हे उघड आहे. या सर्व श्रमिकांची एकूण उत्पादकता किंवा उत्पादन 'अअ१ मस' या क्षेत्रफळाने दर्शविले जाईल तर या श्रमिकांची मजुरी 'अवमस' इतकी होईल, म्हणजेच अअ१ मस - अवमस वअ१म इतके आधिक्य स्वरुपाचे उत्पादन किंवा नफा भांडवली क्षेत्राला होईल. परंपरागत क्षेत्रातील इतर श्रमिक मात्र निर्वाह वेतनाचे पातळीवर (नन) किंवा त्यापेक्षा कमी वेतनावर राहण्याची शक्यता आहे.

'वअ१म' या नपोयाचा उपयोग बचतीसाठी करुन त्यामधून भांडवलाची निर्मिती केली गेल्यास भांडवल-प्रधान क्षेत्रात उत्पादकता वाढेल व त्यामुळे सीमांत उत्पादकता वक्र 'अ१' च्या वरती व उजव्या बाजूला सरकेल ही स्थिती 'अ२' या वक्राने दाखविली आहे. भांडवल निर्मितीत वाढ झाल्यानंतर उद्योगांच्या विकासासाठी आणखी श्रम-शक्ती वापरली जाईल. आता उत्पादकता वाढली असल्याने व हा बिंदू वेतन = सीमांत उत्पादकता ही स्थिती दाखविल व 'अर' इतके श्रमिक कामावर घेतले जातील. एकूण उत्पादन 'अअ२' वर इतके होईल व आणि 'अ२ब' इतका नफा किंवा आधिक्य रुपयाने उत्पादन भांडवल-प्रधान क्षेत्राला मिळेल. व 'अ२ब' हा नफा पूर्वीच्या नपोयाहून जास्त आहे. पुन: हा नफा गुंतवला गेला तर सीमांत उत्पादकता वाढून ती आता 'अ२' या वक्राने दाखविली जाईल, 'अल'

इतके श्रमिक आता कामावर घेतले जातील व एकूण उत्पादन 'अअ३पल' इतके होईल. अधिक्य स्वरुपाचे उत्पादन व 'अ३प' इतके होईल. अशा रीतीने विकासाची प्रक्रिया सुरु होऊन संपूर्ण अतिरिक्त श्रम-शक्ती भांडवली किंवा आधुनिक क्षेत्राकडे जास्त असता पारंपारिक क्षेत्रात तिचा तुटवडा पडणार नाही. आणि त्यामुळे कृषी-क्षेत्रावर त्याचा अनिष्ट परिणाम घडून येण्याची भीतीही नाही.

### ४.१.२ लुईसच्या सिद्धांताचे मर्म :

लुईसच्या विकासाचा हा सिद्धांत परिणामकारकपणे प्रत्यक्षात उतरण्यासाठी लुईसला दोन गोष्टी अभिप्रेत आहेत. त्यापैकी पहिली गोष्ट म्हणजे आधुनिक क्षेत्रातील मजुरीचा दर पारंपारिक क्षेत्रातील वेतन-दरापेक्षा थोडा तरी जास्त हवा. मजुरीच्या दरात असा फरक नसेल तर एका क्षेत्रातून श्रमशक्ती दुसर्या क्षेत्रात खेचली जाणार नाही. दुसरी गोष्ट म्हणजे बचतीचा दर वाढणे आवश्यक आहे. बचत वाढल्यासच भांडवल निर्मिती वाढून श्रम-शक्ती जास्तीत जास्त प्रमाणात भांडवली क्षेत्रात जाईल. बचत वाढण्यासाठी नपाोयाचे प्रमाण हे मजुरीच्या प्रमाणापेक्षा वाढते असले पाहिजे. दुसर्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास उत्पन्नाचा मोठा हिस्सा बचत करणार्यांच्या हातात जाणे आवश्यक आहे. याचाच अर्थ एकूण उत्पन्नांपैकी आधुनिक क्षेत्रातील उत्पन्नाचा वाटा सतत आहे व या उत्पन्नाच्या वाट्यातील नपाोयाचे प्रमाण वाढते राहणे ही गोष्ट अत्याधिक महत्त्वाची आहे. लुईसच्या मते नफा वाढत राहणे ही गोष्ट अत्याधिक महत्त्वाची आहे. लुईसच्या मते, अशा प्रकारच्या विकास-प्रक्रियेत किंमत आणि वेतन यांचे प्रमाण बदलणार नाही व त्यामुळे वाढत्या उत्पादना (उत्पन्ना) बरोबर वेतन इ. चे प्रमाण न वाढता नपाोयाचेच प्रमाण वाढत जाईल. वरील आकृतीत ही गोष्ट स्पष्ट होत आहे. श्रमशक्तीच्या वाढत्या उपयोगामुळे एकूण उत्पादन वाढत असताना अधिक्य किंवा नफा (उदा. 'वअ१म', 'वअ२ब' आणि 'वअ३प') सतत वाढतो आहे पण मजुरीचा दर मात्र तोच म्हणजे 'अव' इतकाच राहिला आहे.

### ४.१.३ पैसा पुरवठा आणि विकास :

अमर्याद श्रम-शक्तीचा उपयोग नपाोयातून भांडवल निर्मिती करुन घेता येईल. त्याप्रमाणेच भांडवल निर्मितीसाठी पैशाचा पुरवठाही मदत करुन करु शकेल. पैशाचा पुरवठा वाढल्यास किंमती वाढतील (व त्यामुळे मजुरीत वाढ करावी लागेल) हे खरे असले तरी थोड्याच वेळात उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढून किंमती पुन: खालच्या पातळीवर स्थिरावतील असा विश्वास लुईसला वाटतो.

अमर्याद श्रम-शक्तीतून विकासाची प्रक्रिया सुरु झाल्यावर ही श्रम-शक्ती पूर्णपणे भांडवली क्षेत्रात जाईपर्यंत विकासाची प्रक्रिया सुरु रहायला हवी पण प्रत्यक्षात मात्र या श्रम-शक्तीच्या गतिक्षमतेला काही मर्यादा पडतील व संपूर्ण श्रमशक्ती भांडवली क्षेत्रात जाण्यापूर्वीच विकासाची प्रक्रिया थांबू शकेल. श्रमशक्ती भांडवली क्षेत्रात जाण्याच्या मार्गातील अडचणी अशा आहेत.

अ) भांडवली क्षेत्र श्रमशक्ती आपल्याकडे खेचू लागले म्हणजे परंपरागत क्षेत्रात श्रम-शक्तीचा तुटवडा भासेल त्यामुळे या क्षेत्रातील श्रमिकांची उत्पादकता वाढून वेतनाचा दर वाढू शकेल आणि हा दर भांडवली क्षेत्रातील दरापेक्षा जास्त होऊ शकेल.

ब) तंत्रविज्ञानातील विकासामुळे शेतीचे उत्पादन वाढून परंपरागत क्षेत्रातील मजुरीचा दर वाढू शकेल.

क) अन्न-धान्ये, कच्चा माल यांच्या किंमती वाढल्यास कृषि उत्पादनाची सापेक्ष किंमत कमी होईल. साहजिकच परंपरागत क्षेत्रातील मजुरी वाढू लागेल.

**लुईसच्या सिद्धांताचे मूल्यमापन :**

लुईसचा सिद्धांत प्रथमदर्शनी फार आकर्षक वाटला तरी तो सिद्धांत प्रत्यक्षात येण्याबाबत अनेक अडचणी आहेत. तसेच हा सिद्धांत मांडताना लुईसने अनेक गोष्टी गृहित धरल्या आहेत. ही गृहिते वास्तवात फारशी टिकणारी नाहीत. या दोन गोष्टींच्या संदर्भात लुईसच्या सिद्धांताचे मूल्यमापन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) लुईसने श्रमाचा अमर्याद पुरवठा गृहीत धरला आहे. श्रमाचा अमर्याद पुरवठा देशाची अतिरिक्त लोकसंख्या सूचित करतो. पण प्रत्यक्षात सर्वच अविकसित देशात लोकसंख्या अतिरिक्त नसून अनेक देशांतील खरा प्रश्न अपुर्या श्रम-शक्तीचा व कमी लोकसंख्येचा आहे. लुईसने ही गोष्ट लक्षात घेतलेली नाही.

२) काही विचारवंतांना छुपी बेरोजगारी ही कल्पना ग्राह्य वाटत नाही व छुपी बेरोजगारी असल्याशिवाय श्रम शक्तीचा अमर्याद पुरवठा असेल हे मान्य करता येत नाही. लुईसच्या विवेचनानुसार मात्र श्रम-शक्तीचा पुरवठा अमर्याद असण्यासाठी धुपी बेरोजगारी आवश्यक असतेच असे नव्हे. ज्यावेळी श्रम-शक्तीची उत्पादकता एका क्षेत्रात कमी व दुसर्या क्षेत्रात जास्त असते त्या वेळी लुईसचे विवेचन अशा देशाच्या बाबतीत समर्पक ठरु शकते. परंपरागत क्षेत्रातील उत्पादकता नेहमीच भांडवली क्षेत्रातील उत्पादकतेपेक्षा कमी असते ही गोष्ट कधीच नाकारता येणार नाही.

३) परंपरागत क्षेत्रातील श्रमिक प्राय: अशिक्षित, अप्रशिक्षित व अकुशल असतो. त्यामुळे ज्याला भांडवली क्षेत्रात नेणे हे इतके सोपे व सहजही नसते. तसेच भांडवली क्षेत्र प्रामुख्याने शहरी स्वरुपाचे असल्याने श्रमाच्या या स्थलांतरात इतर अनेक सामाजिक, मानसिक व सांस्कृतिक प्रकारचे अडथळे निर्माण होऊ शकतात. परंपरागत क्षेत्रातील लोकांची वृत्ती व विचारदेखील परंपरागत असतात आणि त्यांचे आधुनिकीकरण घडवून आणणे हे एक आव्हानच असते.

४) ज्या देशात परंपरागत क्षेत्र फार मोठे असते त्या देशात भांडवलदार वर्ग व भांडवल वर्गाची उद्योजक प्रेरणा यांचा अभाव असतो. अशा अवस्थेतच वाढत्या उत्पादनातून बचत करुन नव्या उद्योगांना चालना देणारा वर्गच अस्तित्त्वात असू शकणार नाही. आणि त्यामुळेच अशा देशातील भांडवली क्षेत्र श्रम शक्तीला नाही. आणि त्यामुळेच अशा देशातील भांडवली क्षेत्र श्रम शक्तीला नाही. आणि त्यामुळेच अशा देशातील भांडवली क्षेत्र श्रम शक्तीला आपल्याकडे फार मोठ्या प्रमाणात खेचू शकेल काय हाही एक प्रश्नच आहे. अविकसित देशातील भांडवली क्षेत्र प्रामुख्याने 'व्यापारी वृत्तीचे' असते. 'व्यापारी वृत्ती' चे 'औद्योगिक' वृत्तीत रुपांतर करण्यासाठी एकूण आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीच बदलावी लागते.

५) भांडवली क्षेत्राने वाढवले तरी मागणीचा प्रश्न शिल्लक राहतोच. अविकसित देशातील उत्पन्नाची पातळी कमी असल्याने एकूण मागणीच कमी असते आणि या कमी मागणीमुळे बाजाराचा विस्तार न वाढल्याने उत्पादनाच्या विकासाला मर्यादा पडतात.

६) भांडवली क्षेत्रातील वाढते उत्पादन एक तर निर्यात झाले पाहिजे किंवा ते भांडवली क्षेत्रातच विकले गेले पाहिजे. जर हे उत्पादन परंपरागत क्षेत्रात विकले जावे अशी अपेक्षा असेल तर परंपरागत क्षेत्रातील क्रयशक्ती वाढली पाहिजे. म्हणजेच या क्षेत्रात उत्पन्न वाढले पाहिजे. उत्पन्न वाढविण्यासाठी उत्पादकता व वेतन यांचीही वाढ होणे आवश्यक आहे. आणि परंपरागत क्षेत्रातील वेतन वाढत असल्यास त्या क्षेत्रातील श्रम-शक्ती भांडवली क्षेत्रात खेचली जाण्याचा प्रश्नच येत नाही व विकास क्रिया सुरु होण्याचाही प्रश्न निर्माण होत नाही.

लुईसच्या विवेचनात ह्या व्यावहारिक अडचणी लक्षात घेऊनही त्याच्या विवेचनाचे सैद्धांतिक महत्त्व कमी होत नाही. अविकसित देशात बचत आणि भांडवल निर्मितीची प्रक्रिया या सिद्धांतामुळे स्पष्ट होते. तसेच वाढत्या गुंतवणूकीमुळेच विकास शक्य होतो. या मूलभूत तत्त्वाचे महत्त्वही हा सिद्धांत प्रतिपादन करतो.

## ४.२ सुप्त अगर छुपा बेरोजगार (DISGUISED UNEMPLOYMENT)

सर्वसामान्यपणे सुप्त बेरोजगार दोन प्रकारांत अस्तित्त्वात असतो. १) लोकांची उत्पादक काम करण्याची क्षमता असते. त्यापेक्षा कमी उत्पादक कामावर लोकांचा रोजगार असणे. दुसर्या शब्दात, लोकांच्या कुशलतेचा अपुरा वापर, २) काम करण्यास आवश्यक असणार्या संस्थेच्या श्रमिकांपेक्षा जास्त संख्येचे श्रमिक कामावर असणे. मिसेस जोन रॉबिन्सन पहिल्या प्रकारचा अर्थ सुप्त बेकारीच्या संदर्भात घेते. सुप्त बेकारी म्हणजे अशी स्थिती की ज्या स्थितीत वेतनावर काम करणारे श्रमिक कमी उत्पादक कामावर रोजगार करतात कारण ते त्यांची कायमची नोकरी गमावतात. व ही नोकरी अर्थव्यवस्थेतील चक्रीय चढ उतारांमुळे गमावली जाते. पण विकसनशील देशात, सुप्त बेकारीचे स्वरुप यापेक्षा फार वेगळे असते. ही बेकारी जुनाट असते (Chronic) चक्रीय स्वरुपाची नसते व या बेकारीचा संबंध वेतनावर काम करणार्या कामगारांपेक्षा स्वयं रोजगांर करणार्या श्रमिकांशी असतो. ही बेकारी पूरक संसाधनाच्या अपुरेपणामुळे निर्माण होते, प्रभावी मागणीच्या अपुरेपणामुळे निर्माण होत नाही.

सुप्त बेरोजगार ही संकल्पना अशा गृहीतावर आधारित आहे की, अल्पविकसित देशाचे लोकसंख्येचा अतिरिक्त दाब हे वैशिष्ट असते. या अर्थव्यवस्थेत दोन भिन्न क्षेत्रे असतात. भांडवली अगर सुसंघटित क्षेत्र आणि निर्वाह क्षेत्र अशी दोन क्षेत्रे असतात. निर्वाह क्षेत्रापेक्षा भांडवली क्षेत्राची उत्पादकता फारच उच्च राहते. पण हे क्षेत्र फार व्यापून राहते. या क्षेत्राची दरडोई उत्पादकता फार कमी राहते. निर्वाह क्षेत्रात कुटुंबाच्या आधारावर लहान प्रमाणावर केल्या जाणार्या शेतीचा समावेश होतो.

अल्पविकसित देशात संसाधनाचा अपुरा वापर केला जातो. राहणीमान निकृष्ट पातळीचे करण्यास हा घटक कारणीभूत होतो. संसाधनाचा अपुरा वापर उघड बेरोजगार, निम्न बेरोजगार व सुप्त अगर छुपा बेरोजगार, या स्वरुपात आढळतो (Open Unemployment).

सुप्त बेरोजगार हा पारंपारिक अशा असुसंघटित क्षेत्रात आढळतो. या क्षेत्रातून श्रमिक रोजगारातून कमी केला तरी एकूण उत्पादनात घट होत नाही. दुसर्या शब्दात अशा रोजगारातून कमी केलेल्या श्रमिकाची सीमांत उत्पादकता शून्य असते. सूप्त बेरोजगाराची ही कसोटी आहे. जे श्रमिक शेती क्षेत्रातून कमी केले जातात ते उत्पादनात कोणतीही भर घालत नाहीत. समजा एखाद्या शेत जमिनीच्या धारणक्षेत्रावर १० श्रमिकच शेतीच्या कामाकरता आवश्यक आहे. याऐवजी १५ श्रमिक जरी काम करताना दिसत असले तरी या श्रमिकांना शेतीच्या कामातून कमी केले तरी एकूण उत्पादन कमी होत नाही. म्हणजे याने श्रमिकाला बेकारच मानले पाहिजे. बेरोजगार सुरु अंदाज घेणे शक्य नसते. हे अंदाज ५६ टक्के व १० टक्के यांच्या दरम्यान बदलताना दिसून येतात.

प्रत्येक व्यापारी अगदी कमी विक्री करतो. बाजारपेठेत स्टॉल्स प्रचंड संख्येचे असतात. जर स्टॉल्सची संख्या पुष्कळच कमी केली तरी ग्राहकांचे नुकसान अजिबात होत नाही. उलट त्यांना कमी किंमतीला माल मिळतो. प्रो. लुईसच्या मते, सुप्त बेकारी श्रीमंत जमिनदारांकडे काम करणार्या घरगड्यांबाबतही आढळते. याशिवाय भारतात अलीकडच्या काळात ज्या सरकारी कार्यालयात कामगार संघटना प्रबळ आहेत, त्या कार्यालयातही सुप्त बेरोजगार आढळतो. तज्ज्ञांच्या चौकशी मंडळाने असे निदर्शनास आणले आहे की, भारतीय जीवन विमा निगम, केंद्र व राज्य सरकारांची सचिवालये येथे अतिरिक्त कर्मचारी आहेत. जरी या कार्यालयांतून स्थूलमानाने १५ ते २० टक्के कर्मचारी कमी केले तरी या कार्यालयाच्या कामावर कोणताच प्रतिकूल परिणाम होणार नाही. कामात सुधारणा होईल. प्रो. वकील व प्रो. ब्रम्हानंद यांच्या मते, सुप्त बेकारी ही सार्वत्रिक घटना अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रात आहे व विशेषत: शेती क्षेत्रात या बेकारीची समस्या प्रकर्षाने आहे.

प्रो. नर्क्से यांच्या मते, सुप्त ग्रामीण बेरोजगारात बचतीची संभाव्य क्षमता दडली आहे (Saving Potential Concealed) म्हणून सुप्त बेकारीत समाविष्ट असलेल्या व वाया जाणार्या श्रमाचा वापर भांडवल निर्मितीकरता येईल. म्हणून सुप्त बेकारीत असलेले अगर अतिरिक्त श्रमिक हे निर्वाह क्षेत्राकडून रस्ते, रेल्वे, जलसिंचन, ड्रेनेज, गृहबांधणी, कारखाने, प्रशिक्षण योजना इ. प्रकल्पांवरील कामांकडे स्थलांतरित करता येतील. असे श्रमिक वास्तव राष्ट्रीय उत्पन्नात भर घालतील. सुप्त बेरोजगारात बचतीचा दडलेला स्त्रोत असतो. कारण शेतीवरील उत्पादक श्रमिक जेवढा उपभोग घेतात त्यापेक्षा जास्त धान्य उत्पादित करतात व हे धान्य जर उत्पादक श्रमिकांनी, शेतीतून कमी करुन भांडवली प्रकल्पावरील कामाकडे स्थलांतरित केलेल्या अतिरिक्त श्रमिकांना पाठविले तर प्रो. नर्क्सेच्या मते, ही वास्तव बचत परिणामकारक बचतीत रुपांतरित होईल. शेतीवरच्या अतिरिक्त लोकसंख्येचा अनुत्पादक उपभोग हा या रीतीने उत्पादक होईल. अशा प्रकारे भांडवल निर्मितीच्या प्रक्रियेला अर्थव्यवस्थेतूनच पुरवठा होईल. (धान्याचा) म्हणजेच वास्तव भांडवल उत्पादित करणार्या श्रमिकांना, शेतीवर राहिलेल्या उत्पादक श्रमिकांकडून धान्याचा पुरवठा पारंपारिक शेती क्षेत्रात कालबाह्य उत्पादन तंत्र वापरले जाते व कमी पातळीच्या उत्पादकतेची श्रम सामावून घेण्याची क्षमता कमी पातळीच्या उत्पादकतेची श्रम सामावून घेण्याची क्षमता कमी असते आणि वाढ त्या वेगाच्या लोकसंख्येमुळे / शेत जमिनीवर लोकसंख्येचा दाब वाढत जातो. परिणामी छुपी बेरोजगारीची समस्या जास्त गंभीर होत जाते.

### ४.२.१ सुप्त बेरोजगारीची कारणे (Causes of disguised unemployment) :

१) सुप्त बेरोजगारी अस्तित्त्वात असते कारण कुटुंबाची, भूमी व शेतीसाधने इतकी कमी असतात की सर्व वर्षभर कुटुंबाच्या सर्व सदस्यांना शेतीवर पूर्ण काम देणे अशक्य होते.

२) औद्योगिकीकरणाच्या अभावामुळे अतिरिक्त श्रमाचा पुरवठा अन्य व्यवसायाकडे स्थलांतरित करणे शक्य होत नाही.

३) विकसनशील देशात लोकसंख्येची वेगाने वाढ होत असताना वाढती लोकसंख्या शेत जमिनीवर जास्त दाब निर्माण करते. श्रमाचा पुरवठा स्थिर असल्याने लोकसंख्येचा जमिनीवरील दाब सुप्त बेरोजगार निर्माण करतो.

४) संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे सुद्धा सुप्त बेरोजगार अस्तित्त्वात असतो. या पद्धतीने कुटुंबाचे सर्व सदस्य एकत्र राहतात व एकाच भू-क्षेत्रावर काम करतात. काळाच्या ओघात कुटुंब सदस्यांची संख्या वाढते व परिणामी सुप्त बेरोजगारी वाढत जातो.

### ४.५.२ सुप्त बेरोजगाराच्या विस्तार :

संयुक्त राष्ट्र संघाच्या तज्ज्ञांच्या मते, अग्नेय आशियाई देशात एकूण श्रम दलात २० टक्के ते ३० टक्के श्रमिक सुप्त बेकारीत असतात. इजिप्तमध्ये ५० टक्के श्रमिक सुप्त बेकारीत असतात तर भारतात २५ टक्के श्रमिक सुप्त बेकारीत असतात असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

विकसनशील देशात केवळ ग्रामीण क्षेत्रापुरती सुप्त बेकारी मर्यादित नाही तर इतर क्षेत्रातही बेकारी आढळते असे नर्क्स म्हणतो. प्रो. ल्युईस यांच्या मते, गोदीवरचे कामगार, रेल्वे फलाटावरचे पोर्टर, बागकाम करणारे माळी इ. हंगामी कामाच्या क्षेत्रातही सुप्त बेकारी आढळते. या व्यवसायात आवश्यकतेपेक्षा जास्त संख्येने कामगार काम करतात. त्यांच्यापैकी प्रत्येकजण प्रासंगिक रोजगारातून फार कमी पैसे मिळवितो. अगदी छोटा किरकोळ व्यापार देखील अगदी केला जाईल. परिणामी, या प्रक्रियेत, बेरोजगार ही परिणामकारक बचत होईल. प्रो. बुचानन व एलिस (Buchanan and Ellis) यांनी सुद्धा हेच मत मांडले आहे. भांडवली वस्तूंचे उत्पादन हे उपभोगाच्या त्यागातून न होता, एकूण उत्पादनाच्या वाढीतून होईल. अशा प्रकारे भांडवली प्रकल्पनांच्या दिशेने श्रमाचे पुनर्वाटप करुन व अधिक खाण्यापासून श्रमिकांना परावृत्त करुन सुप्त बेकारीचा उपयोग भांडवल निर्मितीचा स्त्रोत म्हणून करता येईल. प्रो. नर्क्सेच्या मते, शेतीवर राहणार्या शेतकर्यास पूर्वीपेक्षा कमी खाण्यास लावण्याची आवश्यकता नाही. येथे ही गोष्ट आवश्यक आहे की त्याने, शेती सोडून प्रकल्पांकडे गेलेल्या त्याच्या लोकांना धान्य पाठविले पाहिजे.

### आपली प्रगती तपासा :

१) मूलभूत बदल सिद्धांताची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) मूलभूत बदल सिद्धांताचे दोन प्रकार कोणते?

३) शेतीबाबत अतिरिक्त श्रमाचे इतर सिद्धांत विशद करा.

४) आर्थर लुईसचा अमर्याद श्रमपुरवठ्याचा सिद्धांत सविस्तर स्पष्ट करा.

५) आर्थर लुईसच्या सिद्धांताचे मूल्यमापन करा.

६) सुप्त किंवा छुपा बेरोजगार म्हणजे काय? त्याची कारणे कोणती ते लिहा.

## ४.३ आर्थिक विकासाचा शुंपीटरचा सिद्धांत (SCHUMPETERS THEORY OF ECONOMIC DEVELOPMENT)

**प्रास्ताविक :**

आर्थिक विकासाची प्रक्रिया स्पष्ट करण्याचा प्रयत्न शुम्पिटर यांनी केला आहे. त्यांचा सिद्धांत नवप्रवर्तन वर आधारित आहे. १९११ मध्ये शुंपीटरने "The Theory of Economic Development" हा ग्रंथ जर्मन भाषेत प्रकाशित केला. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेचे स्पष्टीकरणाच्या त्यांनी पहिल्यांदा प्रयत्न केला. Business Cycles, Capitalism, Sociaism and Democracy Je Imperialism and Social Classes या ग्रंथातून देखील आपले आर्थिक विकासाबाबतचे विचार तर्कशुद्ध, आकर्षक व स्पष्ट स्वरुपात मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. शुंपीटरच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या रचनेतच आर्थिक विकास करण्याची क्षमता असते. त्यांच्या मते, आर्थिक विकास अर्थव्यवस्थेत निर्माण होणार्या तेजी-मंदीच्या चक्रातून टप्प्याटप्प्याने व अस्थिरतेतून होत असतो. आर्थिक विकासाची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी त्यांनी कार्ल मार्क्सच्या गतीमान दृष्टीकोनाचा व नवसनातनवादी संप्रदायाच्या शास्त्रशुद्ध व आकर्षक अशा समतोल विश्लेषण पद्धतीचा सुरेख संगम केला.

**आर्थिक विकासाचा सुत्रधार – प्रवर्तक :**

शुंपीटरने आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत प्रवर्तकांला केंद्रस्थानी मानले आहे. प्रवर्तकालाच नवप्रवर्तक असे म्हणतो. नवप्रवर्तन पुढील प्रकारचे असू शकते.

१) नवजीवन वस्तूचे उत्पादन व वितरण

२) उत्पादन करण्याच्या नविन पद्धतीचा वापर

३) उत्पादित वस्तूंना नविन बाजारपेठांचा शोध

४) कच्च्या मालाचा शोध

५) उद्योगाचे नविन पद्धतीचे संघटन

**नवप्रवर्तक :**

शुंपीटर यांनी मांडलेला नवप्रवर्तक हा पारंपरिक व्यवस्थेपेक्षा वेगळा तसेच भांडवलदारापेक्षा ही वेगळा असतो. नवप्रवर्तक उत्पादन प्रक्रियेत सुधारणा करणे व नाविण्य शोधतो. नवप्रवर्तक भांडवलाचा वापर अनेक नविन प्रकारात करण्याचे धाडस करतो. शुंपीटरच्या मते, नवप्रवर्तक धाडसी दृष्टा असतो. नवप्रवर्तक मळलेली वाट सोडून नवीन वाट / मार्ग

शोधतो. तो इतरांपेक्षा वेगळा करणारा आत्मकेंद्रीत असतो. नवप्रवर्तक हा फक्त आर्थिक क्षेत्रात काम करत नाहीतर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व समाजजीवनाच्या अंगांशीही स्पर्श करतो. नवप्रवर्तकांची प्रेरणा व्यक्तीगत साम्रज्य निर्माण करणे असते. दुसर्यावर मात करण्याची इच्छा, संघर्षाची इच्छा श्रेष्ठत्वाची इच्छा, यशस्वी होण्याची इच्छा, निर्मितीचा आनंद, कार्यवाढीचा आनंद, बुद्धीचा आंनद, शक्तीचा आनंद या नवप्रवर्तकाच्या मूलभूत प्रेरणा आहेत.

शुंपीटरने नवप्रवर्तकाला आर्थिक विकासाची प्रेरणा मानले आहे. शुंपीटरला आर्थिक विकास हा अलग-अलग अशा आर्थिक तेजीतून निर्माण होणारी एक गतिमान प्रक्रिया आहे असे सांगायचे होते. त्याला अभिप्रेत असणारी विकासाची प्रक्रिया अस्थिर, अनिश्चितता व जोखीम जास्त असणारी असते. अशा परिस्थितीत नवप्रवर्तकच योग्य व गतिमान नेतृत्व देऊ शकतो.

**वित्तपुरवठा आणि आर्थिक विकास –**

शुंपीटरने नवप्रवर्तक भांडवलाची गरज भासल्यास बँकाकडून कर्ज घेतो असे मानले. शुंपीटर म्हणतो पैशाच्या पुरवठ्यावर अवलंबून असणारा वित्तपुरवठा विकास प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो असे म्हणतो. यांच्या आधारे आर्थिक विकासाची प्रक्रिया असंलग्न चढ-उताराची असते.

अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार असताना नवप्रवर्तक नवप्रवर्तनाचे प्रमाण वाढवितात तेव्हा त्यांना जादा वित्तपुरवठ्याची गरज असते. अशा अवस्थेत गरजेच्या उत्पादन घटकांच्या किंमतीत वाढतात. उपभोग्य वस्तूच्या उद्योगात असणारे उत्पादन घटक भांडवली वस्तूच्या उद्योगाकडे जातात. त्याचा परिणाम उपभोग्य वस्तूचे उत्पादन कमी होऊन भांडवली वस्तूचे उत्पादन वाढते. उपभोग्य वस्तूचे उत्पादन कमी झाल्यामुळे व्यक्तीना सक्तीची बचत करावी लागते. शुंपीटर सक्तीची बचत भांडवल संचयाचा महत्त्वाचा घटक मानतो. परंतु पैशाच्या पुरवठ्यातील वाढीमुळे किंमतपातळी वाढत जाते. किंमतपातळीतील वाढीमुळे उत्पादनाचे घटक मिळणे प्रवर्तकांना अवघड बनते. शुंपीटरच्या मते, प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नवप्रवर्तक बँकांची घेतलेली कर्जे फायद्यांतून परत करतात. त्यांचा परिणाम वाढती भांडवल गुंतवणूक अस्तित्त्वात येते. ही झालेली वाढ वित्तपुरवठ्यामुळे झालेली असते.

शुंपीटर म्हणतो नवप्रवर्तक उपभोक्त्यांची चव व मागणीत बदल करतो. दीर्घकालावधीत विकास प्रक्रियेत नवप्रवर्तन यशस्वी होण्यासाठी उपभोक्त्यांच्या उपभोगरचनेवर नियंत्रण येणे महत्त्वाचे असते. अन्यथा दीर्घकाळात परिणाम करणारे नवप्रवर्तन होत नाही. शुंपीटरच्या विकास प्रक्रियेत नवप्रवर्तक सर्व विकास प्रेरणांचा मुख्य स्त्रोत आहे.

**भांडवलशाही रचनेतील आर्थिक विकासाची प्रक्रिया –**

शुंपीटरने भांडवलशाहीत आर्थिक विकासाची प्रक्रिया कशी कार्य करते हे पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

१) सुरुवातीची अवस्था म्हणून शुंपीटर स्पर्धात्मक परंतु गतिशून्य किंवा स्थिर अर्थव्यवस्था गृहीत धरतो. या अवस्थेत पूर्ण रोजगार, गुंतवणूक शून्य आणि लोकसंख्या वाढ शून्य असते.

२) सुरुवातीच्या या अवस्थेत नवप्रवर्तकाला गुंतवणूक करण्यासाठी गुंतवणूकीच्या संधी असतात. या गुंतवणूक संधीत गुंतवणूक करण्यासाठी नवप्रवर्तक बँकाकडून कर्ज घेतात. बँकाकडून घेतलेल्या कर्जाच्या व्याजाची रक्कम नवप्रवर्तकांनातून होणार्या फायद्यापेक्षा कमी असते.

३) काही नवप्रवर्तकांनी नवप्रवर्तनाचा प्रयोग यशस्वी केल्यानंतर अशा नवप्रवर्तकांचा फायदा घेण्यासाठी अनेक संयोजक, भांडवलदार मोठ्या संख्येने पुढे येतात. यातून अर्थव्यवस्थेत तेजीची अवस्था निर्माण होते. तेजीच्या अवस्थेत वस्तूंच्या किंमती वाढतात त्याचप्रमाणे पैशातील उत्पन्न वाढायला सुरुवात होते. उत्पादनाची साधने उपभोग्य वस्तूच्या उद्योगाकडून भांडवली वस्तूच्या उद्योगाकडे वळतात.

४) उत्पादन साधने उपभोग्य वस्तूच्या उद्योगाकडून भांडवली वस्तूच्या उद्योगाकडे वळल्यामुळे एक नविन अधिक गतिमान तेजीची अवस्था निर्माण होते. जुन्या उत्पादन संस्था सुद्धा आपले उत्पादन वाढवितात. वाढणार्या किंमतीचा फायदा घेण्यासाठी उत्पादक आणि व्यापारी सट्टेबाजी वाढवितात. अशा वेळी बँकांचा कर्जपुरवठा अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांना होतो. नवप्रवर्तकपेक्षा नवप्रवर्तनाचे अनुकरण करणार्यांची गुंतवणूक जास्त होते.

५) तेजीच्या वाढीच्या अवस्थेत भांडवली मालाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढते उपभोग्य मालाचे उत्पादन कमी होते. परंतु नवप्रवर्तनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सर्वच क्षेत्रातील वस्तूंचा पुरवठा वाढतो. त्याचवेळी विध्वंसाची नवनिर्माणक्षम प्रक्रिया सुरु होते. या वेळी जुन्या वस्तूसाठी असणारी मागणी कमी होते. काही उद्योग तोट्यात जातात. काही उद्योग खालच्या स्थानावर जातात. नवप्रवर्तन प्रयोगातून आर्थिक दृष्ट्या क्लेशदायक पुनर्जुळणीची गरज भासते.

६) नवप्रवर्तनाचा सुरुवातीचा कालखंड संपल्यानंतर त्यातून निर्माण होणारे उत्पादन किफायतशीर ठरते. नवप्रवर्तकांनी बँकाकडून घेतलेले कर्ज फायद्यातून परत केले जाते. यातूनच मंदीची प्रेरणा सुरु होते. अशा धोक्यांच्या अस्थिर, अनिश्चिततेच्या वातावरणात नव्या नवप्रवर्तनासाठी कर्ज देण्याची प्रक्रिया सुरु नसते. नवप्रवर्तक निर्णय व कृती स्थगित होतात. मंदीच्या दुय्यम स्वरुपाच्या व अनुकरणात्मक गुंतवणूकीवर प्रतिकूल परिणाम होतो. दुय्यम व अनुकरण गुंतवणूकीवर आधारित असणारे प्रकल्प कोसळतात. त्यामुळे आणखी मंदी तीव्र बनते. मंदीची प्रक्रिया तशीच अनिर्बंध चालू न राहाता अर्थव्यवस्था काही काळ पुन्हा समतोल व पूर्ण रोजगाराच्या अवस्थेत पोहचते.

७) नविन समतोलाची अवस्था पूर्वीच्या समतोलापेक्षा अधिक वरच्या पातळीवर असते. अर्थव्यवस्थेतील व्यापारचक्राच्या अवस्थेतून वास्तव राष्ट्रीय उत्पादन व दरडोई उत्पादन सतत वाढतच जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रांचा फायदा होतो. या नविन समतोलात नवप्रवर्तनाला पोषक वातावरण निर्माण झालेले असते.

शुंपीटरने वरील घटकांबरोबर वाढती लोकसंख्या चालु उत्पन्नातून केलेली बचत व बाजारपेठेतील अपूर्ण स्पर्धात्मक रचना या घटकांचाही समावेश केला आहे. शुंपीटरच्या विश्लेषणात नवप्रवर्तक, तांत्रिक शोध, बँकिंगचा पतपुरवठा व आर्थिक चढउतार हे महत्त्वाचे घटक आहेत. शुंपीटर म्हणतो आर्थिक चढउतार ही विकासासाठी घ्यावी लागणारी किंमत आहे व आर्थिक विकास ही एक असंग्लन, अस्थिर, विसंवादी आणि चक्रिय अशी गतिमान प्रक्रिया आहे.

**भांडवलशाहीच्या नाशाची प्रक्रिया :**

शुंपीटरला भांडवलशाही बद्दल आदर होता. तसेच भांडवलशाहीतील कार्यक्षमतेबद्दल व गतिमानतेबद्दल ही आदर होता. भांडवलशाहीचे गुणगान करणार्या अर्थशास्त्रात शुंपीटरचा नंबर वरचा होता. परंतु शुंपीटर भांडवलशाहीच्या यशामध्ये व विशेषत: त्या यशाला कारणीभूत असणार्या घटकांमध्येच भांडवलशाही व्यवस्थेचा नाश / शेवट व समाजवादाचे आगमन असते असे मानतो.

पुढील घटकामुळे भांडवलशाहीचा नाश होतो.

१) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत वाढत जाणारा शुद्ध हिशेबीपणा आणि सर्वच क्षेत्रात वाढणारा बुद्धि प्रामाण्यवाद.

२) नवप्रवर्तनाची काही कालावधीनंतर कमी होणारी किंमत / मूल्य.

३) भांडवलशाही समाजरचनेच्या संस्थात्मक संघटनेचा नाश.

४) भांडवलशाहीचे समर्थन व संरक्षण करणार्या राजकीय / शासकीय समाजगटांचा अस्त / शेवट.

भांडवलशाहीमध्ये तांत्रिक प्रगतीसाठी आवश्यक असणारे नवप्रवर्तन एका व्यक्तीच्या बुद्धीचे व धाडसाचे फल व राहात्या मोठ्या उत्पादक संस्थेच्या कार्याचा तो दैंनदिन भाग बनते. व्यवस्थापन व विक्री या संघटीत, संस्थापितव आपोआप घडणार्या घटना होतात. उपभोक्त्यांच्या आवडी, निवडी, सवयी, चव मोठ्या उत्पादकांच्या विक्रीकौशल्यांतून नियंत्रित केल्या जातात. समाजातील नवप्रवर्तन नष्ट होते व त्यांची जागा व्यवस्थापक व तंत्रज्ञ घेतात. नफ्यावर पोसला जाणारा नवप्रवर्तक नष्ट होतो व त्याऐवजी भरपूर पगारावर जगणारा संयोजक निर्माण होतो.

भांडवलशाहीच्या प्रगतीबरोबर आर्थिक सत्तेचे निर्णयाचे उत्पन्नाचे, संपत्तीचे व उत्पादनांचे केंद्रीकरण होते. त्यांचा परिणाम व्यक्तिगत पातळीवर खाजगी मालमत्ता व कराराचे स्वातंत्र्य नष्ट होते. भागधारक व प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रिया यांचे असणारे संबंधही नष्ट होतात. कामकाज पाहण्यासाठी पगारी संयोजक नेमला जातो. भागधारकांमध्ये असणारी मालकीची भावना नष्ट होते. कारण व्यवस्थापक मालकीच्या भावनेतून पाहू शकत नाही.

भांडवलशाहीच्या सुरुवातीच्या काळात राजेशाही शासनव्यवस्था जमिनदार उमराव आपल्या नियंत्रणाखाली आणतात आणि उद्योजकांना, व्यापार्यांना प्रोत्साहन देतात. त्याच्या बदल्यात भांडवलदार व्यापारी, उद्योजक राजेशाहीला मदत करतात. भांडवलशाही

यशस्वी झाल्यानंतर व्यापारी उद्योगपती व भांडवलदार यांचे आर्थिक सामर्थ्य मोठ्या प्रमाणात वाढते. त्यांचा परिणाम बुद्धीप्रामाण्यवादी दृष्टीकोनामुळे हे घटक राजकीय सत्ता ताब्यात घेतात. राजेशाही व्यवस्था नष्ट होते. परंतु शासन चालविण्याची कोणतीच वैशिष्ट्ये यांचे कडे नसतात. त्यामुळे शासन म्हणून भांडवलदार, व्यापारी व उद्योजक वर्ग अपयशी ठरतो.

भांडवलशाही नष्ट करणारा वर्ग म्हणजे सुशिक्षित विचारवंतांचा व बुद्धीवादी लोकांचा वर्ग हाच वर्ग भांडवलशाही व्यवस्था, व्यक्ती व घटना आणि भांडवलशाही व्यवस्थेतील दोषांचा टीकाकार बनतो. भांडवलशाही विरोधी समाजगटाचे नेतृत्व करतो. त्यांना अपेक्षित अशा रोजगार संधी मिळत नाहीत म्हणून अधिक भांडवलशाहीला विरोध करतात व कामगार वर्गाचे नेतृत्व करतात.

शुंपीटरच्या मते, भांडवलशाहीने निर्माण झालेला बुद्धिप्रामाण्यवाद व्यक्तीगत कौटुंबिक जीवनात प्रवेश करतो. मुलांचे फायदे-तोटे मोजतात. पारंपारिक कुटुंबवस्था व त्यांचे फायदे नष्ट होतात. कौटुंबिक जबाबदारितून निर्माण होणार्या आर्थिक प्रेरणा नष्ट होतात त्यामुळे आपले आर्थिक घराणे निर्माण करावे ही भावना नष्ट होते. संचयाची प्रेरणा कमी होते व परिणामी, भांडवलशाही विकासासाठी आवश्यक असणारे नवप्रवर्तन नष्ट होते.

**टीकात्मक मूल्यमापन :**

मायर आणि बाल्डविन यांच्या मते, "शुंपीटरने आपला आर्थिक विकासाचा सिद्धांत मांडून ॲडम स्मिथ, रिकार्डो, मिल, मार्क्स, मार्शल आणि केन्स यासारख्या अर्थशास्त्रज्ञाच्या पंक्तीत जाऊन बसला हा सिद्धांत एक मोठ्या सैद्धातिक दृष्टीचा नमुना आहे." तरीपण या सिद्धांतावर टीका केली जाते ती पुढीलप्रमाणे आहे.

### १) नवप्रवर्तन हे उद्योजकाचे कार्य नाही (Innovation not the function of entrepreneur) :

शुंपीटरच्या संपूर्ण सिद्धांताची प्रक्रिया उद्योजक आणि नवप्रवर्तक यांच्यावर आधारित आहे. शुंपीटर नवप्रवर्तकाला आदर्श व्यक्ती मानतो. १८ व्या व १९ व्या शतकात उद्योजक नवप्रवर्तन करत होते तेव्हा ते योग्य होते. परंतु सध्या सर्व प्रकारचे नवप्रवर्तन कंपनी / उद्योगाच्या एका भागाचे काम आहे. त्यासाठी एका विशिष्ट व्यक्तीची गरज नाही. उद्योग संस्थेचे ते दैनंदिन कार्य आहे.

### २) आर्थिक विकासासाठी चक्रीय प्रक्रियेची आवश्यकता नाही (Cyclical process not essential for economic development) :

शुंपीटरच्या मते, नवप्रवर्तनांच्या चक्रीय प्रक्रियेने आर्थिक विकास होतो. परंतु हे बरोबर नाही. आर्थिक विकासासाठी तेजी आणि मंदीच्या अवस्थेची गरज नाही. आर्थिक विकासासाठी निरंतर प्रयत्न व्हायला पाहिजेत.

**३) व्यापारचक्राचे नवप्रवर्तन कारण नाही (Cyclical changes not due to innovations) :**

तेजी मंदी सारखी व्यापारचक्रे नवप्रवर्तनामुळे निर्माण होत नाहीत. तेजी व मंदी सारख्या व्यापारचक्रांचे वित्तीय, प्राकृतिक व तांत्रिकपण कारण असू शकते.

**४) नवप्रवर्तन हे विकासाचे कारण नाही (Innovations not the main cause of development) :**

शुंपीटर नवप्रवर्तन आर्थिक विकासाचे कारण मानतात. परंतु वास्तवात ते बरोबर नाही. कारण आर्थिक विकास हा फक्त नवप्रवर्तनावर अवलंबून असत नाही त्याला इतर ही आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि नैसर्गिक घटक कारणीभूत असतात.

**५) बँक वित्तपुरवठ्याला अधिक महत्त्व (Too much importance to bank credits) :**

शुंपीटरने आपल्या सिद्धांत भांडवलनिर्मितीत बँक वित्तपुरवठ्याला अधिक महत्त्व दिलेले आहे. मोठे मोठे उद्योग अल्पकाळासाठी बँकेकडून कर्ज घेऊ शकतात. परंतु दीर्घकालावधीत नवप्रवर्तनाला मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज असते तेव्हा तेवढे भांडवल बँका देऊ शकत नाहीत. त्यावेळी कर्जरोखे व भागरोखे विकून भांडवल उभे केले जाते.

**६) भांडवलशाहीचा नाश आणि समाजवादाचा उगम ही प्रक्रिया योग्य नाही (The process from capitalism to Socialism not correct) :**

शुंपीटरचे भांडवलशाहीचा नाश होतो आणि समाजवादाचा उगम होते हे विश्लेषण योग्य नाही. हे विश्लेषण भावनिक आहे वास्ववात नाही.

शेवटी मायर आणि बाल्डविनच्या मते, "शुंपीटरने आर्थिक विकासाचे सविस्तर आर्थिक सामाजिक विश्लेषण केलेले आहे त्यांची सर्वत्र प्रशंसा होते. परंतु थोडेच लोक त्यांचे निष्कर्ष स्वीकारण्यास तयार आहेत. त्यांचे निष्कर्ष उत्तेजक आहेत परंतु विश्वसनीय नाहीत. त्यांचे विश्लेषण एकतर्फी आहे एकाच घटकावर जास्त भर दिला आहे."

**आपली प्रगती तपासा :**

१) शुंपीटरच्या मते आर्थिक विकासाचा सूत्रधार कोण असतो?

२) नवप्रवर्तन म्हणजे काय?

३) शुंपीटरच्या मते व्यापारचक्रे कशामुळे निर्माण होतात?

## ४.४ सारांश

शुम्पिटरच्या मते, विकास म्हणजे चक्रिय प्रवाहाच्या चॅनेलमध्ये उत्स्फूर्त आणि सतत होणारा बदल होय ज्यामुळे समतोल किंवा संतुलनाची स्थिती बदलते. बदल हे आंतरिक

असतात आणि औद्योगिक व व्यावसायिक जीवनाच्या क्षेत्रात दिसून येतात. नवकल्पनांच्या रूपात नवीन संयोजन केले जाते, तेव्हा विकास घडतो.

## ४.५ प्रश्न

Q1. अमर्यादित श्रम पुरवठ्याचे लुईस मॉडेल स्पष्ट करा.

Q2. रॅग्नर नर्क्सेच्या प्रच्छन्न बेरोजगारीचा सिद्धांत स्पष्ट करा.

Q3. शुम्पीटरचा विकास सिद्धांत स्पष्ट करा.

❖❖❖❖

# ५

# विकास प्रक्रियेतील संरचनात्मक समस्या – १

**घटक रचना :**

५.० उद्दिष्टे

५.१ मानवी भांडवल संकल्पना

५.२ मानवी भांडवलामध्ये शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांची भूमिका

५.३ गरीबीची संकल्पना

५.४ गरीबीचे मोजमाप

५.५ गरिबी निर्मूलनासाठी उपाययोजना

५.६ असमानतेची संकल्पना

५.७ असमानतेचे मोजमाप

५.८ विषमता नष्ट करण्यासाठी उपाय

५.९ सारांश

५.१० प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

- "गरीबी" ही संकल्पना समजून घेणे.
- "गरीबीच्या" प्रमुख संकल्पना लक्षात घेणे.
- गरीबीच्या पर्यायी मापदंडाचा अभ्यास करणे.
- भारतातील गरीबी दूर करण्याची व्यूहरचना अभ्यासणे.
- भारतातील गरीबी दूर करण्याच्या कार्यक्रमांचे टीकात्मक परीक्षण करणे.

## ५.१ मानवी भांडवल संकल्पना

श्रम-अधिशेष असलेल्या देशांमध्ये मानवी भांडवलाच्या संकल्पनेला तुलनेने अधिक महत्त्व आहे. देशातील उच्च जन्मदरामुळे हे देश नैसर्गिकरित्या अधिक श्रमाने संपन्न आहेत. या देशांतील अतिरिक्त श्रम हे मूर्त भांडवली संसाधनापेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध असलेले मानवी संसाधन आहे. शिक्षण, आरोग्य आणि नैतिक मूल्यांच्या प्रभावी आदानांसह या मानवी संसाधनाचे मानवी भांडवलात रूपांतर केले जाऊ शकते. या आदानांसह कच्च्या

मानवी संसाधनाचे उच्च उत्पादक मानवी संसाधनात रूपांतर करणे ही मानवी भांडवल निर्मितीची प्रक्रिया आहे. श्रमिक अधिशेष असलेल्या देशांमध्ये मूर्त भांडवलाच्या कमतरतेची समस्या त्यांच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही गुंतवणुकीद्वारे मानवी भांडवलाच्या निर्मितीचा वेग वाढवून सोडवता येऊ शकते. राष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी मूर्त आर्थिक भांडवल हे एक प्रभावी साधन आहे. दुसरीकडे, मूर्त मानवी भांडवल हे राष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाला चालना देण्याचे एक साधन आहे, कारण मानवी भांडवल थेट मानवी विकासाशी संबंधित आहे आणि जेव्हा मानवी विकास घडून येतो, तेव्हा राष्ट्राची गुणात्मक आणि परिमाणात्मक प्रगती अपरिहार्य असते. जागतिक अर्थव्यवस्थेतील विविध राष्ट्रांच्या आर्थिक विकासाच्या तुलनात्मक मूल्यमापनाच्या दिशेने संयुक्त राष्ट्रांच्या (UN) बदललेल्या दृष्टिकोनातून मानवी भांडवलाचे हे महत्त्व स्पष्ट होते. या राष्ट्रांमधील मानवी भांडवल निर्मितीच्या दराचे मूल्यांकन करण्याच्या उद्देशाने विविध राष्ट्रांमधील मानवी विकासावर संयुक्त राष्ट्र मानव विकास अहवाल (HDR) प्रकाशित करते.

मानवी भांडवल हा प्रत्येक राष्ट्राच्या मानवी विकासाचा आणि आर्थिक विकासाचा कणा असतो. महरूम यांनी सुचवले की, समग्र-स्तरावर, मानवी भांडवल व्यवस्थापनात तीन प्रमुख क्षमता आहेत: प्रतिभा विकसित करण्याची क्षमता, प्रतिभा तैनात करण्याची क्षमता आणि इतर ठिकाणाहून प्रतिभा आकर्षित करण्याची क्षमता. एकत्रितपणे, या तीन क्षमता कोणत्याही देशाच्या मानवी भांडवलाच्या स्पर्धात्मकतेचा कणा बनतात. अलीकडील यूएस संशोधन दर्शविते की, भौगोलिक प्रदेश जे मानवी भांडवल आणि स्थलांतरितांच्या आर्थिक प्रगतीमध्ये गुंतवणूक करतात जे आधीच त्यांच्या अधिकारक्षेत्रात राहतात त्यांच्या अल्प आणि दीर्घकालीन आर्थिक वाढीस चालना देतात. मानवी भांडवलाची कमतरता असलेल्या इतर संस्थांपेक्षा ज्या संस्थांचे मानवी भांडवल आहे आणि ते वाढवतात त्या संस्थांपेक्षा जास्त कामगिरी करतात याचा भक्कम पुरावा देखील आहे.

## ५.२ मानवी भांडवलामध्ये शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांची भूमिका

### आरोग्य आणि आर्थिक विकास:

जागतिक आरोग्य संघटनेनूसार आरोग्य म्हणजे “शारिरीक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णत: स्वस्थता होय, फक्त निरोगी असणे नव्हे.” म्हणजे शारिरीक रोगापासून मुक्तता नव्हे, तर व्यक्ति मानसिक व सामाजिक दृष्ट्या देखील सुदृढ व स्वस्थ असली पाहिजे.

निरोगी आरोग्याचे व्यक्तिला अनेक फायदे होतात आरोग्य ही संपत्ती आहे ही म्हण सर्वार्थाने योग्य आहे. मानवी आरोग्यामुळे अर्थव्यवस्था कार्यशील व उत्पादक बनते. मानवी साधनसंपत्ती आरोग्यदायी असेल तर ती एक कार्यप्रवण संपत्ती असते. भांडवल संचय करणे, सामाजिक, आर्थिक, राजकिय संस्था उभारणे इ. कामे शिक्षित व सुदृढ मानवसंपत्तीच करु शकते.

विकसनशिल देशांना अनेक प्रकारच्या रोगांची समस्या भेडसावत असते. विविध प्रकारच्या रोगामुळे भारतासारख्या देशातील आरोग्याची पातळी खालावली आहे. बर्याच विकसनशील देशांच्या लोकांच्या आरोग्यावर परिणाम करणार्या प्रमुख रोगांमध्ये मलेरिया, क्षयरोग,

कुष्ठरोग, डेंग्यु, हेपेटायटिस बी, एड्स इत्यादींचा समावेश होतो. वरील व इतर रोगांच्या प्रादुर्भावामुळे विकसनशील देशातील लोकसंख्येची कार्यक्षमता कमी झालेली असून गैरहजेरीचे प्रमाण, वैद्यकीय सेवेवरील प्रचंड खर्च इ. समस्यांना कामगारांना तोंड द्यावे लागते.

**शिक्षण आणि आर्थिक विकास:**

आर्थिक विकास हा आर्थिक वाढीवर अवलंबून असतो. आर्थिक वाढ ही एकूण राष्ट्रीय उत्पादनाद्वारे मोजली जाते. प्रत्येक उत्पादक घटक व व्यक्ति आपल्या कुवतीप्रमाणे उत्पादन प्रक्रियेत योगदान देत असतो. व्यक्तिला मिळणारा रोजगार हा घटक वेगवेगळा असतो. कारण शिक्षण व आरोग्य या घटकामुळे रोजगार व मजूरी दरामध्ये भिन्नता आढळते.

अनेक अभ्यासांच्या आधारे असे आढळून आले आहे कि रोजगाराची कार्यक्षमता वाढविण्यात आणि आर्थिक विकासात लक्षणीय योगदान शिक्षणाने दिले आहे. किमान पातळीवरील प्राथमिक शिक्षणाचे काही फायदे आहेत परंतु त्याच्याही पलीकडे विशिष्ट प्रकारचे शैक्षणिक विशेषीकरण चांगला रोजगार व रोजगार दर मिळवून देण्यासाठी आवश्यक असते.

**मानवी भांडवल :**

आर्थिक विकासासाठी नैसर्गिक व भौतिक भांडवलाबरोबरच रोजगाराचा व त्यासाठी शिक्षणाचा सुयोग्य वापर आवश्यक ठरतो. मानवी भांडवलाची गुणवत्ता शिक्षणाने वाढीस लागते. त्या गुणवत्तेवर विकासाचा वेग अवलंबून असतो. प्राथमिक शिक्षणाद्वारे एका ठराविक पातळीपर्यंत विकास होऊ शकतो. शिक्षण हे अशा प्रकारचे असले पाहिजे की त्यामुळे विविध प्रकारचे लागणारे श्रमिक व मानवी भांडवल निर्माण झाले पाहिजे. मानवी भांडवल म्हणजे रोजगाराच्या विविध पातळ्या असतात. उदा. अर्धकुशल व प्रशिक्षिक कामगार, कारकुन, तंत्रज्ञ नर्सेस, मध्यम पातळीवरील कामगार, इंजिनियर्स, डॉक्टर, प्रशासक, वरीष्ठ पातळीवरील व्यवस्थापक, शिक्षक इ.

शिक्षण हे बदलत्या स्वरुपाचे असते विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक व आर्थिक विकास इ. सर्व बाबीवर शिक्षणाचा दर्जा अवलंबून असतो. म्हणजेच शिक्षण हे सर्व प्रकारचा बदलांचे कारण व परिणाम असते.

## ५.३ गरीबीची संकल्पना (CONCEPT OF POVERTY)

बहुतेक सर्वच अविकसित देशांमध्ये दरडोई उत्पन्न अत्यंत कमी असून आर्थिक विषमता आढळून येते. यामुळे अनेक दोष निर्माण झाले असून गरीबी किंवा दारिद्र्य हा सर्वात गंभीर परिणाम आहे. भारतात गेल्या ५० वर्षात झालेल्या विकासानंतरही जवळजवळ ४० टक्के लोकसंख्या गरीब स्थितीत असून अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. भारताच्या सध्याच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे अधिक समतोल वाटप झाले तर प्रत्येकजण अधिक श्रीमंत होईल असे अर्थातच म्हणता येणार नाही. परंतु अशा वाटपामुळे प्रत्येकाला किमान उपभोग तरी घेता येईल असे खात्रीने सांगता येईल.

संपूर्ण जगात संशोधक आणि सांख्यिकीय संस्था गरिबी विषयीच्या दोन महत्त्वाच्या संकल्पना वापरतात.

१) आत्यंतिक गरिबी (Absolute Poverty)

२) तुलनात्मक गरिबी (Relative Poverty)

**१) आत्यंतिक किंवा निरपेक्ष गरिबी किंवा दारिद्रय (Absolute Poverty) :**

आत्यंतिक गरिबी म्हणजे अशी अवस्था की ज्यामध्ये मानवी जीवन जगण्यासाठी आवश्यक अशा किमान साधनसामुग्री उपलब्ध नसणे. आत्यंतिक गरिबी म्हणजे दारिद्र्य रेषा मानली जाते. या रेषेखालील जीवन जगणार्या व्यक्तींना उपासमारी, आकस्मिक मृत्यू इ. वंचिततेला सामोरे जावे लागते. आत्यंतिक गरिबीची संकल्पना पुढे 'तीव्र गरीबी' मध्ये (Chronic Poverty) विस्तारित केली जाते. तीव्र गरिबी ही आत्यंतिक गरिबीची दीर्घकालीन अवस्था होय. तीव्र गरिबीमध्ये जगणारे लोक पिढ्यानपिढ्या गरिबीच्या दृष्टचक्रात अडकतात. त्यातून ते बाहेर पडणे असंभव असते. उदा. ल@टीन अमेरिका, आफ्रिका इ.

**२) तुलनात्मक किंवा सापेक्ष गरिबी किंवा दारिद्रय (Relative Poverty) :**

तुलनात्मक गरिबी म्हणजे अशी अवस्था ज्यामध्ये एकाच समाजातील भिन्न-भिन्न व्यक्तिंच्या समृद्धीची तुलना केली जाते. एक व्यक्ति दुसर्या व्यक्तिपेक्षा किती प्रमाणात आवश्यक साधनसामुग्री बाळगते यावर अवलंबून असते. इतर व्यक्तिंच्या तुलनेत एखाद्या व्यक्तीचे राहणीमान म्हणजे तुलनात्मक गरिबी. याचे मोजमाप व्यक्तिच्या मालकीची साधनसामुग्री आणि राहणीमान या आधारे केले जाते. प्रगत औद्योगिक व विकसित देशांत तुलनात्मक गरिबी मोजली जाते. उदा. अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया इ. यामध्ये सामाजिक समता अंतर्भूत असते.

## ५.४ गरिबीचे मोजमाप (MEASUREMENT OF POVERTY)

दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी आणि त्यांचे मूल्यांकन करण्यासाठी गरिबीचे अंदाज व मोजमाप करणे आवश्यक आहे. गरिबीचे अंदाज / मोजमाप खालील विश्लेषणात उपयोगी ठरते.

१) सामाजिक-आर्थिक गट, प्रदेशिक गरिबीचे अस्तित्त्व

२) गरिबी निर्धारित करणारे घटक

३) गरिबीवर परिणाम करणार्या घटकांचे तुलनात्मक परिणाम

४) विविध गरिब प्रदेशात दारिद्र्य निर्मूलन कार्यक्र राबविण्यासाठी साधनसामुग्रीचे वाटप व निर्धारण करणे.

५) गरिबांसाठी 'विशेष सहाय्य योजना" ठरविणे

६) गरिबीची कारणे ठरविणे

७) सार्वजनिक धोरणांचे मूल्यमापन करणे. उदा. लोकसंख्या, तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय पर्यावरण इ. चा गरिबीच्या पातळीवर होणारा परिणाम अभ्यासणे.

### ५.४.१ गरिबीच्या मोजमापातील दोन मुलभूत घटक

१) **दारिद्र्य रेषा (Poverty Line) :** ही रेषा उत्पन्न व उपभोग यांची मर्यादा ठरविते. ही रेषा ती उत्पन्न पातळी दर्शविते. ज्या उत्पन्नपातळीखालील लोक गरीब असतात. आत्यंतिक गरिबी उत्पन्नानुसार ठरविता येते.

२) उत्पन्न व उपभोग यांच्या वितरणाविषयीची माहिती **(Data on Size of Distribution of Income & Consumption) :** खालील विविध सांख्यिकीय साधने गरिबीचे मोजमाप करण्यासाठी विविध देशांमध्ये वापरली जातात.

   १) जनगणनेतील सांख्यिकीय माहिती

   २) लोकसंख्येच्या आहारविषयक सवयींचा निरीक्षण अहवाल

   ३) लोकांचे अन्नघटकांमधील पोषणमूल्य आणि त्यांच्या संबंधित आरोग्याचे निर्देशक याबाबतची पाहणी

   ४) कौटुंबिक व राहणीमान विषयक अंदाजपत्रकाची पाहणी

   ५) रोजगार, शिक्षण, उत्पन्न व राहण्याची सोय याबाबतचा पाहणी अहवाल

   ६) सातत्यपूर्ण रोजगार व किंमत पातळी याबाबतचा पाहणी अहवाल

   ७) गरिबी विषयीचे प्रशासकीय अहवाल

## ५.५ गरिबी निर्मूलनासाठी उपाययोजना

गरिबी निर्मूलन हे नियोजित आर्थिक विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. गरिबी निर्मूलनासाठी योगदान देणाऱ्या विविध घटकांमध्ये आर्थिक वाढ नेहमीच महत्त्वाची मानली जाते. तत्कालीन परिस्थितीमध्ये असे मानले जाते की, हा वाढीचा दर नसून वाढीची रचना आहे जी वाढीच्या "ट्रिकल डाउन" प्रभावाची गती ठरवते.

भारतातील गरिबीविरोधी कार्यक्रम मुख्यत्वे केंद्र सरकार चालवतात. गरिबी निर्मूलन कार्यक्रमाचे तीन मुख्य प्रकार आहेत: (१) ग्रामीण कामे, (२) स्वयंरोजगार आणि (३) अन्न अनुदान. तिन्ही अलिकडच्या वर्षांत सुधारणांच्या अधीन आहेत. आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि गरिबांची क्षमता वाढवण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणाला चालना देण्यासाठी इतर सुविधांच्या क्षेत्रात योजना वाटप वाढवण्यात आले आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कार्यक्रमांद्वारे गरिबीविरोधी कार्यक्रमांना बळकटी आणि पुनर्रचना करण्यात आली आहे.

देशात सध्या कार्यरत असलेल्या प्रमुख दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमांची खाली चर्चा केली आहे:

**1) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA) (फेब्रुवारी 2006) :**

सरकारच्या या प्रमुख कार्यक्रमाचे उद्दिष्ट ग्रामीण भागातील कुटुंबांची आजीविका सुरक्षितता वाढवणे हा आहे ज्यांचे प्रौढ सदस्य अकुशल हाताने काम करण्यासाठी स्वेच्छेने काम करतात अशा प्रत्येक कुटुंबाला आर्थिक वर्षात किमान 100 दिवस हमी मजुरीचा रोजगार उपलब्ध करून देणे. सन 2011- 12 साठी या कार्यक्रमासाठी 40,000 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे क्रयशक्तीमध्ये भरीव वाढ झाली आहे आणि भारतातील ग्रामीण गरिबांच्या उपजीविकेच्या साधनांचा आधार मजबूत झाला आहे.

2011-12 या वर्षात जानेवारी 2012 पर्यंत योजनेअंतर्गत 3.80 कोटी कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावर मनरेगा अंतर्गत दिले जाणारे सरासरी वेतन 2006-07 मध्ये 65 रु. वरून 2011-12 मध्ये 120 रु. पर्यंत वाढले आहे.

**२) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (SGSY) एप्रिल, 1999:**

गरीब ग्रामीण कुटुंबांना बँक क्रेडिट आणि सरकारी अनुदानाच्या मिश्रणाद्वारे उत्पन्न देणा-या आर्थिक कृती हाती घेऊन त्यांना दारिद्र्यरेषा ओलांडण्यास मदत करणे, ही एक प्रमुख चालू योजना आहे. या योजनेत मुख्य उपक्रमांची निवड, क्रियाकलाप क्लस्टर्सचे नियोजन, गरीबांचे स्वयं-सहायता गट (SHGs) मध्ये संघटन आणि प्रशिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे त्यांची क्षमता वाढवणे, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि तंत्रज्ञान आणि विपणन समर्थन यांचा समावेश आहे. माजी स्वयंरोजगार कार्यक्रमांना एकाच स्वयंरोजगार कार्यक्रमात एकत्रित करून SGSY ची ओळख करून देण्यात आली. एप्रिल 1999 मध्ये योजना सुरू झाल्यापासून डिसेंबर, 2011 पर्यंत, 42.05 लाख स्वयं-सहायता गट (SHG) तयार करण्यात आले आहेत आणि 168.46 लाख स्वरोजगारांना बँक क्रेडिट आणि अनुदानाने SGSY अंतर्गत एकूण गुंतवणूक रु. 42,168.42 कोटी मदत करण्यात आली आहे.

**NRLM:** SGSY ची आता राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान (NRLM) म्हणून पुनर्रचना करण्यात आली आहे. गरीब कुटुंबांना फायदेशीर स्वयंरोजगार आणि कुशल वेतनाच्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन गरिबी कमी करणे हे NRLM चे उद्दिष्ट आहे.

**3) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY), सप्टेंबर 2001:**

SGRY चे उद्दिष्ट अन्न सुरक्षा, टिकाऊ समुदायाची निर्मिती, सामाजिक आणि आर्थिक मालमत्ता आणि ग्रामीण भागात पायाभूत सुविधांच्या विकासासह अतिरिक्त वेतन रोजगार प्रदान करणे आहे. जवाहर ग्राम समृद्धी योजना (JGSY) आणि रोजगार हमी योजना (EAS) या योजना SGRY सोबत पूर्णपणे एकत्रित केल्या आहेत. 2006-07 आणि 2007-08 मध्ये अनेक जिल्ह्यांतील SGRY कार्यक्रमाचा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत (NREGS) समावेश करण्यात आला आहे. एप्रिल 2008 पासून, SGRY कार्यक्रम राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा (NREGS) भाग आहे.

**4) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना (PMGY):**

2000-01 मध्ये सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये (UTs) गावपातळीवर शाश्वत मानवी विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. PMGY काही प्राधान्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी निवडलेल्या मूलभूत किमान सेवांसाठी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना अतिरिक्त केंद्रीय सहाय्य देते. सुरुवातीला, प्राथमिक आरोग्य, प्राथमिक शिक्षण, ग्रामीण निवारा, ग्रामीण पिण्याचे पाणी आणि पोषण या पाच गंभीर क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले. 2001-02 पासून ग्रामीण विद्युतीकरणाला अतिरिक्त घटक म्हणून जोडण्यात आले आहे.

**5) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (PMGSY): डिसेंबर 2000**

ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे. सर्व पात्र नसलेल्या ग्रामीण रहिवाशांना सर्व हवामानातील चांगल्या रस्त्यांद्वारे रस्ता कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याचा हा एक कार्यक्रम आहे. 1,42,750 किमी. रस्त्यांची कामे डिसेंबर 2007 पर्यंत पूर्ण झाली असून त्यासाठी रु. 27,382 कोटी रुपये खर्च झाले आहेत.

**6) अंत्योदय अन्न योजना : डिसेंबर 2000**

लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत गरीब कुटुंबांना गव्हासाठी 2 रु. प्रति किलो आणि तांदळासाठी 3 रुपये प्रति किलोच्या अत्यंत अनुदानित दराने अन्नधान्य पुरवते. सुरुवातीला प्रत्येक कुटुंबाला दरमहा २५ किलो धान्य उपलब्ध करून देण्यात येत होत, एप्रिल 2002 पासून हे प्रमाण 35 किलोपर्यंत वाढवण्यात आले आहे.

**7) स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना (SJSRY): 1997 एप्रिल**

2009 मध्ये सुधारित शहरी बेरोजगार किंवा अल्परोजगार गरीबांना स्वयंरोजगार उपक्रम किंवा मजुरीच्या रोजगाराच्या तरतुदीला प्रोत्साहन देऊन फायदेशीर रोजगार उपलब्ध करून देणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. शहरी दारिद्र्य निर्मूलनासाठी पूर्वी चालवलेल्या विविध कार्यक्रमांची जागा घेतली. केंद्र आणि राज्यांमध्ये 75 : 25 च्या आधारावर निधी दिला जात आहे. 2011-12 साठी SJSRY योजनेसाठी अर्थसंकल्पीय वाटप रु. 813 कोटीची तरतूद होती. याअंतर्गत सन 2011-12 मध्ये एकूण 3,63,794 लाभार्थ्यांना मदत करण्यात आली आहे.

**8) इंदिरा आवास योजना (IAY): 1999-2000**

अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), बंधपत्रित मजूर आणि ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील गैर- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यक्तींच्या गरीब कुटुंबांना मोफत निवासस्थान प्रदान करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. डिसेंबर 2006 पर्यंत, सुमारे 153 1 लाख घरे रु. 29,246 कोटी रुपये खर्चून बांधली गेली किंवा अपग्रेड केली गेली.

**9) अन्नपूर्णा योजना, 2000:**

राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेंतर्गत निवृत्ती वेतनासाठी पात्र असूनही ते मिळत नसलेल्या ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अन्न सुरक्षा प्रदान करणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे. यांतर्गत सवलतीच्या दरात अन्नधान्य दिले जाते. ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना आहे.

**10) वाल्मिकी आंबेडकर आवास योजना (वांबे): डिसेंबर 2001**

या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील शहरी झोपडपट्टीत राहणाऱ्यांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला जातो ज्यांच्याकडे पुरेसा निवारा नाही. या योजनेचा प्राथमिक उद्देश झोपडपट्टीतील रहिवाशांसाठी निवासी घरांचे बांधकाम आणि अपग्रेडेशन सुलभ करणे आहे. सामुदायिक शौचालयांच्या माध्यमातून आरोग्यदायी वातावरण प्रदान करणे हा या योजनेचा एक घटक आहे.

**11) नॅशनल फूड फॉर वर्क्स प्रोग्राम (NFFWP): नोव्हेंबर 2004**

हा कार्यक्रम सर्व ग्रामीण गरीबांसाठी खुला आहे ज्यांना रोजगाराची गरज आहे आणि अकुशल हस्तकाम करण्याची इच्छा आहे. ही 100 टक्के केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येते आणि राज्यांना अन्नधान्य मोफत पुरवले जाते.

**12) ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम (REGP):**

ग्रामीण भागात आणि लहान शहरांमध्ये स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने 1995 मध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. स्थापनेपासून मार्च, 2004 पर्यंत, 1.86 लाख प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यात आला आहे आणि 22.75 लाख रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

**13) पंतप्रधान रोजगार योजना (PMRY):**

1993 मध्ये सुशिक्षित बेरोजगार तरुणांना आर्थिकदृष्ट्या सक्षम उपक्रम सुरू करण्यास मदत करून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने या योजनेची सुरुवात करण्यात आली.

**14) सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि त्याचा गरिबीवर होणारा परिणाम:**

सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS), विशेषत: समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी अन्न सुरक्षा वाढवण्याचा प्रयत्न करते. पीडीएस हे विशेषत: गरिबांसाठी काही जीवनावश्यक वस्तूंची सहज परवडणाऱ्या किमतीत उपलब्धता सुनिश्चित करण्याचे साधन आहे. एक चांगली लक्ष्यित आणि योग्यरित्या कार्य करणारी सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) हा गरिबी निर्मूलनाच्या धोरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे. सुमारे 4.74 लाख नेटवर्कसह PDS. Fair Price Shops (BPS) हे कदाचित जगातील सर्वात मोठे वितरण नेटवर्क आहे.

गरिबांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी PDS अधिक प्रतिसादात्मक बनवण्यासाठी, लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (TPDS) जून 1997 मध्ये सुरू करण्यात आली. ही प्रणाली दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना (BPL) मोठ्या प्रमाणात अनुदानित दराने लक्ष्य करण्याचा प्रयत्न करते.

## ५.६ विषमतेची संकल्पना

विकसित देशांच्या तुलनेत विकसनशील देशांत कमी दरडोई उत्पन्न आणि संपत्ती, सत्ता व उत्पन्न यांचे मोठ्या प्रमाणावर असमान वितरण ही वैशिष्ट्ये आढळतात.

**असमानता म्हणजे काय ?**

आर्थिक विषमता म्हणजे असा मुलभूत फरक असतो की, ज्यामध्ये एका व्यक्तिला काही भौतिक गोष्टींची/वस्तूंची निवड करण्याची मुभा असते, तर त्याचवेळी, त्याची निवड करण्याची मुभा (परवानगी) इतर व्यक्तिंना नाकारली जाते. आर्थिक विषमता व्यक्तिव्यक्तिंमधील संपत्ती व उत्पन्न यांमधील दरी दर्शविते.

### ५.६.१ आर्थिक विषमतेची कारणे (Causes of Economic Inequality)

**आर्थिक विषमता खालीलपैकी विविध घटकांमुळे निर्माण होते.**

१) शिक्षण, शैक्षणिक पात्रता, कौशल्ये, क्षमता, अनुभव व घटते कर इ. मधील तफावतींमुळे लंबरुप असमानत निर्माण होते.

२) शिक्षण, रोजगार आणि बाजार इ. मधील संधीच्या पातळीतील फरक इ. मुळे विषमता निर्माण होते.

३) वंश, धर्म, लिंग व जात इ. आधारे होणारा पक्षपातीपणा विषमतेस कारणीभूत ठरतो.

४) नैसर्गिक साधनसामुग्री, कच्चा माल व हवामान इ. भौतिक पर्यावरणाच्या उपलब्धतेचा अभाव आर्थिक विषमता निर्माण करतो.

५) भांडवल व इतर मालमत्तेची गुणवत्ता व परिमाण, आकार (मालमत्तेची मालकी) यांच्या धारणक्षमतेत व्यक्तिव्यक्तिंत व देशादेशांमध्ये भिन्नता आढळते.

६) वारसा हक्काने मिळणारी संपत्ती, जमिनीची, घरांची मालकी, भौतिक साधने इ. मधील फरकसुद्धा विषमतेला कारणीभूत ठरतो.

## ५.७ विषमतेचे मोजमाप

अर्थव्यवस्थेतील उत्पन्नातील विषमतेचा अंदाज बांधण्यासाठी अर्थतज्ञ उत्पन्न वितरणाचे खालील मापदंड/निकष वापरतात.

१) वैयक्तिक किंवा उत्पन्न वितरणाचा आकार.

२) कार्यात्मक किंवा उत्पन्न वितरणातील उत्पादन घटकाचा वाटा.

**५.७.१ अ) वैयक्तिक किंवा उत्पन्न वितरणाचा आकार (The Personal or Size Distribution of Income)**

उत्पन्नाची आकारानुरुप वर्गवारी करुन वितरण करणे याला सामान्यपणे “उत्पन्न वितरणाचा आकार” असे म्हणतात. व्यक्तिव्यक्तिंमधील उत्पन्न विषमता ही सर्वसाधारणपणे प्रितव्यक्ती उत्पन्नाच्या पातळीनुसार झालेल्या उत्पन्नाच्या वितरणावरुन मोजले जाते. उच्च उत्पन्न गटाचा उत्पन्नातील कमी वाटा अणि कमी (अल्प) उत्पन्न गटाचा एकूण उत्पन्नातील मोठा वाटा हा जास्तीत जास्त समान उत्पन्न वितरण दाखवितो.

रोजगार, नफा, वारसा हक्क, भेट, खंड इ. पैकी कोणत्या मार्गाने उत्पन्न मिळविले हे लक्षात घेतले जात नाही. शहरी किंवा ग्रमीण असे स्थानिक आणि शेती, उत्पादन, सेवा इ. उत्पन्नाचे व्यावसायिक स्त्रोत देखील दुर्लक्षित केले जातात.

**५.७.२ मोजमापाच्या पद्धती (Methods of Measurement)**

**५.७.२.१ अ) पहिली पद्धत -**

अगोदर दिलेल्या वैयक्तिक उत्पन्नाची सांख्यिकीय माहिती ही चढत्या क्रमाने मांडणी करावी आणि त्याची लोकसंख्येच्या वेगवेगळ्या गटात विभागणी करावी. उदा. पंचक किंवा दशके. (Quintiles or Deciles) त्यावरुन कोणत्या उत्पन्न गटाला एकूण राष्ट्रीय उत्पन्नात किती प्रमाणात वाटा मिळाला हे ठरविता येते.

**तक्ता - ८.१**

**उत्पन्न/उपभोग यांचे पंचकानुसार (Quintile) वितरण**

| देश | पाहणी वर्ष | गिनी निर्देशांक | तळाचे १०% | तळाचे २०% | दुय्यम २०% | तृतीय २०% | चतुर्थ १०% | उच्च २०% | उच्चतम १०% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारत | २००४-५ | ३६.८ | ३.६ | ८.१ | ११.३ | १४.९ | २०.४ | ४५.३ | ३१.१ |
| ब्रझिल | २००४ | ५७.० | ०.९ | २.८ | ६.४ | ११.० | १८.७ | ६१.१ | ४४.८ |
| अमेरिका | २००० | ४०.८ | १.९ | ५.४ | १०.७ | १५.७ | २२.४ | ४५.८ | २९.९ |
| जपान | १९९३ | २४.९ | ४.८ | १०.६ | १४.२ | १७.७ | २२.० | ३५.७ | २१.७ |

**स्त्रोत :** जागतिक विकास अहवाल २००७.

आपण एकूण लोकसंख्येच्या तळाच्या ४०% आणि वरच्या २०% यांनी मिळविलेल्या उत्पन्नाच्या गुणोत्तराचा वापर करुन अत्यंत श्रीमंत व अत्यंत गरीब या दोन टोकांमधील

देशातील विषमतेचे प्रमाण मोजू शकतो. (यालाच नोबेल पारितोषिक विजेते सायमण्ड कुझनेत्झ यांच्या गौरवार्थ 'कुझनेत्झ गुणोत्तर' म्हटले जाते.)

### ५.७.२.२ ब) वैयक्तिक उत्पन्न मोजण्याची दुसरी पद्धत म्हणजे लॉरेन्झ वक्र काढणे :

**लॉरेन्झ वक्र काढण्याची पद्धत :** समजा समाजात १०० उत्पन्न मिळविणार्या व्यक्ती आहेत. ह्या १०० व्यक्तिना उत्पन्नाच्या चढत्या क्रमाने मांडले व आडव्या अक्षावर (x) प्रत्येक व्यक्तिचा संचित वाटा स्थापित केला आणि उभ्या अक्षावर (y) प्रत्येक व्यक्तिचे संचित उत्पन्न स्थापित केले तर ते बिंदू स्थापून लॉरेन्झ वक्र काढता येतो. y अक्षावर लोकसंख्येच्या प्रत्येक शेकडेवारीचा एकूण उत्पन्नात मिळविलेला वाटा दाखविला जातो. लॉरेन्झ वक्रावरील प्रत्येक बिंदू असे दर्शवितो की, तळाच्या काही व्यक्तिंचा वाटा (x अक्षावर) एकूण उत्पन्नात किती आहे (y अक्षावर) दर्शविले जाते.

संपूर्ण आकृती ही एका चौरसाद्वारे दर्शविली जाते आणि कर्ण रेषा काढली जाते. ही रेषा डाव्या बाजूच्य तळाकडून (आरंभबिंदूपासून) आकृतीच्या उजव्या कोपर्यापर्यंत काढली जाते. कर्णरेषेवरील प्रत्येक बिंदू असे दाखवितो की, मिळविलेल्या उत्पन्नाचे शेकडा प्रमाण हे उत्पन्न मिळविणार्यांच्या शेकडा प्रमाणाइतके/बरोबर आहे. उदा. कर्णावरील बिंदू दर्शवितात की, ५०% उत्पन्न हे लोकसंख्येच्या ५०% ला समानतेने वाटले जाते. तसेच कर्णरेषेवरील ८०% चा बिंदू दाखवितो की, लोकसंख्येच्या ८०% भागाला ८०% उत्पन्न मिळते. याचा अर्थ कर्णरेषा उत्पन्न वितरणाची 'अचूक समानता' दर्शविते.




**"लॉरेन्झ वक्र" (Lorenz Curve)**

**आकृती क्र. ८.१**

अशा तर्हेने लॉरेन्झ वक्र उत्पन्न मिळविणार्यांची संख्या (शेकडा प्रमाण) व वर्षभरात एकूण उत्पन्नापैकी त्यांना मिळालेल्या उत्पन्नाचे शेकडा प्रमाण यांच्यातील वास्तविक संख्यात्मक संबंध दाखवितो. वरील आकृतीत, दशक गटातील संख्या (अम्त) लॉरेन्झ वक्रावर स्थापित केलेली आहे. उदा. यात ५०% लोकसंख्येला उत्पन्नाच्या २०% पेक्षाही कमी वाटा मिळतो. (बिंदू E) त्याचप्रमाणे ८०% लोकसंख्येला एकूण उत्पन्नाच्या ५०% पेक्षाही कमी उत्पन्न मिळते. (बिंदू H).

कर्णरेषेपासून लॉरेन्झ वक्र जितका दूर असेल तितका तो उत्पन्नातील विषमतेचे जास्तीत जास्त प्रमाण दर्शवितो. जर लॉरेन्झ वक्र कर्णरेषेशी अगदी एकरुप असेल तर उत्पन्नातील विषमता अगदीच कमी असते असे दिसून येते. त्यामुळे सर्व उत्पन्न मिळविणार्यांना एकूण उत्पन्नात समान वाटा मिळतो.




**अ) तुलनात्मक समान वितरण** **ब) तुलनात्मकदृष्ट्या असमान वितरण**

**आकृती क्र. ८.२**

**उत्पन्न वितरणातील विषमतेचे प्रमाण:**

**५७.२.३ क) उत्पन्न विषमतेचे प्रमण मोजण्याची तिसरी पद्धत म्हणजे 'गिनी सहगुणक' (Gini Co-efficient) किंवा गिनी संकरण गुणोत्तर (Gini Concentration Ratio) :**

हे नांव इटालियन सांख्यिकीतज्ञ कोरॅडो गिनी यांच्या सन्मानार्थ दिलेले आहे. लॉरेन्झ वक्र आणि कर्ण रेषा यामधील भागाचे गुणोत्तर काढून 'गिनी सहगुणक' शोधला जातो. यामध्ये कर्णरेषेखालील एकूण भागाच्या क्षेत्रफळाने वरील भागाला भागले जाते.

$$\text{गिनी सहगुणक} = \frac{\text{क्षेत्र 'A'}}{\text{एकूण क्षेत्रफळ 'BCD'}}$$




**"गिनी सहगुणकाचे मोजमाप"** **(Calculation of the Gini Co-efficient)**

**आकृती क्र. ६.३**

गिनी सहगुणक हे एकूण विषमता मापदंड आहे आणि त्याचे मूल्य ० (अचूक समानता) आणि १ (अत्यंत विषमता) या दरम्यान असते. लॉरेन्झ वक्राच्या आधारे उत्पन्न व संपत्ती यांच्या वितरणाचा अभ्यास केला जातो. त्यामुळे गिनी सहगुणक वारंवार वापरला जातो.

### ५.७.३ कार्यात्मक किंवा उत्पन्न वितरणातील उत्पादन घटकाचा वाटा

अर्थशास्त्रात, उत्पन्नाचे वितरण हे उत्पादनाच्या उत्पादक घटकांच्या उत्पन्न वाट्यावरुन ठरविले जाते. घटक वाट्यावरुन इतर उत्पादन घटकांचे संबंधित उत्पन्न मोजले जाते. उदा. श्रमिक व भांडवल, श्रमिक व भांडवल ज्या प्रमाणात उत्पादनामध्ये मूल्यवृद्धी करतात त्यांच्या त्या सहयोगाप्रमाणे उत्पन्न ठरविले जाते. त्याला 'उत्पन्नाचे कार्यात्मक वितरण' म्हणतात.

या पद्धतीत एखाद्या उत्पादन घटकाला एकूण (समग्रपणे) जे उत्पन्न मिळते ते लक्षात घेतले जाते. (उदा. एकूण खंड, एकूण व्याज व एकूण नफा इ.) या पद्धतीत वैयक्तिक मोबदला विचारात घेतला जात नाही. तरीही या पद्धतीचे महत्त्व घटते कारण उत्पादन घटकांच्या किंमती ठरविण्यात जे इतर घटक प्रभाव टाकतात व त्यांची किंमत निश्चितीत भूमिका ही पद्धत स्पष्ट करु शकत नाही. उदा. रोजगार निश्चितीमध्ये सामूहीक सौदाशक्तीची भूमिका (Collective bargaining), मक्तेदाराची शक्ती आणि श्रीमंत जमिनमालक त्यांच्या फायद्यासाठी भांडवल, जमीन व उत्पादन इ. च्या किंमती वाढवितात इ.

## ५.८ विषमता नष्ट करण्यासाठी उपाय

उत्पन्न वितरणातील असमानता कमी करण्यासाठी सरकारने काही धोरणात्मक उपाय तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. हे उपाय पुढिलप्रमाणे असू शकतात:

**1) राजकोषीय उपाय:** राजकोषीय किंवा वित्तीय धोरण अर्थसंकल्पीय साधनांद्वारे उत्पन्नाचे पुनर्वितरण करण्याचा प्रयत्न करू शकते. यामध्ये महत्वाची साधने पुढिलप्रमाणे आहेत:

**(a) प्रगतीशील थेट कर:** प्राप्तिकर, संपत्ती कर, भांडवली नफा कर, भेटवस्तू कर आणि इस्टेट ड्युटी, जेव्हा प्रगतीशील पद्धतीने लावले जाते, तेव्हा श्रीमंतांकडून अधिक कर वसुल करण्यास मदत होते. किमान उत्पन्न किंवा संपत्तीला करातून सूट देऊन गरिबांना या करांपासून मुक्त केले जाते. या सर्व कर साधनांचे यश त्याच्या प्रभावी अंमलबजावणीवर अवलंबून आहे. कर कायद्यातील त्रुटींमुळे करदात्यांना कर भरणे कायदेशीररित्या टाळता येते. जर कर चुकवेगिरी प्रभावीपणे तपासली गेली नाही, तर उत्पन्नातील असमानता वाढू शकते.

**b) अनुदान / सबसिडी:** खते, पाणीपुरवठा, वीज, पंप आणि इतर उपकरणे यांसारख्या कृषी निविष्ठांच्या खर्चावर अनुदान दिले जाऊ शकते जेणेकरून लहान आणि सीमांत शेतकरी अधिक उत्पादन करू शकतील. अनुदानाचा गैरवापर रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात. दारिद्र्यरेषेखालील लोकांना शिक्षण आणि वैद्यकीय सेवा अत्यंत सवलतीच्या दरात किंवा जवळपास मोफत पुरवल्या जाऊ शकतात.

**c) अप्रत्यक्ष कर:** वस्तू आणि सेवांवरील कर अविवेकीपणे लावल्यास ते प्रतिगामी होऊ शकतात. जर असे कर निवडक असतील तर ते असमानता कमी करण्यास मदत करू शकतात. ग्राहकोपयोगी वस्तू, खासकरून एअर कंडिशनर, कार इत्यादीसारख्या आलिशान वस्तू आणि पंचतारांकित हॉटेल्समधील सेवा यांच्यावर जेव्हा मोठ्या प्रमाणावर कर आकारला जातो, तेव्हा उच्च श्रीमंतांचे अतिरिक्त उत्पन्न गोळा करण्यास मदत होते.

**२) आर्थिक उपाय:** उत्पन्न गटातील तळाचा भाग इतका गरीब राहण्याचे एक कारण म्हणजे त्यांचे उत्पन्न सुधारण्यासाठी भांडवल मिळवण्यात त्यांची असमर्थता. भेदभावपूर्ण व्याजदराद्वारे चलनविषयक धोरण अत्यंत कमी व्याजदराने किमान आवश्यक भांडवल पुरवू शकते. प्राधान्य क्षेत्रांतर्गत त्यांच्यावर उपचार केल्याने त्यांना कमीत कमी आणि सोप्या प्रक्रियेसह योग्य वेळी सुरक्षित कर्ज मिळण्यास मदत होईल.

**3) सार्वजनिक वितरण व्यवस्था:** तळाच्या उत्पन्न गटाचे खरे उत्पन्न वाढू शकते जर त्यांना रेशन आणि रास्त भाव दुकानातून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला गेला. असे सार्वजनिक वितरण केवळ सर्वात कमी उत्पन्न गटापर्यंतच मर्यादित असावे.

**4) सामाजिक सुरक्षा उपाय:** कमी उत्पन्न गटामध्ये शेती आणि औद्योगिक मजूर, उत्पन्नाचे कोणतेही नियमित स्रोत नसलेले वृद्ध आणि बेरोजगार यांचा समावेश होतो. सामाजिक सुरक्षा उपाय त्यांच्या अल्प उत्पन्नाची पूर्तता करण्यासाठी एकतर किमान किंवा काही अतिरिक्त उत्पन्न प्रदान करण्यासाठी खूप पुढे जातात. सामाजिक सुरक्षिततेमध्ये पुढील बाबी समाविष्ट असू शकतात:

**(i) वृद्धापकाळ निवृत्तीवेतन:** उत्पन्नाचा कोणताही स्रोत नसलेल्या वृद्धांना सरकारकडून नियमित मासिक उत्पन्न दिले जाऊ शकते जेणेकरून त्यांचा उदरनिर्वाह चालेल.

**(ii) बेरोजगारीचे फायदे:** बेरोजगारांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत मर्यादित रोजगाराच्या संधींमुळे सरकारने बेरोजगारांना मदत करणे अपेक्षित आहे.

**(iii) सामाजिक सुरक्षा विमा:** या योजनेंतर्गत, कामगार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्यांना संरक्षण दिले जाते. ही योजना कुटुंबांना स्वेच्छेने किंमतीसाठी स्वीकारली जाऊ शकते, अगदी उच्च उत्पन्न गटातील लोक देखील. या योजनांतर्गत वैद्यकीय, अपंगत्व आणि मातृत्व लाभ दिले जातात.

**5) रोजगार योजना:** ग्रामीण आणि शहरी भागात विविध योजना जसे की राष्ट्रीय अन्न कार्य कार्यक्रम, (SGSY), (SGRY), (PMGY) आणि इतर अनेक योजनांद्वारे रोजगार प्रदान केला जातो. संपूर्ण गरिबी आणि टोकाची विषमता नष्ट करण्यासाठी सरकारने अत्यंत गरीब कुटुंबातील किमान एका सदस्याला कायमस्वरूपी रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**6) संस्थात्मक बदल:** जमीन सुधारणा ही संस्थात्मक बदलांची उदाहरणे आहेत ज्याद्वारे जमीन भूमिहीनांमध्ये वाटली जाते आणि मालकी मशागतीला दिली जाते. अशा संस्थात्मक सुधारणांमुळे उत्पन्न कमावणाऱ्या मालमत्तेच्या वितरणात गरिबांच्या बाजूने बदल होतो.

**7) स्वयंरोजगार:** रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच स्वयंरोजगार योजनांना प्रोत्साहन दिल्याने असमानता देखील कमी होते.

**8) ग्रामीण विकास**: ग्रामीण भारतामध्ये बेरोजगारी आणि गरिबीचा मोठा वाटा आहे. या परिस्थितीमुळे लोकांचे शहरी भागात स्थलांतर होऊन नागरी समस्या वाढतात. पायाभूत सुविधा आणि ग्रामीण औद्योगिकीकरणाद्वारे ग्रामीण विकासाला चालना दिल्याने स्थलांतर रोखणे, रोजगार उपलब्ध करणे आणि आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होईल. हे सर्व उपाय उत्पन्न वितरणातील असमानतेवर कायमस्वरूपी तोडगा काढू शकत नाहीत. आपल्या देशात या उपायांना अपेक्षित परिणाम मिळण्यासाठी जलद आर्थिक वाढ आणि लोकसंख्या वाढीचे प्रभावी नियंत्रण यासह एकत्र केले पाहिजे.

## ५.९ सारांश

आर्थिक असमानता ही एक अशी परिस्थिती आहे ज्यामध्ये काही लोकांना संसाधने आणि संधी मिळण्याची परवानगी दिली जाते, तर इतरांना तीच नाकारली जाते. विकसनशील देशांनी सुरू केलेल्या विकासात्मक प्रयत्नांनंतरही, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढली आहे. विकसनशील देश या समस्येने ग्रासले आहेत. कमी दरडोई उत्पन्न आणि उत्पन्न, संपत्ती आणि शक्ती यांचे असमान वितरण. शैक्षणिक पात्रता, कौशल्ये, क्षमता, अनुभव, संपत्तीचा वारसा इत्यादीमधील फरकामुळे असमानता निर्माण होते.

उत्पन्न वितरणाचा अभ्यास करण्याचे दोन मार्ग आहेत, वैयक्तिक आणि कार्यात्मक. वैयक्तिक उत्पन्न वितरणामध्ये असमानता मोजण्याच्या विविध पद्धती आहेत. एक म्हणजे लोकसंख्येचे अस्पष्ट गटांमध्ये विभाजन करणे आणि प्रत्येक गटाला किती उत्पन्न मिळते याचा अभ्यास करणे. दुसरी पद्धत म्हणजे लॉरेन्झ वक्र तयार करणे जे एकमेकांमधील वास्तविक परिमाणात्मक संबंध दर्शवते. लॉरेन्झ वक्रची स्थिती असमानतेची डिग्री दर्शवते.

असमानता मोजण्याची दुसरी पद्धत म्हणजे गिनी सह-कार्यक्षमतेचा अंदाज लावणे. उत्पन्न वितरणाच्या कार्यक्षमतेचा अभ्यास करण्याची दुसरी पद्धत.

एखाद्या देशाच्या आर्थिक वाढीमुळे सुरुवातीला असमानता निर्माण होऊ शकते. परंतु जसजशी अर्थव्यवस्था विकास साधते तसतशी विषमता कमी होत जाते. प्रा. कुझनेट्सने वेगवेगळ्या देशांच्या अनुभवाचा अभ्यास केला होता. कुझनेट्सचा आकार बदलला होता. कुझनेट्स वक्र असमानतेचा अनुभव आणि विकासाच्या विविध टप्प्यांचे स्पष्टीकरण देते. हे प्रकरण असमानतेची कारणे आणि असमानता आर्थिक विकासावर कसा विपरित परिणाम करू शकते यावर देखील चर्चा करते.

## ५.१० प्रश्न

Q1. यावर एक टीप लिहा -

a) मानवी भांडवलाची संकल्पना

b) मानवी भांडवलात शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांची भूमिका

c) गरिबीचा अर्थ आणि मापन

d) गरिबी निर्मूलनासाठी उपाययोजना

e) असमानतेचा अर्थ आणि मापन

f) विषमता निर्मूलनाचे उपाय

❖❖❖❖

# ६

# विकास प्रक्रियेतील संरचनात्मक समस्या – २

**घटक रचना :**

६.० उद्दिष्ट्ये

६.१ समावेशी वृद्धी

६.२ स्वयंसहाय्यता गट आणि सूक्ष्म वित्त

६.३ स्थलांतर

६.४ शहरीकरण

६.५ औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्र

६.६ अनौपचारिक क्षेत्र

६.७ सारांश

६.८ प्रश्न

## ६.० उद्दिष्ट्ये

- नागरीकरणाच्या / शहरीकरणाच्या संकल्पनेचे अध्ययन करणे
- नागरीकरणाची कारणे / परिणाम अभ्यासणे.
- स्थलांतराची संकल्पना सविस्तर मांडणे
- स्थलांतरास कारणीभूत ठरणार्या घटकांचा अभ्यास करणे व परिणाम समजावून घेणे.
- स्थलांतर आणि विकास यातील संबंध अभ्यासणे.

## ६.१ समावेशी वृद्धी

### ६.१.१ प्रस्तावना

- समावेशी किंवा सर्वसमावेशक वृद्धी किंवा वाढ म्हणजे अशी आर्थिक वृद्धी किंवा वाढ होय जी रोजगाराच्या संधी निर्माण करते आणि गरिबी कमी करण्यास मदत करते.
- सर्वसमावेशकवृद्धी किंवा वाढ म्हणजे गरिबांना आरोग्य आणि शिक्षणात अत्यावश्यक सेवा मिळणे. त्यामध्ये संधीची समानता प्रदान करणे, शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे लोकांना सक्षम करणे यांचा समावेश आहे.

- यामध्ये वृद्धीची प्रक्रिया देखील समाविष्ट आहे जी पर्यावरणास अनुकूल वृद्धि आहे, सुशासनाचे उद्दिष्ट ठेवते आणि लैंगिक संवेदनशील समाजाच्या निर्मितीमध्ये मदत करते.
- OECD (ऑर्गनायझेशन फॉर इकॉनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेंट) नुसार, सर्वसमावेशक वृद्धी किंवावाढ ही आर्थिक वाढ आहे जी समाजात न्याय्यपणे वितरित केली जाते आणि सर्वांसाठी संधी निर्माण करते.

**६.१.२ सर्वसमावेशक वाढीचे घटक:**

**१) कौशल्य विकास:**

- लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाचा उपयोग काम करणाऱ्या वयोगटातील लोकसंख्येची रोजगारक्षमता, त्यांचे आरोग्य, शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि कौशल्य यावर अवलंबून असेल. कौशल्य विकास येथे महत्त्वाची भूमिका बजावते.
- भारताला कौशल्य विकासामध्ये दुहेरी आव्हानाचा सामना करावा लागत आहे: प्रथम, उच्च प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. दुसरे म्हणजे, पारंपारिक प्रशिक्षित तरुणांना रोजगार मिळत नाही.
- त्याचप्रमाणे, UNICEF 2019 च्या अहवालानुसार किमान 47% भारतीय तरुण 2030 मध्ये रोजगारासाठी आवश्यक असलेले शिक्षण आणि कौशल्ये मिळवण्याच्या मार्गावर नाहीत.

**२) आर्थिक समावेशन:**

- आर्थिक समावेशन ही असुरक्षित गटांना परवडणाऱ्या किमतीत आर्थिक सेवांमध्ये प्रवेश सुनिश्चित करण्याची प्रक्रिया आहे.
- सर्वसमावेशक वाढीसाठी आर्थिक समावेशन आवश्यक आहे, कारण यामुळे बचतीची संस्कृती विकसित होते, ज्यामुळे आर्थिक विकासाचे एकचक्र सुरू होते.

**३) तांत्रिक प्रगती:**

- जग औद्योगिक क्रांती 4.0 च्या युगाकडे वाटचाल करत आहे. या तांत्रिक प्रगतीमध्ये असमानता कमी किंवा वाढण्याची दोन्ही शक्यता आहेत.
- सरकारने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत, उदा. डिजिटल इंडिया मिशन, जेणेकरुन डिजिटल साक्षर लोकसंख्या अनंत शक्यतांसाठी तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकेल.
- तंत्रज्ञान इतर आव्हानांचा सामना करण्यासाठी देखील मदत करू शकते.

**४) आर्थिक वृद्धी किंवावाढ:**

- भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. तथापि, सध्या भारतीय अर्थव्यवस्था चक्रीय आणि संरचनात्मक दोन्ही आव्हानांमुळे मंदीचा सामना करत आहे.

- तथापि, 2024-25 पर्यंत $5 ट्रिलियन अर्थव्यवस्था होण्याचे उद्दिष्ट भारताला असमानता कमी करण्यास, सामाजिक खर्च वाढविण्यास आणि सर्वांना रोजगार प्रदान करण्यास अनुमती देऊ शकते.

**५) सामाजिक विकास:**

- सामाजिक विकास याचा अर्थ SC/ST/OBC/अल्पसंख्याक, महिला आणि ट्रान्सजेंडर यांसारख्या लोकसंख्येतील सर्व उपेक्षित वर्गांचे सक्षमीकरण होय.
- सामाजिक संरचनेच्या संस्थांमध्ये सुधारणा करून सक्षमीकरण केले जाऊ शकते, म्हणजे रुग्णालये विशेषतः ग्रामीण भागातील प्राथमिक उपचार, शाळा, विद्यापीठे इ.
- सामाजिक संरचनेतील गुंतवणुकीमुळे केवळ विकासाला चालना मिळणार नाही (आर्थिक उत्तेजनाद्वारे), तर भविष्यातील कामे हाताळण्यासाठी एक निरोगी आणि सक्षम पिढी देखील तयार होईल.

**६.१.३ सर्वसमावेशक वृद्धी किंवावाढ साध्य करण्यासाठी आव्हाने:**

**१) गरिबी:**

बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक (MPI) 2018 नुसार, भारताने 2005-06 आणि 2015-16 दरम्यान 271 दशलक्ष लोकांना दारिद्र्य रेषेच्या वर उचलले, सर्वात गरीब प्रदेश, गट आणि मुलांसह, गरिबी सर्वात वेगाने कमी केली. भारत उप-राष्ट्रीय स्तरावर गरीब समर्थक नमुना स्पष्ट करतो.

**२) बेरोजगारी:**

- NSSO च्या नियतकालिक श्रम बल सर्वेक्षण (PLFS) नुसार, शहरी कर्मचाऱ्यांमध्ये बेरोजगारीचा दर 7.8% होता, तर ग्रामीण कर्मचाऱ्यांसाठी बेरोजगारीचा दर 5.3% होता आणि एकूण बेरोजगारीचा दर 6.1% होता.
- भारतातील रोजगाराची गुणवत्ता आणि प्रमाण निरक्षरतेमुळे आणि शेतीवर जास्त अवलंबित्वामुळे कमी आहे.
- रोजगाराची गुणवत्ता ही समस्या आहे, कारण 80% पेक्षा जास्त लोक कोणत्याही सामाजिक सुरक्षिततेशिवाय अनौपचारिक क्षेत्रात काम करतात.
- रोजगार वृद्धी खालील कारणांमुळे कमी आहे: कमी गुंतवणूक, उद्योगात कमी भांडवल वापर आणि कमी कृषी वाढ.

**३) कृषी मागासलेपणा:**

- भारतातील सुमारे 44% लोक रोजगारासाठी शेतीशी संबंधित आहेत, परंतु भारतीय GDP मध्ये त्यांचे योगदान केवळ 16.5% आहे ज्यामुळे व्यापक गरिबी वाढते.
- कृषी क्षेत्रातील समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१) दरडोई जमिनीची उपलब्धता कमी होत आहे

२) रोजगाराच्या वाटा मध्ये हळूहळू घट
३) कमी श्रम उत्पादकता
४) हवामान बदल, जमिनीचा ऱ्हास आणि पाण्याची अनुपलब्धता यामुळे कृषी उत्पन्नात घट
५) प्रदेश आणि पिकांच्या वाढीमध्ये असमानता.
६) सामाजिक विकासाशी संबंधित समस्या

- सर्वसमावेशक वाढीसाठी सामाजिक विकास ही प्रमुख चिंता आहे. परंतु त्याला काही समस्यांचा सामना करावा लागत आहे जसे की:

१) लक्षणीय प्रादेशिक, सामाजिक आणि लैंगिक असमानता.
२) सार्वजनिक खर्चाची कमी पातळी आणि मंद वाढ, विशेषतः आरोग्य आणि शिक्षण.
३) खराब दर्जाची वितरण प्रणाली.
४) ओबीसी, एससी, एसटी आणि मुस्लिमांसाठी सामाजिक निर्देशक खूपच कमी आहेत.
५) बालकांमधील कुपोषण - जागतिक भूक निर्देशांकात भारताचा क्रमांक 102 वा आहे.

**४) प्रादेशिक विषमता / असमानता:**

- प्रादेशिक विषमता ही भारतासाठी मोठी चिंतेची बाब आहे. जातिव्यवस्था, श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी इत्यादी घटक प्रादेशिक असमानतेस कारणीभूत ठरतात ज्यामुळे अशी व्यवस्था निर्माण होते जिथे काही विशिष्ट गटांना इतरांपेक्षा अधिक विशेषाधिकार असतात.
- प्रादेशिक असमानतेच्या काही समस्या खालीलप्रमाणे आहेत:

१) साक्षरता दराच्या बाबतीत, केरळ हे 93.1% साक्षरतेसह सर्वात साक्षर राज्य, तर दुसरीकडे, बिहारचा साक्षरता दर फक्त 63.82% होते.
२) दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत, 2018 मध्ये गोव्याचे दरडोई उत्पन्न 4,67,998 रुपये, तर बिहारचे दरडोई उत्पन्न त्याच्या केवळ एक दशांश म्हणजे 43,822 रुपये होते.

**६.१.४ सर्वसमावेशक वाढीचे मोजमाप:**

**१) समावेशी विकास निर्देशांक (IDI):**

- वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) द्वारे संकलित केलेल्या समावेशी विकास निर्देशांक (IDI) मध्ये, भारत 74 उदयोन्मुख देशांपैकी 62 व्या क्रमांकावर आहे आणि 20 (G-20) देशांच्या गटातील सर्वात कमी समावेशक देशांपैकी एक आहे.
- IDI या कल्पनेवर आधारित आहे की बहुतेक लोक त्यांच्या देशाची वाढ GDP वर नव्हे, तर त्यांच्या स्वतःच्या राहणीमानावर आधारित आहेत.
- हा निर्देशांक पुढील तीन मापकांच्या आधारावर असमानतेचे मोजमाप करते:

१) वाढ आणि विकास
२) समावेशकता
३) आंतरपिढी समता आणि शाश्वतता किंवा चिरंतनता.

- भारताने देखील टॉप 10 सर्वात समावेशक उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्थांमध्ये स्थान मिळवले नाही, जिथे त्याचे शेजारी नेपाळ, चीन आणि श्रीलंका यांनी ठसा उमटवला.
- भारताने "आंतरपिढी समता आणि शाश्वतता" च्या बाबतीत सर्वोत्तम कामगिरी केली,यामध्ये भारत 44व्या क्रमांकावर आहे, ज्याचे श्रेय त्याच्या लोकसंख्याशास्त्रीय लाभांशाला दिले जाऊ शकते.

**२) सामाजिक प्रगती निर्देशांक (SPI):**

- हा सामाजिक आणि पर्यावरणीय निर्देशकांचा एकत्रित निर्देशांक आहे ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:

१) मूलभूत मानवी गरजा
२) कल्याणाचा पाया
३) संधी

### ६.१.५ भारताने सर्वसमावेशक विकास साधण्यासाठी केलेले उपाय:

सर्वसमावेशक वाढीसाठी सरकारकडून अनेक योजना राबविण्यात येत आहेत ज्यात पुढील गोष्टींचा समावेश आहे:

१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा योजना (मनरेगा)
२) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)
३) मुद्रा बँक योजना
४) पं. दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU-GKY)
५) दीनदयाल अंत्योदय योजना- राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान (DAY-NULM)
६) सर्वशिक्षा अभियान (SSA)
७) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM)
८) भारत निर्माण
९) स्वच्छ भारत मिशन
१०) मिशन आयुष्मान
११) प्रधानमंत्री जन धन योजना

## ६.२ स्वयंसहाय्यता गट आणि सूक्ष्म वित्त

**प्रस्तावना:**

समाजातील दुर्बल दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी सूक्ष्मवित्त पुरवठ्याकडे पहिले जाते. विकसनशील देशात मागणी व पुरवठा या दोन्ही बाजूने दारिद्र्याचे दुष्टचक्र असते. जर काळजीपूर्वक वित्तीय नियोजन केले तर कमी गुतंवणूक कमी उत्पन्न - कमी गुंतवणूक या दुष्टचक्राचा नाश करुन गरीब कुटुंबाना दारिद्र्यरेषेच्यावर आणता येईल. या करिताच यूनोचे सेक्रेटरी - मा. कोपीअन्नन यांनी २००५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय सूक्ष्मवित्त वर्ष' म्हणून घोषित केले आहे. या सुक्ष्मवित्त

वर्षापासून दारिद्रय निर्मूलन करणे, सूक्ष्मवित्त संकल्पना रूजविणे त्यांचे दिर्घकालीन चांगले परिणाम मिळू शकतील या दृष्टीकोनातून सुक्ष्मवित्त जाहिर करण्यात आले.

**व्याख्या:**

१) "सूक्ष्मवित्त म्हणजे सक्तीची बचत, लघुकर्ज, खेळते भांडवल, उपभोग कर्ज, गुंतवणूक, स्वयंरोजगार, प्रशिक्षण विमा, विद्यावेतन, विपणन, पुनर्वित्त, वित्तीय शिस्त, कर्जफेड, कमी खर्च कर्ज वितरण या गोष्टी अंतभूर्त असतात. त्यास सूक्ष्म वित्त म्हणतात."

२) "बचत + कर्ज + विमा + विपणन या सेवा जेव्हा एकाच मंचावरुन दिल्या जातात तेथे वित्त असतो. या सेवा पुन:श्व गटागटांतर्गत दिल्या जातात त्यास सूक्ष्म वित्त म्हणतात."

३) "सूक्ष्म वित्त म्हणजे मर्यादित कर्ज, विनातारण कर्ज समूह कर्ज बचती बरोबर कर्ज, अनुत्पादक कर्ज, मागताक्षणी कर्ज, वेळेवर बचत, कर्जात लवचिकता कागदी गुंतागुंत नसणारी, व्यक्तीगत पत, पारदर्शकता बचत संकलन करणे, व्याजदर कमी बँकाप्रमाणे नोंदी ठेवणारी, खर्च कमी ठेवणारी अशी मिश्र व्यवस्था असणारी व्यवहार संकल्पना म्हणजे सूक्ष्मवित्त होय."

**सूक्ष्मवित्त संस्थाची उद्दिष्ट्ये:**

**१) दारिद्रय निर्मूलन:**

सूक्ष्मवित्त पुरवठ्याचे महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे ग्रामीण भागातील महिलांना दारिद्रय दूर करण्यासाठी बचत गटामार्फत विविध व्यवसाय करण्यासाठी उत्पन्नाच साधन उपलब्ध करुन देणे.

**२) बचत करण्यास प्रोत्साहन:**

सूक्ष्मवित्त संख्या स्वयंसहाय्यता गटांना बचतीच्या सवयी लावण्याकरता प्रोत्साहन देते त्यामुळे बचतीत वाढ होते.

**३) निधीची सुरक्षितता:**

सूक्ष्मवित्त संस्था बचतगटांनी जमा केलेला बचत निधी सूरक्षित ठेवण्याची जबाबदारी पार पाडतात. तसेच बचतगटांनी मागताक्षणी निधी परत करतात.

**४) ठेवीचे संरक्षण:**

गरीब लोक बचतीच्या स्वरुपात ज्या ठेवी ठेवतात त्या ठेवीचे संरक्षण करण्याची जबाबदारी या संस्थाची असते. या ठेवी स्वयंसेवी संख्या आणि स्वयंसहाय्यता गट संकलन करतात.

**५) गटाच्या सबलीकरणास मदत:**

सूक्ष्मवित्तसंस्था बचतगटाच्या व्यवस्थापनातील उणीवा, संरचनात्मक बांधणी, वित्तीयक्षमता बांधणी करतात. त्यामुळे गटाचे सबलीकरण होण्यास मदत होते.

### ६) सरकारी हस्तक्षेपास अटकाव:

सूक्ष्मवित्त संस्थांच्या कार्यात सरकारी हस्तक्षेपास अटकाव असतो. ह्या वित्तसंख्या स्वयंचलित कार्यपध्दती अवलंबतात सरकार फक्त धोरण व आराखडा तयार करुन देते.

### ७) विशेष सेवा पुरवतात:

सूक्ष्मवित्तसंस्था ग्रामीण भागात दारिद्रय निर्मूलन करताना गटांच्या कामकाजात शिक्षण, आरोग्य व विमा या सेवांच्या बरोबर बचत, विपणन, मदत उत्पादन, प्रशिक्षण इ. सेवा पुरवतात.

### ८) स्वयंसहाय्यता गटबांधणी:

सूक्ष्मवित्तसंस्था ग्रामीण भागात महिलांचे व पुरुषांचे स्वयंसहाय्यता बचतगट बांधणी करतात. त्या गटाद्वारे वित्तसहाय्य करतात.

### सूक्ष्मवित्तसंस्थाचे कार्य (Functions of micro finance institutions):

१) दारिद्रय निर्मूलनासाठी गरीब कुंटूबांना कर्जपुरवठा करणे.

२) समाजात स्त्री पुरुष समानता निर्माण करण्यासाठी महिलांचे सबलीकरण करणे.

३) स्वयंसहाय्यता बचत गटातील महिलांच्या विकासासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे.

४) गटाच्या उत्पादित वस्तूसाठी बाजारपेठ उपलब्ध करुण देणे.

५) वित्तीय सेवा बरोबर गटांना सामाजिक सेवा पुरविणे.

६) विपणन, उत्पादन, पॅकींग उद्योजक इ. बाबत प्रशिक्षण देणे.

७) बचतगटांना कर्जपुरवठा करणे.

८) दारिद्रयरेषेखालील कुटुंबाची उत्पन्नपातळी वाढविण्यासाठी आणि त्यांच्या रहाणीमानांच्या दर्जात सुधारणा होण्यासाठी काटकसर, विपणनसेवा, वित्तीयसेवा इ. पुरविणे.

सूक्ष्मवित्त संस्था आज जगभर पसरल्या आहेत.  विशेष करुन गरीब विकसनशील देशात या संस्थांचे जाळे पसरले आहे. आज जगभरात ७००० सूक्ष्मवित्तसंस्थानी १ कोटी ३० लाख छोट्या कर्जदारंना ७ अब्ज डॉलर सूक्ष्मवित्ताचे वितरण केले आहे. या कर्जाची परतफेड ९७% झाली असून ३०% वार्षिक विकासदर नोंदविला आहे. सूक्ष्मवित्त वार्षिक उलाढाल सुमारे २.५ अब्ज डॉलर एवढी असून जगातील १० कोटी कुटुंबाना सूक्ष्मवित्त २१.६ अब्ज डॉलर एवढ्या निधीची गरज आहे.

सुक्ष्मवित्तसंस्था ही लोकशाही तत्वावर चालणारी आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेची पुर्नबांधणी स्त्री पुरुष समानता सबलीकरण, दारिद्रयनिर्मूलन रोजगारात व बचतीत वाढ ही उद्दिष्ट्ये सूक्ष्मवित्त पुरवठ्याची असल्यामुळे यामध्ये वाढ होत आहे.

**सूक्ष्मवित्त पुरवठा व स्वयंसहाय्यता बचतगट:**

विकसनशील देशात गरीबी ही मोठ्या प्रमाणात असते. या लोकांकडे कलाकौशल्ये असतात, उदयोजकता असते परंतू त्याचा उदयोग व्यवसायात उपयोग करण्यासाठी त्यांच्याकडे भांडवल नसते. देशातील पतनिर्माण करणार्या बँका त्यांना कर्ज देत नाहीत कारण तारण ठेवण्यासाठी त्यांच्याकडे कोणती मालमत्ता नसते. म्हणजेच गरिबीतून बाहेर येण्यासाठी त्यांना स्वयंरोजगार मिळू शकत नाही. रोजगाराच्या संधी नाहीत व स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी भांडवल नाही अशा स्थितीत ग्रामीण समाज अडकलेला आहे. यावर तोडगा काढण्यासाठी १९७० मध्ये बांगलादेश ग्रामीण बँकेचा पाया घातला आहे. श्री. महमद सुनूस यांनी ही बँक प्रत्यक्षात आणली आणि त्या बँकेच्या यशस्वी वाटचालीने सुक्ष्मस्तरीय वित्तपुरवठा ही संकल्पना लोकप्रिय झाली.

**सूक्ष्मवित्त पुरवठ्यात पुढील घटकांचा समावेश होतो:**

**१) सुक्ष्मस्तरीय बचत:**

स्वत:च्या अल्प उत्पन्नातून बचतीची सुरुवात करणे व त्यात सातत्य राखणे त्यातून बचतीची सवय लावणे.

**२) सुक्ष्मस्तरीय कर्ज:**

व्यक्ती व व्यक्तींच्या गटांना उत्पन्न मिळवून देतील अशा कारभारासाठी उपभोगासाठी तसेच अचानक उद्भवणार्या अडचणीसाठी अल्परकमेचा कर्जपुरवठा करणे.

**३) सुक्ष्मस्तरीय विमा संरक्षण:**

शेतकरी व ग्रामीण भागातील व्यक्ती व व्यक्ती समूहांना विम्याचे संरक्षण पुरविणे.

## ६.६ सूक्ष्मवित्त पुरवठ्याची वैशिष्ट्ये

१) कर्ज अत्यंत अल्परकमेची असतात.

२) या योजनेत प्रामुख्याने महिलांवर भर दिला जातो.

३) बचतगट स्थापून त्यात जमा झालेल्या रक्कमांचे कर्जरुपाने वाटप होते.

४) कार्यपध्दतीत पारदर्शकता असते.

५) कर्जफेडीचा कालावधी अल्प असतो.

६) कर्जवितरण प्रक्रिया सोपी व उदार असते.

७) कर्जासाठी तारणाची आवश्यकता नसते.

८) गरजेनुसार कर्जपुरवठा केला जातो.

भूमिहिन मजूर, अल्पभूधारक शेतकरी ग्रामीण कारागीर आणि छोटे व्यापारी यांच्या सारखे सुक्ष्मस्तरीय वित्तपुरवठ्याचे लाभधारक आहेत. मेणबत्या, गालिचे, चप्पल, अगरबत्ती, डेअरी मसाला, पापड, लोणची अशा प्रकारच्या उद्योगांना सुक्ष्मस्तरीय वित्तपुरवठा लाभदायक झाल्याचे दिसते. ग्रामीण महिलांतील कलागुण उद्योजकता यात वाढ करुन सुक्ष्मवित्त पुरवठ्याने महिलांना आर्थिक व सामाजिक राजकीय क्षेत्रात बरेच वर आणले आहे. विकास व सामाजिक न्याय या उद्दिष्टपूर्तीसाठी सुक्ष्मस्तरीय वित्तपुरवठ्याचे योगदान मोठे आहे.

ग्रामीण भागात बँकांच्या शाखांचे जाळे मर्यादित असते. तसेच ग्रामीण जनता अशिक्षित असल्याने बँकिंग सुविधांची त्यांना माहिती नसते. शिवाय बँकाकडून कर्ज घेण्यासाठी द्यावे लागणारे तारण गरीब लोकांकडे नसते. म्हणून सामान्यांना बँकेचा लाभ घेता येत नाही. सुक्ष्मस्तरीय वित्तपुरवठा हा त्यावर यशस्वी ठरलेला उत्तम मार्ग आहे.

**स्वयंसहाय्यता गट व सूक्ष्मस्तरीय वित्तपुरवठा यांचा संबध:**

सुक्ष्मस्तरीय वित्तपुरवठ्यासाठी स्वयंसहाय्यता गट एजन्सी म्हणून विकसित झाला. समान आर्थिक - सामाजिक पार्श्वभूमी असलेले सामान्यत: गरीब लोक एक अनौपचारिक गट तयार करतात. सामूदायिक जबाबदारी व परस्परांना सहकार्य या तत्वावर गटाची स्थापना करुन बँकेत खाते उघडतात. १५ ते २० सदस्य एकत्र येतात बचत करतात. बचत बँकेत जमा केली जाते. ९०% स्वंयसहाय्यता गट हे केवळ महिला सदस्यांचे आहेत. परस्परांवर विश्वास, बचतीचा भाव, गरजेनुसार कर्ज, महिलांना कर्ज, कर्ज परतफेडीसाठी गट सदस्यांचे अनौपचारिक दडपण, कौशल्य शिक्षण, क्षमता, विकास आणि रोजगार निर्मिती या तत्वावर हे गट काम करतात.

**बचत गटांची वैशिष्ट्ये:**

१) प्रथम बचत-बचतीशिवाय कर्ज नाही.

२) कर्जासाठी बचतीचा पूर्वानूभव हेच प्रमुख कारण.

३) सुरुवातीला छोट्या रक्कमेची कर्जे दिली जातात.

४) कर्ज परतफेडीची एकत्रीत जबाबदारी असते.

५) गटाने सदस्यांना कर्ज देतांना व्याजदर व इतर शर्थी निश्चित केल्या जातात.

६) गट जसा अधिक वर्ष कार्यरत राहील व जून्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरेल तशी कर्ज मर्यादा वाढत जाते.

स्वयंसहाय्यता गटाला बँकेकडून कर्ज मिळविण्यासठी असा गट किमान सहा महिने आस्तित्वात असावा लागतो. त्या गटाचे व्यवस्थापन लोकशाही पध्दतीने व्हायला हवे. सर्व सदस्यांचा व्यवस्थापनात सहभाग असावा. गटातील सदस्य समान पार्श्वभूमी लाभलेले व समान हितसंबंध असलेले हवेत व परस्परंना मदत करण्याची व एकत्रित काम करण्याची त्यांची इच्छा हवी.

**स्वयंसहाय्यता गटांमार्फत मिळणारी आर्थिक मदत तीन प्रकारे वापरली जाते.**

१) गटातील सदस्यांचा वैयक्तिक कारभार चालविण्यासाठी – शेती, पशुपालन, छोटा व्यापार कलाकुसरीचा उद्योग इत्यादि.

२) गटातील सर्व सदस्यांना उपयोगी पडतील अशा गुंतवणूका करण्यासाठी – उदा. सामाईक विहिर, शेती सेवा केंद्र, सामाईक शेती अवजारे इत्यादि.

३) गटातील सर्व सदस्यांचा एकत्रित कारभार चालविण्यासाठी – उदा. सामाजिक वनीकरण, कुकुटपालन, डेअरी इत्यादि.

## ६.३ स्थलांतर

**प्रस्तावना :**

स्थलांतर म्हणजे एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी जाणे होय. लोक एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी वास्तव्यास जातात. त्यास स्थलांतर म्हणतात. ग्रामीण भागातील लोक विविध कारणांसाठी शहरात जातात व तेथे वास्तव्य करतात. त्यातूनच नागरिकरणास सुरूवात होते. म्हणून यास ग्रामीण नागरी स्थलांतर म्हणतात.

**व्याख्या :**

**बर्गल :** लोकसंख्येच्या स्थानांतरासाठी दिलेले नाव म्हणजे स्थलांतर होय.

डॉ. दुबे : "स्थलांतर ही सामाजिक परिवर्तनाची अशी प्रक्रिया आहे की ज्याद्वारे लोकसंख्येचे अंतर्गमन व बहिर्गमन होते."

सर्वसाधारणपणे या स्थलांतरात ग्रामीण भागातील लोक शहरीभागात स्थलांतर करतात याचाच अर्थ ते ग्रामीण निवास सोडून नगरात निवास करतात. त्याचप्रमाणे ग्रामीण सामाजिक व्यवस्था सोडून शहरातील नवीन सामाजिक व्यवस्थेचा स्विकार करतात.

**ग्रामीण-नागरी स्थलांतरास कारणीभूत ठरणारे घटक:**

ग्रामीण - नागरी स्थलांतर हे विशेष महत्वाचे आहे. कारण या स्थलांतरामुळे नागरीकरणास चालना मिळाली आहे. स्थलांतर वाढले तर नागरीकरणात सुद्धा वाढ घडून येईल.

**ग्रामीण-नागरी स्थलांतरास पुढील घटक कारणीभूत ठरले आहेत.**

**I. आर्थिक घटक (Economic Factors):**

सर्वसाधारणपणे स्थलांतर हे मागासलेल्या भागातून विकसीत असलेल्या भागाकडे होत असते. कारण मागास भागात रोजगार संधी नसतात. याउलट विकसीत भागात रोजगाराच्या विविध संधी असतात. आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी चांगल्या रोजगार मिळावा. या उद्देशाने लोक स्थलांतर करतात. पुढील आर्थिक घटक ग्रामीण-नागरी स्थलांतरास प्रेरणा देतात.

**१) कमकुवत आर्थिक परिस्थिती:**

ग्रामीण भाग मागासलेल्या असतो या भागात रोजगार संधी उपलब्ध नसतात. लोक दारिद्र्य अवस्थेत जीवन जगत असतात. कमी उत्पन्न, बेकारी, दारिद्र्य या गोष्टीमुळे व्यक्ती शहराकडे स्थलांतर करतात. शहरात गेल्यावर रोजगाराच्या चांगल्या संधी मिळतील उत्पन्न वाढेल आर्थिक परिस्थिती सुधारेल यामुळे व्यक्ती शहराकडे स्थलांतरीत होतात.

**२) नागरी आर्थिक परिस्थिती:**

शहरात नवनवीन कार्यालये आणि इतर व्यवसाय उघडले जातात. त्यामुळे कामगारांची गरज असते. तसेच शहरात ग्रामीण भागापेक्षा जास्त वेतन मिळते. शहरातील आर्थिक जीवन चांगले असल्यामुळे ग्रामीण लोक शहरात स्थलांतर करतात.

**३) सामान्य आर्थिक परिस्थिती:**

संघटीत आणि असंघटीत या दोन्ही क्षेत्रात शहरात चांगली मजुरी मिळते. परंतू ग्रामीण भागातून येणार्या सर्वानाच शहरी भागात रोजगारात सामावून घेतला जात नाही. नवीन उत्पादन प्रक्रियेशी जे लोक परिचीत असतात. ज्यानी आधुनिक उत्पादनातील उपकरणे हाताळण्यासाठी आवश्यक प्रिशक्षण घेतलेले असते. त्यानाच शहरी रोजगारात सामावून घेतले जाते. बाकीच्याना ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे पुन्हा वळावे लागते. कारण शहरातील रहाणीमान खर्च त्याना परवडत नाही.

**II. लोकसंख्या घटक (Demographic Factor)**

भारतात लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे. औषधउपचाराच्या सोयीत झालेल्या वाढीमुळे मृत्यूदर घटला आहे पण ग्रामीण भागात जननदर जास्त आहे. ग्रामीण लोकांचा शेती हाच एकमेव व्यवसाय आहे. ह्या व्यवसायात पाच ते सहा महिने रोजगार मिळतो कारण शेती पावसावर अवलंबून आहे. कारखानदारीचा विकास पायाभूत सुविधा अभावी ग्रामीण भागात झाला नाही त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध नसतात. स्वाभाविकच रोजगारासाठी लोकसंख्या शहराकडे स्थलांतरीत होते.

**III. सांस्कृतिक आणि सामाजिक घटक (Cultural & Social Factor)**

ग्रामीण-नागरी स्थलातरास सामाजिक व सांस्कृतिक घटक कारणीभूत असतात. जुन्या व नवीन पिढीतील वैचारिक मतभेदामुळे तरुण पिढी स्वतंत्रपणे रहाते. त्यामुळे ती शहरात स्थलांतर करते. दळणवळण क्षेत्रात झालेली प्रगती शहरी भागातील आधुनिक सुविधा तसेच मारवाडी, गुजराथी व्यवसायासाठी शहरात स्थलांतरीत होतात.

वरील सर्व आर्थिक, सामाजिक राजकीय, सांस्कृतिक घटकामुळे ग्रामीण नागरी स्थलांतर घडून येते.

**ग्रामीण-नागरी स्थलांतराचा परिणाम:**

ग्रामीण नागरी स्थलांतराचे विशेष परिणाम नागरी समाजावर होतात त्याच प्रमाणे ग्रामीण समाजावर देखील परिणाम होतात. स्थलांतरामुळे लोकसंख्येचे पुनर्वितरण होते. या

गोष्टीमुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय लोकसंख्यात्मक परिणाम घडून येतात. ग्रामीण नागरी स्थलांतराचे प्रमुख परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) आर्थिक परिणाम (Economics consequences)**

ज्या क्षेत्रातून स्थलांतर झाले ते क्षेत्रे आणि ज्या क्षेत्रात स्थलांतर झाले ते क्षेत्रे दोन्ही क्षेत्रावर स्थलांतराचे परिणाम होतात. ज्या क्षेत्रात छुपी बेकारी, आणि अतिरिक्त मजूराचे प्रमाण जास्त असते. त्या क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. त्यामुळे ज्या क्षेत्रातून स्थलांतर झाले त्या क्षेत्रातील उत्पादनात वाढ येते. नागरी भागांचा विकास झपाट्याने होत असल्यामुळे नागरी भागात मजूरांची गरज जास्त असते. म्हणून सुशिक्षित मजूर या भागात स्थलांतरीत होतात. त्यामुळे आर्थिक वृद्धी होते. परंतू अनेकदा ग्रामीण नागरी स्थलांतराचे वाईट परिणाम होतात. जर आवश्यकतेपेक्षा जास्त श्रमिक नागरी भागात स्थलांतरीत झाले तर बेकारी मोठ्या प्रमाणात वाढते. आरोग्य, घर, पाणी यांचा प्रश्न निर्माण होतो. गलिच्छ वस्त्यात वाढ होते. त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. पण शहरी भागात येणारे श्रमिक शहरी भागात काम करुन पैसा गावी पाठवतात त्यामुळे गावातील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारते.

**२) लोकसंख्यात्मक परिणाम (Demographic impact)**

ग्रामीण भागातून शहरात स्थलांतर करणार्या लोकामध्ये सर्वसाधारणपणे १५ ते ५६ वयोगटातील लोक असतात. हे नोकरीसाठी शहरात स्थलांतर करतात. त्यामुळे ग्रामीण भागात फक्त वृद्ध आणि मूले यांचेच प्रमाण जास्त असते. स्वाभाविक ग्रामीण भागात काम करणार्या लोकांची कमतरता निर्माण झाली आहे. स्थलांतरामुळे लोकसंख्येच्या रचनेत फरक पडला असून अनके प्रश्न निर्माण झाले आहेत.

**३) सामाजिक परिणाम (Social impact)**

नागरीकरणाचा व्यवसायाच्या संरचनेवर जास्त परिणाम झाला आहे. पूर्वी जातीनुसार व्यवसाय करणे बंधनकारक होते. त्यामुळे व्यावसायिक गतिशिलतेचा अभाव होता. परंतु शिक्षणामुळे व्यवसायाबाबत असलेली जातीची बंधने सैल झाली. खेड्यातील लोक शहरात जातात तेव्हा मिळेल तो व्यवसाय करतात. स्थलांतरामुळे ग्रामीण लोक परंपरागत मूल्य सोडून देऊन आधुनिक मुल्य स्विकारु लागले आहेत. व्यावसायिक संरचना बदलण्यास मदत झाली आहे.

ग्रामीण - नागरी स्थलांतरामुळे सामाजिक प्रश्न (गलिच्छ वस्त्या, रोगराई, गुन्हेगारी) वाढले असले तरी स्वस्त दरात कामगार मिळू लागले. त्यामुळे उत्पादन-उत्पादकता-औद्योगीकरण यात वाढ झाली.

ग्रामीण शहरी स्थलांतर हे आर्थिक विकासाच्या फायद्याचे आहेत. अंतर्गत स्थलांतरात ग्रामीण भागातील लोकांना रोजगारासाठी शहरात मागणी असल्याने ते शहराकडे स्थलांतरीत झाले. कारण शहरात औद्योगिकरणास सुरुवात झाली होती. स्थलांतर फायदेशीर होते कारण ग्रामीण भागात या श्रमिकांची सिमान्त उत्पादकता शुन्य होती तर

शहरीभागात ह्या श्रमिकांची उत्पादकता वाढत होती. कारण शहरीभागात भांडवल व तांत्रिक प्रगतीत वाढ होत आहे.

अल्पविकसीत देशात ग्रामीण शहरी स्थलांतराचा वेग जास्त असतो. परंतू ह्या स्थलांतरीत होणार्या लोकसंख्येला शहरी भागातील औद्योगिक व सेवा क्षेत्रात सामावून घेतले जाते. दिर्घकाल खंडाचा विचार करता स्थलांतर शहरी भागातील श्रमिकांच्या मागणीचा प्रश्न सोडवल्यास असमर्थ ठरते. ग्रामीण आणि शहरी भागातील आर्थिक आणि Structural असंतूलनामुळे शहरी बेरोजगारीचा प्रश्न सुटू शकला नाही.

**आपली प्रगती तपासा :**

१. स्थलांतर म्हणजे काय ते व्याख्या देऊन स्पष्ट करा.

२. ग्रामीण - नागरी स्थलांतरास कोणते आर्थिक घटक कारणीभूत ठरले आहेत ते सांगा.

३. नागरी स्थलांतराचे आर्थिक परिणाम सांगा.

## ६.४ शहरीकरण

आर्थिक विकास व शहरीकरण यांचा जवळचा संबंध आहे. आर्थिक वाढ म्हणजे ग्रामीण भूमीचा शहरीकरणासाठी होणारा वापर होय. शहरीकरणाच्या प्रक्रियेत अर्थव्यवस्था उद्योगप्रधान बनत असते. विकासाच्या टप्प्यात अर्थव्यवस्थेत अनेक रचनात्मकबदल घडून येतात. त्यामुळे शहरीकरणाचा वेग वाढतो. शहर म्हणजे सर्वसामान्यपणे एक राजकीय युनिट की, ज्यांचे नियंत्रण व कारभार शासनामार्फत वाढविला जातो. शहरीकरण म्हणजे अनेक लोकांची वस्ती अधिक जलद गतीने वाढविली जाते. युनायटेड नेशनच्या मते, "जर १ लाख शहर निर्माण झालेली असतील तर त्याला शहरीकरण म्हणावे."

शहरीकरण ही एक प्रक्रिया आहे. एकूण लोकसंख्येपैकी शहरीकरणाच्या प्रक्रियेत बरीच लोकसंख्या नगर आणि उपनगरातून रहात असते. औद्योगिकरणाच्या प्रक्रियेतून शहरीकरणाला सुरुवात झाली. जेव्हा अधिकाधिक उद्योगाची वाढ व्हायला लागते. त्यावेळी मानवी उत्पादकता वाढत जाते. उत्पादकता वाढीमुळे उत्पन्न वाढते आणि अधिकाधिक लोक शहरात उद्योगधंदे असल्यामुळे शहरात रहाणे पसंत करतात. थोडक्यात शहरीकरण म्हणजे लोकसंख्येचे ग्रामीण भागातून शहरी भागांकडे स्थानांतर. हल्ली वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात राहणार्या लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण भागातील लोकसंख्येपेक्षा वाढले आहे. शहरीकरण हा पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थेत झालेले रुपांतर दर्शविणारा निर्देशांक आहे. निरनिराळे अहवाल विचारात घेता हे सर्व अहवाल असे दर्शवितात की, १९०० मध्ये जगातील शहरी लोकसंख्येचे प्रमाण १३टक्के होते ते १९५० मध्ये २९ टक्के इतके झाले तर २००५ मध्ये ४९ टक्के आहे.

विकसित देशांच्या तुलनेमध्ये विकसनशील देशात शहरीकरणाचा वेग कमी आहे. याला अनेक घटक जबाबदार आहेत. भारतामध्ये स्थलांतरामुळे शहराचा वेग वाढला आहे.या उलट शहरीकरणामुळे आर्थिक संधी मिळाली म्हणून स्थलांतराचा वेग वाढला आहे.

लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणामुळे लोकसंख्येच्या अमर्याद गरजांची पूर्तता करणे ही फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. निवारा आणि रोजगाराचा तुटवडा ही वाढत्या लोकसंख्येची अपत्ये आहेत. त्यातच ग्रामीण भागाकडून शहराकडे स्थलांतर करणे ही भिषण समस्या निर्माण झाली आहे.

"रोजगाराच्या संधीसाठी किंवा शहरी जीवनाच्या आकर्षणामुळे ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात लोकसंख्या शहरी भागाकडे येण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण / शहरीकरण म्हणतात."

"एखाद्या शहरात वास्तव्य करणार्या लोकसंख्येचे त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येशी असलेले प्रमाण वाढतजाणे यांस शहरीकरण म्हणतात."

"जेव्हा शहरी परिसरात लोकसंख्या पातळीचे विशिष्ट केंद्रीकरण झालेले आढळून येते त्याला नागरीकरण / शहरीकरण असे म्हटले जाते."

**शहरीकरणाची / नागरीकरणाची कारणे:**

**१) औद्योगिक क्रांती (Industial Revolution) :**

शहरीकरणामध्ये सर्वात महत्त्वाची भूमिका औद्योगिक क्रांतीची आहे. औद्योगिक क्रांतीमुळे मोठ्या प्रमाणात कारखान्यात उत्पादन होऊ लागले. कारखान्यात काम करण्यासाठी ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरात येऊ लागले. कारखान्याच्या आजूबाजूच्या परिसरात लोक निवास करू लागले. त्यांच्या आवश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी बाजार लावण्यात आले. वाहतुकीच्या पूर्ततेसाठी बाजार लावण्यात आले. वहातूकीच्या साधनात वाढ झाली आणि थोड्या कालावधीत नगरे निर्माण झाली.

**२) लोकसंख्येतील वाढ आणि स्थलांतर (Growth in population & Migration):**

गावातील लोकांची संख्या वाढल्यामुळे गावांचा विस्तार होतो. गाव नगरात आणि नगरे महानगरात रुपांतरित होतात. खेड्यातील लोक रोजगारासाठी, शिक्षणासाठी, दुसर्या गावात स्थलांतरित होतात. लोकसंख्येत वाढ झाली की त्या गावाचा विस्तार होऊन नगरात रुपांतर होते.

**३) वहातुकीच्या साधनांचा विकास (Development of means of Transportation) :**

वहातुकीची साधने एका शहरास दुसर्या शहराशी जोडण्याचे काम करतात. आजच्या युगात रेल्वे, बस, विमान, जहाज ही जलद वहातुकीची साधने आहेत. ह्या जलद वहातुकीच्या साधनामुळे मालाची तसेच सामानाची ने-आण एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी जलद गतीने कमी खर्चात करता येते म्हणून जे क्षेत्र वहातुकीच्या साधनाद्वारे जोडले जाते त्या क्षेत्राचा जलद विकास होऊन नगरांची निर्मिती होते. उदा. मुंबई, पुणे, दिल्ली, कलकत्ता, चेन्नई ही शहरे वहातुकीच्या जलद साधनामुळे विकसीत झाली आहेत.

**४) संदेशवहनांच्या साधनांचा विकास (Development of means of communication) :**

संदेश आणि संदेशवहन साधनांच्या विकासाचे नागरीकरणाच्या उगमस्थानामध्ये महत्त्वाचे योगदान आहे. डाक, तार, टेलिफोन, वर्तमानपत्रे, टेलेक्स, इंटरनेट ही संदेश वाहनाची प्रमुख साधने आहेत. या साधनाद्वारे व्यापारासंबंधीच्या सूचना एका स्थानावरून शेकडो किलोमीटर अंतरावरील स्थानावर जलदगतीने पाठवल्या जातात. त्यामुळे उद्योग आणि व्यापाराचा विकास होतो.

**५) शेतीमध्ये क्रांती (Revolution in Agriculture) :**

औद्योगिक क्रांतीप्रमाणे कृषी क्रांतीचेदेखील नगरांच्या वाढ आणि विकासामध्ये महत्त्वाचे योगदान आहे. आधुनिक काळातील विज्ञान युगातील नवीन नवीन शोध, सरकारचे नवीन कृषी धोरण यामुळे कृषीक्षेत्रात क्रांती घडून आली. नवनवीन कृषी यंत्रामुळे १०व्यक्तीचे काम एकच व्यक्ति करू लागली. खते, बियाणे, किटकनाशके, जलसिंचन सुविधा यात प्रचंड वाढ झाली. त्यामुळे कृषीक्षेत्राचे उत्पन्न वाढले. पण यंत्राच्या वाढत्या वापरामुळे कृषी क्षेत्रातील माणसांची गरज कमी झाली. त्यामुळे कृषी क्षेत्रातील इतर लोक कारखान्यात काम करू लागले. त्यामुळे छोटी छोटी गावे एकत्र येऊन त्याचे रूपांतर शहरात झाले.

**६) शिक्षण केंद्र (Education Centre) :**

उच्चशिक्षण आणि तांत्रिक शिक्षणाचे केंद्र हे नगरामध्ये रुपांतरत होतात. कारण येथे शिक्षण घेण्यासाठी देश-विदेशातील विद्यार्थी येतात. शिक्षण केंद्राच्या परिसरात शिक्षक आणि कर्मचार्यांना राहण्यासाठी निवासस्थाने बांधली जातात. वहातुकीत वाढ होते. लोकांच्या आवश्यक गरजांच्या पूर्तीसाठी बाजाराची निर्मिती केली जाते. त्याठिकाणी करमणूक केंद्राची स्थापना केली जाते. त्यामुळे शहरीकरणात वाढ होते.

**७) नागरी सोयी (Urban Facilities) :**

नगरामध्ये विविध प्रकारच्या नवनवीन वस्तूचे उत्पादन केले जाते. व्यक्तींना आवश्यक असलेल्या वस्तूंच्या निर्मितीसाठी विविध प्रकारच्या संस्था संघटना कार्यरत असतात. बौद्धिक आणि मानसिक विकासासाठी शाळा महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय आणि वाचनालये असतात. व्यक्तीला आवश्यक असणार्या सर्व प्रकारच्या सुविधा शहरामध्य असतात. म्हणून लोकांना नगरांचे आकर्षण असते. नागरी सुविधामुळे नगरांचा / शहरांचा विकास होतो.

**८) रोजगार संधी (Employment) :**

शहराच्या ठिकाणी विविध रोजगार संधी उपलब्ध असतात. स्वयंरोजगारासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असतात. त्यामुळे ग्रामीण भागातून शहरात लोकसंख्या स्थलांतरीत होते व शहरांचा विकास होतो.

**९) राजकीय घटक (Political Factor) :**

शहराच्या विकासात राजकीय घटकांना देखील विशेष महत्त्व आहे. जे शहर व्यापार वाणिज्य आणि उद्योगधंद्यांचे केंद्र आहे. तेथे सत्ताधारी अशा शहरांकडे विशेष लक्ष देतात. अशा ठिकाणी नवीन सरकारी कार्यालये सुरु केली जातात. शहरांचे नियोजन करून सुंदर शहर बनविले जाते. त्यामुळे शहरांचा विकास होतो.

**१०) सुरक्षिततेची भावना (Feeling of Secrurity) :**

व्यक्ती अशा ठिकाणी रहाणे पसंत करते, जेथे सुरक्षिताता मिळू शकते. लोकांना आपल्या संपत्तीची आणि जीवाची सतत भिती असते म्हणून व्यक्ती सुरक्षित स्थान शोधत असते. या सुरक्षिततेच्या भावनेमुळे नगरांचा विकास झाला आहे.

थोडक्यात शहरीकरण घडून येण्यास, शेती व औद्योगिक क्रांती, शिक्षण व रोजगार, करमणूक केंद्र, वहातुकीची संदेशवाहनांची साधने असे विविध घटक कारणीभूत असतात.

**शहरीकरणाचे / नागरीकरणाचे परिणाम:**

I. **नागरीकरणाचे प्रतिकूल परिणाम (Negative effects of urbanization)** :

**१) जीवनमानावर परिणाम :**

व्यक्तीच्या मुलभूत गरजांची पूर्तता कशी होते. यावर तिचे जीवनमान अवलंबून असते. शैक्षणिक सुविधा, आरोग्य सेवा, रोजगार व व्यवसाय मुलभूत गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. शहरात वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणामुळे या गरजांची पूर्तता करणे कठीण होते. याचा परिणाम व्यक्तीच्या उत्तम जीवन मानावर होतो.

**२) दळणवळणांच्या सुविधांवर प्रचंड ताण :**

शहरीकरणामुळे वहातुक व्यवस्थेवर प्रचंड ताण पडतो. वहातुकीच्या या प्रचंड समस्येमुळे विविध प्रकाराचे अपघात होतात. वहातुक कोंडी निर्माण होते.

**३) विकास योजना कोलमडून पडतात :**

लोकसंख्येच्या प्रमाणावर विकास योजनांचे नियोजन केले जाते. ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतरीत झाल्यास शहरी लोकसंख्येत वाढ होते. परिणामी निश्चित केलेल्या विकास योजना कोलमडून पडतात.

**४) गुन्हेगारीप्रमाणात वाढ :**

रोजगाराच्या शोधासाठी ग्रामीण भागातून शहरीभागात येणार्याचे प्रमाण अधिक असते. त्यातून गुन्हेगारी व बेकारीचे प्रमाण वाढते.

**५) पर्यावरण तोल बिघडतो :**

आद्योगिक प्रगती व रहाण्यासाठी जागा उपलब्ध करताना शेतीयोग्य जमिनीवर आक्रमण केले जाते. वृक्षतोड हाते. त्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडते.

**६) कुटिर उद्योगावर प्रतिकुल परिणाम :**

ग्रामीण भागातील लोकांचे शहरांकडे स्थलांतर झाल्यामुळे ग्रामीण भागातील कुटीर उद्योगांवर प्रतिकुल परिणाम होतो.

**७) आरोग्यविषयक समस्या :**

शहरात स्थलांतर केल्यानंतर नोकरी मिळते; परंतु रहायच्या जागेचा प्रश्न असतो. जागेच्या किंमती वाढल्यामुळे झोपडपट्टीत वाढ होते, गलिच्छ वस्त्या, रोगराई यात वाढ होते व आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात.

**८) प्रदूषण:**

शहरात दूषित हवेचे साम्रज्य आणि प्रदूषण घडण्याचे कारण म्हणजे वाढते शहरीकरण होय. वाहनातील घर मानवी जीवनास धोकादायक आहे. मुंबईसारख्या शहरात अशा प्रदुषणामुळे १० टक्के लोक विविध आजारांनी पछाडलेले आहेत.

हवेतील प्रदुषणाबरोबर पाण्यातील प्रदुषण प्रचंड हानीकारक असते. औद्योगिक क्षेत्रातील शहरात असे प्रमाण अधिक असते. असे प्रदुषण होत राहिल्यास भारतातील नद्यांच्या माध्यमातून मिळणारे पाणी तीन-चार दशकांत सजीवांसाठी निरुपयोगी ठरेल. जसे वायू प्रदूषण व जल प्रदूषण होते तसे ध्वनी प्रदूषण होते. ध्वनी प्रदूषणामुळे श्रवण क्षमता कमी होते. मनोरुग्णांच्या संख्येत वाढ होते. माणसांची ध्वनी ग्रहण करण्याची क्षमता ८४ डेसिबल इतकी आहे. मात्र आज विविध प्रकारचे हा@र्न या प्रमाणाच्या पलिकडचे आहेत.

**९) नितीमत्ता ढासळते :**

वाढत्या शहरीकरणामुळे नितीमत्ता ढासळत आहे. संस्कृतीचे संगोपन व संवर्धनाचे कार्य शहरात कमी प्रमाणात आढळते. संमिश्र समाज आणि आर्थिक हव्यासामुळे या गोष्टी घडून येतात. पैशास मिळालेले अवास्तव महत्त्व यामुळे नित्तीमत्ता म्हणजे काय? याची जाणीवच शहरात आढळत नाही.

**II. नागरीकरणाचे अनुकूल परिणाम (Positive effects of urbanization):**

१) मोठ्या शहरामध्ये उत्पादकता जास्त रहाते कारण विशेषीकरणाला अधिक संधी उपलब्ध होते.

२) शहरीकरणामुळे ग्रामीण भागाचे चित्र बदलते ग्रामीण भागातील शेती व्यवसायात पारंपरिक स्थानिक सेवा, लघुउद्योग हे मोठ्या प्रमाणावर आढळतात पण नागरीकरणामुळे त्यांची जागा आधुनिक उद्योग होतात आणि त्यातून तयार होणार्या वस्तू बाजारपेठेत आणल्या जातात.

३) मोठ्या शहाराकडून विशेषीकृत वस्तू आणि सेवा स्थानिक बाजारपेठेत आणि आजूबाजूच्या गावात आणल्या जातात. वाहतुक घाऊक व्यापार, वाढते भांडवल, वित्तसेवा, सुशिक्षित श्रमपुरवठा या गोष्टींमुळे विकासाला चालना मिळते.

४) लहान शहरांपेक्षा मोठ्या शहरात वास्तव वेतन वेगाने वाढते.

५) शहरीकरणामुळे शेती क्षेत्रातील अनुउत्पादक श्रमाचा पुरवठा शहरी रोजगाराकडे वळता परिणाम ग्रामीण आणि शहरी भागात वेतनदर समान होतो.

६) लोकसंख्येचा जीवनमानाचा दर्जा सुधारतो. त्यांना रहात्या जागांच्या सुविधा प्राप्त होतात. चांगल्या प्रकारची घरे उपलब्ध होतात. आरोग्यविषयक जागृकता वाढते. शहरामध्ये परिणामकारक सामाजिक, सांस्कृतिक बदल घडून येतात. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात जन्मदर कमी असतो कारण मुलांना वाढविण्याचा खर्च जास्त असतो. अन्न, निवारा या गोष्टींची टंचाई जाणवते.

**स्टअरर्ट बँड यांच्यामते शहरीकरणाचे पुढील सकारात्मक परिणाम दिसून येतात.**

१) जन्मदर हा नवीन शहरांमध्ये वेगाने खाली घसरतो. त्यामुळे भविष्यकालीन लोकसंख्या वाढीची समस्या कमी होते.

२) जमिनीचा कमीत कमी वापर केला जातो आणि निसर्गात जास्त जमिन ठेवली जाते. परिणामी अर्थव्यवस्थेचा विकास होतो.

राज्यांच्या राजधान्या, लष्करीदृष्ट्या महत्त्व प्राप्त शहरे, शैक्षणिक व धार्मिक स्थळांचे प्रमाण ज्या शहरात अधिक आहेत अशी शहरे आणि विशेषत: औद्योगिक क्षेत्रातील शहरांमध्ये लोकसंख्या तीव्रगतीने वाढत आहे. त्यामुळे शहरात प्रत्येक गोष्टींची टंचाई आणि त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

वाढत्या शहरीकरणामुळे वरील प्रकारचे दुष्परिणाम जरी आढळून येत असले तरी त्यावर उपाय करण्याचे प्रयत्न शासन करीत आहे. ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना, रोजगार हमी योजना, ग्रामीण विकास व विद्युतीकरण, सामाजिक वनीकरण, मृदसंधारण व जलसंधारण इ. शासकीय योजना मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

१. शहरीकरण म्हणजे काय ते व्याख्या देऊन स्पष्ट करा.

२. औद्योगिक क्रांतीची शहरीकरणामधील भूमिका स्पष्ट करा.

३. स्टअरर्ट बँड यांच्यामते शहरीकरणाचे कोणते सकारात्मक परिणाम दिसून येतात?

४. वाढत्या शहरीकरणाचे दुष्परिणाम कोणते?

## ६.५ औपचारिक आणि अनौपचारिक क्षेत्र

**भारतातील औपचारिक क्षेत्रः**

या क्षेत्रात कामाचे विशिष्ट तास आणि नियमित वेतन असलेल्या सर्व नोकऱ्या आणि कामगाराची नोकरी निश्चित आहे. ही एक परवानाकृत संस्था आहे आणि कर भरण्यास जबाबदार आहे. बँका आणि इतर कॉर्पोरेशन औपचारिक क्षेत्रांतर्गत येतात. सावकार, दलाल हे अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा एक भाग मानले जातात. त्याचे वर्णन ग्रे अर्थव्यवस्था म्हणून देखील केले जाते.

**भारतातील अनौपचारिक क्षेत्रः**

बहुसंख्य लोकसंख्या अनौपचारिक क्षेत्रांमध्ये आहे. अनौपचारिक क्षेत्रे कमी उत्पादन मूल्यासह कमी मानली जातात. भारतात कृषी, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन आणि संबंधित व्यवसायांमध्ये 52 टक्के कामगार काम करतात. त्यात कायदेशीर आणि आर्थिक दोन्ही सुरक्षेचा अभाव आहे. भारतातील अनौपचारिक क्षेत्रांपैकी सुमारे 25 टक्के शहरी रोजगार आहेत.

## ६.६ शहरी अनौपचारिक क्षेत्र

**प्रस्तावना:**

अनौपचारिक क्षेत्र ही संकल्पना सर्वात प्रथम १९७० मध्ये हार्ट यांनी वापरली. अनौपचारिक क्षेत्राच्या संदर्भामध्ये विविध व्याख्या विचारात घेता येतात. उदा. १९७० ते १९८० या कालावधीत अनौपचारिक क्षेत्र म्हणजे अनियंत्रित आर्थिक प्रक्रिया असे म्हटले जात होते. आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेनुसार शहरी भागामध्ये आधुनिक क्षेत्राची नवीन संयोजकाना सामावून घेण्याची क्षमता नसल्यामुळे अनौपचारिक क्षेत्राची निर्मिती होते. हे क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र की ज्यामध्ये निर्वाहास पुरेल इतकेच उत्पन्न असते.

१९९३ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेच्या अधिवेशनात अनौपचारिक क्षेत्रासंबंधी असे म्हटले आहे की अनौपचारिक क्षेत्र म्हणजे अनोंदणी क्षेत्र होय. या क्षेत्रामध्ये लहान संयोजक काही श्रमिकांना घेऊन लहान प्रमाणावर उत्पादन करत असतात. या क्षेत्राची व्याख्या करणे कठीण आहे कारण हे स्वत:च्या मालकीने चालविले जाणारे लहान उद्योग असतात. विनावेतन कौटुंबिक सदस्य काम करत असतात.

२००३ मध्ये १७ व्या आंतरराष्ट्रीय श्रमसंख्या शास्त्रज्ञांच्या सभेमध्ये अनौपचारिक क्षेत्राची व्याख्या व्यापक करण्यात आली आणि त्यानुसार या क्षेत्रातील रोजगाराचे २ भागात विभाजन करण्यात आले.

१) स्वयंरोजगार उदा. स्वत:चा व्यवसाय असणारे श्रमिक आणि विनावेतनावर काम करणारे कौटुंबिक श्रमिक.

२) वेतनावर काम करणारे श्रमिक, अर्धवेळ कामगार व काही कामगार यांचा समावेश यामध्ये होतो.

अनौपचारिक क्षेत्र हे एकजिनसी नाही परंतू त्यामध्ये अनेक क्रिया मोडत असतात. साधारणपणे या क्षेत्रावर सेवाक्षेत्रातील उपसेवा क्षेत्राचा प्रभाव पडत असतो आणि लहान उद्योग या क्षेत्रात येत असतात. उदा. १९९० पर्यंत एकूण शहरी अनौपचारिक क्षेत्राच्या १०ज्ञ् इतके उत्पादन हे या अनौपचारिक क्षेत्राकडून होत असते. एकूण १०६ उत्पादन क्रिया शेती धरून या क्षेत्रात मोडतात. उदा. सिमान्त शेतकरी, भूमिहिन शेतकरी, पारंपारिक कारागीर, कुकुटपालन व्यवसाय, वीटा बांधण्याचा व्यवसाय या सर्व व्यवसायाचा यात समावेश होतो तसेच सेवा क्षेत्रात स्थानिक वाहतूक व्यवसाय, दुकाने, घरगुती कामगार, सामाजिक सेवा करणारे उदा. रस्त्याची साफसफाई करणारे फेरीवाले, कचरा गोळा करणारे, लहान प्रमाणावर उत्पादन करणारे कामगार उदा. चप्पल बनविणे छोट-छोटे दागिने बनविणे, स्वेटर बनवणे साडी फॉल बिडीग करणे तसेच घरगुती व्यवसाय कला कुसरीचे व्यवसाय, मासेमारी व्यवसाय यांचा समावेश यामध्ये होतो.

शहरी अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायाची वैशिष्ट्ये :

१) कमी दर्जाचे तंत्रज्ञान आणि कौशल्य.

२) अनौपचारिक क्षेत्रातून मिळणारे शिक्षण.

३) अल्पउत्पादकता.

४) स्वयंरोजगार

५) कौटुंबिक सभासदाच्या सहाय्याने उत्पादन

६) स्थानिक साधनसामुग्रीचा वापर

७) भांडवली तंत्रज्ञानाचा अभाव

८) श्रमप्रधान उत्पादनतंत्र

९) स्थिर भांडवलापेक्षा चालू भांडवलाचा जास्त वापर

१०) लघु उद्योगातील उत्पादन

**शहरी अनौपचारिक क्षेत्राची भूमिका (Role of Urban Informal Sector):**

१) शहरी अनौपचारिक क्षेत्राची भूमिका समजावीत असताना हे क्षेत्र म्हणजे रहात्या वस्त्या होय. हि गोष्ट डोळ्यासमोर ठेऊन त्याचा विचार करणे आवश्यक आहे. या भागाचा औद्योगिकरणामुळे काही प्रमाणात विकास झालेला असतो या क्षेत्राचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण भागातील गरिब आणि बेकार जनतेला हे क्षेत्र सामावून घेते.

२) या क्षेत्रातील स्वस्त आदाने आणि सेवा अनौपचारिक क्षेत्राला पुरवल्या जातात.

३) गरीब लोकांचे उत्पन्न वाढले असता अनौपचारिक क्षेत्राकडून तयार केल्या जाणार्या वस्तू आणि सेवा करिता मागणी वाढते.

अशा या अनौपचारिक क्षेत्राचे महत्त्व दारिद्र्य आणि विषमता दूर करण्याच्या दृष्टीने वाढत चालल्याचे आढळते. एवढेच नव्हे तर हे क्षेत्र विकसनशील देशातील उत्पन्न वाढीस हातभार लावते.

**शहरी अनौपचारिक क्षेत्राची वैशिष्ट्ये:**

१) या क्षेत्राला कोणत्याही प्रकारचे संरक्षण किंवा मान्यता नसते.

२) किमान वेतन कायदा आणि सामाजिक कल्याण या गोष्टी अंतभ्ाूर्त नाहीत.

३) बरेचसे रोजगार स्वयंरोजगार किंवा मालकी हक्काचे रोजगार असतात.

४) उत्पन्न व वेतनपातळी खालच्या दर्जाची असते.

५) कामगार संघटनांचा अभाव असतो.

६) नोकरीची सुरक्षितता नसते.

७) संस्थेकडून इतर फायदे मिळत नाही.

८) बाजारपेठ मागणीनुसार प्रवेशासंबंधी आणि उद्योग सोडवण्यासंबंधी लवचिकता असते.

**शहरी अनौपचारिक क्षेत्रातील कामाचे स्वरूप:**

१) अनियंत्रित आणि स्पर्धात्मक क्षेत्र असते.

२) वैयक्तिक किंवा कौटुंबिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते.

३) सहज प्रवेश.

४) स्थानिक कच्च्या मालावर अवलंबित्व.

५) व्यवसायावर कुटुंबाची मालकी.

६) श्रमप्रधान तंत्राचा अवलंब.

७) संस्थात्मक पतपुरवठा केला जात नाही.

**अनौपचारिक क्षेत्रातील समस्या:**

१) वापरात न आलेल्या सार्वजनिक किंवा खाजगी जागेवर हे चालू केले जातात.

२) आपल्या गरजेनुसार बेकायदेशीर जागेचे विभाजन केले जाते किंवा जागा भाड्याने दिली जाते.

३) बेकायदेशीर जागेवर बांधकाम केले जाते.

४) कमी खर्चाच्या आणि टाकाऊ सहज उपलब्ध होणार्या स्थानिक साधनसामुग्रीवर आधारीत असतात.

## ६.७ सारांश

१. थोडक्यात शहरीकरण म्हणजे लोकसंख्येचे ग्रामीण भागातून शहरी भागांकडे स्थानांतर. हल्ली वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात राहणार्या लोकसंख्येचे प्रमाण ग्रामीण भागातील लोकसंख्येपेक्षा वाढले आहे. शहरीकरण हा पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थेत झालेले रुपांतर दर्शविणारा निर्देशांक आहे.

२. शहरीकरण घडून येण्यास, शेती व औद्योगिक क्रांती, शिक्षण व रोजगार, करमणूक केंद्र, वहातुकीची संदेशवाहनांची साधने असे विविध घटक कारणीभूत असतात.

३. स्टअरर्ट बँड यांच्यामते शहरीकरणाचे पुढील सकारात्मक परिणाम दिसून येतात.

I) जन्मदर हा नवीन शहरांमध्ये वेगाने खाली घसरतो. त्यामुळे भविष्यकालीन लोकसंख्या वाढीची समस्या कमी होते.

II) जमिनीचा कमीत कमी वापर केला जातो आणि निसर्गात जास्त जमिन ठेवली जाते. परिणामी अर्थव्यवस्थेचा विकास होतो.

४. राज्यांच्या राजधान्या, लष्करीदृष्ट्या महत्त्व प्राप्त शहरे, शैक्षणिक व धार्मिक स्थळांचे प्रमाण ज्या शहरात अधिक आहेत अशी शहरे आणि विशेषत: औद्योगिक क्षेत्रातील शहरांमध्ये लोकसंख्या तीव्रगतीने वाढत आहे. त्यामुळे शहरात प्रत्येक गोष्टींची टंचाई आणि त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतात.

